(सभापतीस्थानी माननीय सभापती)

प्रश्नोत्तरे

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

पुणे येथील आदित्य बिर्ला रुग्णालयातील जेवणामध्ये अळी सापडल्याची घटना

(१) * १७३८ श्रीमती मंदा म्हात्रे : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील आदित्य बिर्ला रुग्णालयामध्ये रुग्णांना देण्यात येणाऱ्या जेवणामध्ये अळी सापडल्याचे व त्यामुळे महापालिकेने रुग्णालयास नोटीस दिल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २००९ रोजी उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांच्या आरोग्य व जीवनाशी खेळणाऱ्या व भरमसाठ फी घेवून रुग्णसेवेकडे दुर्लक्ष करणाऱ्या अशा रुग्णालयांवर शासनाकडून काय कारवाई करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भास्कर जाधव श्री. अशोक चव्हाण यांच्याकरिता: (१) व (२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पीटल, थेरगांव मधील मे.टंवीकल हॉस्पीटॅलिटी प्रा.लि. द्वारा संचलित हॉस्पीटल कॅन्टीनमधून रुग्णाला देण्यात येणाऱ्या जेवणामध्ये अळी सापडल्याचे दि.०६.०९.२००९ रोजी रात्री ९.०० वाजता निदर्शनास आल्यानंतर लगेचच रात्री ९.१५ ते १२.४५ या कालावधीत कॅन्टीनमधील उपलब्ध साठ्यामधून अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार संबंधितांना नोटीस देऊन अन्न नमुना तपासणी करण्याची कारवाई करण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणी नोटीशीच्या अनुषंगाने संबंधितांचा खुलासा तसेच शासकिय लोक विश्लेषक, राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांचा अहवाल प्राप्त झाला असून संबंधितांवर न्यायालयात खटला भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "तसेच शासकीय लोक विश्लेषक राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांचा अहवाल प्राप्त झाला असून संबंधितांवर न्यायालयात खटला भरण्याची कार्यवाही सुरु आहे." सभापती महोदय, लोकांच्या जीवनाशी खेळणारे हे रुग्णालय आहे. या रुग्णालयात जास्त फी घेण्यात येते याबाबतीत काय कारवाई करण्यात येईल?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आदित्य बिर्ला रुग्णालय हे खासगी रुग्णालय असून ते सन 2006 मध्ये सुरु झाले आहे. या रुग्णालयात उपाहारगृह सुरु करण्याकरिता महानगरपालिकेच्या अन्न व औषध प्रशासनाकडून जी परवानगी द्यावी लागते ती परवानगी त्यांना देण्यात आली होती. या ठिकाणी जे रुग्ण येतात त्यांना खाद्यपदार्थ पुरविले जातात. तेथील माजी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/

ता.प्र.क्र.1738

श्री. भास्कर जाधव....

नगरसेवक आपल्या कार्यकर्त्याला भेटण्यासाठी या रुग्णालयात गेले होते त्यावेळी त्यांना अन्नामध्ये अळी असल्याचे निदर्शनास आले. याबाबतीत त्यांनी संबंधितांना कळविल्याबरोबर तात्काळ या बाबतची दखल घेऊन अन्नाचे नमुने घेण्यात आले व ते प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. त्यांच्याकडून रिपोर्ट आल्यानंतर त्या रिपोर्टच्या आधारे कलम 7(1), 2-आयए, 2-आयएफ, आणि 7(5) प्रमाणे जी कारवाई करणे आवश्यक होती ती अन्न निरीक्षकाने केलेली आहे आणि ही बाब आता न्यायप्रविष्ट आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी कारवाई करण्याच्या संदर्भातील काही कलमे या ठिकाणी सांगितलेली आहेत. त्या कलमानुसार नेमकी कोणती कारवाई केली आहे. या ठिकाणी जेवण पुरविणारा कंत्राटदार सध्या तेथे कार्यरत आहे की त्याच्यावर कारवाई केलेली आहे?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ज्या कमलान्वये कारवाई करण्यात आलेली आहे त्या कलमांची माहिती घेतली तर त्यानुसार कमीत कमी तीन महिन्यापासून तीन वर्षापर्यंत त्याला सजा होऊ शकते, अशा गंभीर स्वरुपाची कलमे लावण्यात आली आहेत. या कलमानुसार आणखी कारवाई करता येते, पण शारीरिक हानी झाली तर ती करता येते. त्या कंत्राटदाराला त्याचे लायसन्स रद्द करण्यात कां येऊ नये अशा प्रकारची शोकॉज नोटीस देण्यात आली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील बिर्ला मेमोरियल रुग्णालयाचा प्रश्न श्रीमती मंदा म्हात्रे यांनी या ठिकाणी उपस्थित केला आहे. नागपूर अधिवेशनामध्ये खाद्यपदार्थांमध्ये सापडणाऱ्या अळीचा एक तरी प्रश्न असतोच. खरा मुद्दा असा आहे की, प्रत्येक वेळी हा प्रश्न पहिल्या पाच प्रश्नात लागतो, कारण तो महत्वाचा असतो हे देखील मी मान्य करते. परंतु बऱ्याचवेळा आमच्या जे निदर्शनास आलेले आहे.त्यानुसार सभापती महोदय, कंत्राटदारांच्या वादातून असे प्रसंग निर्माण होतात कां हे तपासून पाहिले पाहिजे. याबाबतीत मला माननीय मंत्रिमहोदयांना असे सूचवावयाचे आहे की, आपण स्वत: पिंपरी चिंचवडला भेट द्यावी. कारण त्या ठिकाणी एक माजी नगरसेवक जाणे, ताबडतोब त्यालाच खाद्यपदार्थात अळी सापडणे,

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/

ता.प्र.क्र.1738.....

डॉ. नीलम गोऱ्हे....

याबाबतीत मला कोणावर संशय घ्यावयाचा नाही पण याबाबतीत सखोल चौकशी करण्यात यावी की, या पध्दतीचा रिपोर्ट या कंत्राटदाराविरुध्द पूर्वी कधी आला होता काय? आला असेल तर जरुर त्याचे कंत्राट रद्द करण्यात यावे. पण ज्या ज्यावेळी अळीचा प्रश्न येईल त्या त्या वेळी संबंधित कंत्राटदाराच्या पुढच्या-मागच्या कंत्राटदारांची काय परिस्थिती आहे हे तपासून घेणार काय?

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1738 .....

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधलेले आहे. हा प्रश्न जाणीवपूर्वक उपस्थित केला जातो काय अशा प्रकारचा संशय आहे. निश्चितपणे त्यांच्या बोलण्यातील सत्यता काय आहे हे पडताळून पाहण्यात येईल.

ताराकिंत प्रश्न क्रमांक 489

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर साहेब मला काल भेटले होते तसेच सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मला पत्र दिले होते की, ते दोघेही आज उपस्थित राहू शकणार नाहीत.

तारांकित प्रश्न क्रमांक 2099

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी भागातील रुग्णांलयातील रुग्णांची औषधाअभावी होत असलेली गैरसोय

(४) * ३७५ श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. हेमंत टकले , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री.रमेश शेंडगे , डॉ. दिपक सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्याच्या जव्हार, मोखाडा, विक्रमगड तसेच अन्य तालुक्यांतील रुग्णालयांमध्ये औषधे उपलब्ध नसल्याने रुग्णांना योग्य औषधोपचार मिळत नसल्याचे माहे ऑगस्ट, २००९ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रुग्णांना तातडीने औषधोपचार मिळणेबाबत शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजीया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे लिहिले आहे की, " हे खरे नाही ". पण ठाणे जिल्ह्यात जव्हार, मोखाडा आणि विक्रमगड तसेच अन्य तालुक्यातील रुग्णालयांमध्ये खरोखरच औषधांचा फार मोठा प्रश्न आहे.

प्रा. फौजीया खान : सभापती महोदय, मला प्रश्नाच्या उत्तरामध्ये आपल्या अनुमतीने थोडी सुधारणा करावयाची आहे. उत्तराच्या पहिल्या भागामध्ये मी असे स्पष्टीकरण देते की, "नमूद केलेल्या सर्व रुग्णालयांमध्ये आवश्यक त्या औषधांचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे."

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी त्या ठिकाणी स्वत: दौरा करावा असे मला वाटते. जर त्यानी दौरा केला तर तेथील वस्तुस्थिती किंवा सत्य परिस्थिती त्यांच्या निदर्शनास येईल. त्या हॉस्पिटलमध्ये आपण पाय सुध्दा ठेऊ शकणार नाही अशी दुर्गंधी पहिल्यांदा गेल्याबरोबर आपल्या निदर्शनास येईल. आपण दौऱ्यावर यावे असे मला वाटते. आम्ही आपल्याला सोबत घेऊन जाऊ. आपण हा प्रश्न आल्यानंतर जर त्या ठिकाणी औषधे उपलब्ध करुन दिली असतील तर चांगलेच आहे पण मला असे वाटते की, हा फार दुर्गम भाग आहे. त्या ठिकाणी आदिवासी लोक राहतात. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी त्या ठिकाणी यावे आणि या प्रश्नाचे खरे गांभीर्य लक्षात घेऊन आपण त्याबाबत कार्यवाही करावी. माननीय मंत्रिमहोदय हे करणार काय ?

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजीया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या सूचनेनुसार जरुर आपण तिकडे भेट देण्यासाठी सोबत जाऊन बघू आणि जर त्या ठिकाणी काही दुरावस्था असेल तर कार्यवाही करु.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या ठिकाणी "हे खरे नाही", "प्रश्न उद्भवत नाही" असे उत्तर दिलेले आहे त्यावरुन शासन या विषयामध्ये योग्य पध्दतीने बघत नाही. शासन अत्यंत उदासीन आहे. जव्हार, मोखाडा, विक्रमगड या ठिकाणचे पुरावे आम्ही आपल्याला देण्यास तयार आहोत. त्या ठिकाणी औषधे नाहीत, डॉक्टर्स नाहीत. विक्रमगड, जव्हार, मोखाडा या दुर्गम भागामध्ये प्राथमिक रुग्णालयाला लोकांनी दोन दोन वेळा कुलुपे लावलेली आहेत. सर्पदंशाने माणसे मेलेली आहेत. आम्ही नेहमी त्या दवाखान्यामध्ये जातो आणि आम्हाला तेथील वस्तुस्थिती माहीत आहे. त्या ठिकाणी औषधे कशा पध्दतीने ठेवलेली असतात, औषधांचा कसा तुटवडा असतो याबाबत तेथील लोक रिपोर्ट देतात. त्यामुळे या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे ते समाधानकारक नाही. शासनाच्या प्रतिनिधींनी, माननीय मंत्रिमहोदयांनी त्या ठिकाणी स्वतः भेट द्यावयास पाहिजे. ती भेट केव्हा दिली जाईल, त्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी कधी केली जाईल तसेच त्याची पूर्तता कधी केली जाईल ?

प्रा. फौजीया खान : सभापती महोदय, शासन याबाबत उदासीन आहे हे खरे नाही. औषधांच्या उपलब्धतेबाबत आम्ही रिपोर्ट घेतलेला आहे. किती औषधे उपलब्ध झाली, किती खर्च झाली आणि किती शिल्लक आहे याचा रिपोर्ट घेतलेला आहे. जर सन्माननीय सदस्यांना पाहिजे असेल तर ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल. जर कोठे स्पेसिफिक काही तक्रार असेल तर सन्माननीय सदस्यांनी सांगावी, त्यावर आम्ही कारवाई करु.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण मला थोडा वेळ द्यावा अशी मी आपल्याला सुरुवातीला विनंती करतो. दोन महिन्यापूर्वी मी जव्हार, विक्रमगड, मोखाडा या ठिकाणी भेट दिली होती. विक्रमगडच्या हॉस्पिटलमध्ये जे स्पिरीट शॉब असतात जे इंजेक्शन देण्यापूर्वी वापरले जातात ते एक्स्पायर झालेले होते. डायक्लोफ्लेम सोडियमची जी इंजेक्शन होती त्याची एक्स्पायरी डेट झालेली होती. पाहिजे तर माननीय मंत्रिमहोदयांच्या माहितीसाठी मी ते त्यांच्याकडे पाठवून देतो.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

ता. प्र. क्र. 375 .... डॉ. दीपक सावतं...

त्याचा केलेला पंचनामा माझ्याकडे आहे. माननीय मंत्रिमहोदय जेव्हा मंत्री नव्हत्या तेव्हा या विषयावर त्या फार आग्रही होत्या. आपल्याकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत. माननीय मंत्रिमहोदय श्री. सुरेश शेट्टी साहेबांकडून सुध्दा अपेक्षा आहेत. मी हिमान सारख्या शॉर्ट एक्स्पायरी औषधाच्या

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.375... डॉ.दीपक सावंत....

त्या केंद्रातून हजारो बाटल्या बाहेर काढल्या आहेत. त्याची बातमी आहे. अशाप्रकारे शॉर्ट टर्मसाठी पुरवठा करणाऱ्या हिंदुस्थान लॅबोरेटरी या कंपनीविरुध्द शासन काय कारवाई करणार आहे ? औषधाचा जो साठा असतो तो मार्च महिन्यात संपणार असेल तर पुरवठा जानेवारी महिन्यात दिला जातो. म्हणजे शॉर्ट टर्म एक्सपायरी दिली जाते. त्यामुळे हजारो बाटल्या संपत नाही. म्हणून त्या पुरवठादाराला काळया यादीमध्ये टाकले जाणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी प्रोक्यूरमेंटसंबंधीचा प्रश्न उपस्थित केला आहे. आरोग्य खात्याच्या दृष्टीने हा फार महत्वाचा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. मी आणि सन्माननीय राज्यमंत्र्यांनी या खात्याचा कारभार हाती घेतला त्यावेळी दोघांनी एक निर्णय घेतला आहे. यापुढील काळात कोणतेही इक्वीपमेंट किंवा औषधे खरेदी करावयाची असतील त्यावेळी क्वालिटी आणि त्याची प्राईज असावी या बाबीला फार महत्व देणार आहे. क्वालिटी कंट्रोलबाबत एक कमिटी नेमून स्पेसिफिकेशन प्रिस्क्राईब करुन त्याप्रमाणे कमीत कमी 1 वा 2 वर्षाची एक्सपायरी डेट त्याच्यावर लिमिट पाहिजे असे बंधन घातले जाईल. सध्या तो नियम आहे. त्याप्रमाणे खरेदी केली जाईल आणि यापूर्वी जी खरेदी झाली असेल आणि त्यामध्ये अनियमितता झाली असेल तर अधिका-यांविरुध्द व कंपनीविरुध्द कारवाई केली जाईल असे मी सभागृहाला आश्वासन देत आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आदिवासी व ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य केवळ बातमीच्या आधारे किंवा वर्तमानपत्राच्या आधारावर प्रश्न विचारलेला नाही किंवा आपले मनोगत व्यक्त केलेले नाही. मग सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे असतील, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत असतील आम्ही सर्वांनी त्या रुग्णालयाला प्रत्यक्षात भेटी दिलेल्या आहेत. त्याठिकाणी जाऊन नोंदी घेतलेल्या आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, आपण भेट देण्याचा कार्यक्रम ठरवून गेलात तर सर्व व्यवस्था होईल, औषधे दिसतील, स्वच्छता दिसेल. म्हणून मंत्रिमहोदय

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सरप्राईज व्हिजिट देणार आहेत काय असा माझा पहिला प्रश्न आहे. आदिवासी भागातील विक्रमगड तालुक्यामध्ये ग्रामीण रुग्णालय बांधून तयार आहे. त्याला दोन वर्षापेक्षा अधिक काळ झालेला आहे. या नवीन इमारतीमध्ये ग्रामीण रुग्णालय किती दिवसात सुरु केले जाणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे माहिती द्यावी, शासन त्या माहितीच्या आधारावर कार्यवाही करील. त्याचप्रमाणे जानेवारी महिन्यामध्ये सरप्राईज व्हिजिट देण्याचे निश्चित करुन तेथे भेट देऊ. विक्रमगड येथील ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याचा विषय मांडण्यात आला आहे. त्याबाबत लक्ष देऊन कार्यवाही केली जाईल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हे रुग्णालय लवकरात लवकर सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाकडून पावले उचलली जातील.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, आमच्या प्रश्नाला मंत्रिमहोदयांकडून समर्पक उत्तर येत नाही.

सभापती : मंत्रिमहोदय, विक्रमगड तालुक्यात ग्रामीण रुग्णालयाची इमारत बांधून तयार झालेली आहे, परंतु दोन वर्षापासून या रुग्णालयाचे उद्घाटन झालेले नाही. येत्या महिन्यामध्ये ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन होईल अशापध्दतीने शासनाने कार्यवाही करावी.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 26 जानेवारी, 2010 रोजी विक्रमगड येथील ग्रामीण रुग्णालयाच्या उद्घाटनाचा कायर्क्रम केला जाईल.

यानंतर श्री.शिगम

अशुध्दीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

संख (ता.जत, जि.सांगली) येथील मध्यम प्रकल्पासाठी ताब्यात घेतलेल्या जमिनी

(५) * १६८५ श्री. भगवान साळुंखे , श्री. चंद्रकांत पाटील , श्री. रामनाथ मोते : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संख (ता.जत, जि.सांगली) येथील मध्यम प्रकल्पाचे पाणी शिवारापर्यंत पोहचविण्यासाठी भिवर्गी, बेलोंडगी, करजगी, बालगांव, हळळी इत्यादी गावांतून कालवा खोदण्यात आलेला आहे, त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने ताब्यात घेतल्या आहेत, परंतु तब्बल ११ वर्षे होऊनही तेथील शेतकरी अनुदानापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने त्यांना अनुदान देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार, श्री.रामराजे नाईक-निंबाळकर यांच्याकरिता : (१) होय.

(२) सद्य:स्थितीत कृष्णा खोरे महामंडळाकडून रु.८६.३४ लक्ष इतके अनुदान उपलब्ध करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये मला सुधारणा करावयाची आहे. प्रश्न भाग (२)च्या उत्तरामध्ये "रु. ८६.३४ लक्ष" या ऐवजी "रु.९०.६५ लक्ष" असे वाचावे. बाकी छापल्या प्रमाणे.

श्री. भगवान साळुंखे : संख (ता. जत, जि. सांगली) येथील मध्यम प्रकल्पाचे पाणी शिवारापर्यन्त पोहचविण्यासाठी भिवर्गी, बेलोंडगी, करजगी, बालगाव, हळळी इत्यादी गावातून कालावा खोदण्यासाठी शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या असून त्या जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी शेतकरी गेली 11 वर्षे वंचित राहिलेले आहेत. शासनाने रु.90.65 लक्ष इतके अनुदान उपलब्ध केलेले आहे. हे अनुदान वितरित झालेले आहे काय ? नसल्यास, ते केव्हा वितरित करण्यात येईल ?

श्री. विजय वडेट्टीवार : एकूण रु. 90.65 लक्ष इतके अनुदान जिल्हाधिका-यांकडे सुपूर्द करण्यात आलेले आहे. या निधीचे अजून वाटप झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. मी आजच याबाबतीत जिल्हाधिका-यांशी बोललो. या प्रकरणी अंतिम निवाडा झालेला आहे. निधीचे वाटप लवकरच करणार असल्याचे जिल्हाधिका-यांनी मला सांगितलेले आहे. त्याप्रमाणे निधीचे वाटप लवकरात लवकर करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : शासनाने हे मान्य केलेले आहे की, कालव्यासाठी 11 वर्षापूर्वी गरीब शेतक-यांच्या जमिनी संपादित केलेल्या असून 11 वर्षे उलटूनही त्या जमिनीचा मोबदला शेतक-यांना मिळालेला नाही. जिल्हाधिका-यांनी सांगितल्या प्रमाणे निधी वितरित होईल हे मान्य आहे. परंतु गेली 11 वर्षे शेतक-यांना त्यांच्या न्याय हक्कापासून वंचित ठेवलेले आहे, 11 वर्षे त्यांना जमिनीचा मोबदला मिळू शकलेला नाही. म्हणून सभापती महोदय, आपल्या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे की, या गरीब शेतक-यांना वेळेवर मोबदला न दिल्यामुळे आणि 11 वर्षानंतर हा निधी देण्यात येत असल्यामुळे त्या शेतक-यांना शासकीय नियमाप्रमाणे व्याजासहीत मोबदला देण्यात येणार आहे काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : जमिनीचा मोबदला देण्यासाठी सद्याचे शीघ्र गणक दर विचारात घेतलेले आहेत. त्यामुळे आताच्या शीघ्र गणक दराप्रमाणे शेतक-यांना जमिनीचा मोबदला मिळणार आहे. त्यामुळे त्यांना व्याज देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रमेश शेंडगे : जमिनीच्या मोबदल्यापोटी 90.65 लाख रु. अनुदान वर्ग झालेले आहे. या जमिनी कोणत्या योजनेसाठी संपादित केल्या होत्या. सदरहू योजना केव्हा सुरु झाली व ती पूर्ण होण्यास अजून किती वर्षे लागणार आहेत ? सांगली जिल्ह्यातील जत, कवठेमहांकाळ, आटपाडी हे कायम दुष्काळी तालुके आहेत. या कायम दुष्काळी तालुक्यातील योजना कार्यान्वित होण्यासाठी किती निधी आलेला आहे ? किती निधी खर्च झालेला आहे आणि राहिलेल्या योजना कधी पूर्णत्वास जाणार आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार : या प्रकल्पाला मूळ प्रशासकीय मान्यता दिनांक 8.9.1977 ला मिळाली. त्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक 27.5.94ला देण्यात आली. प्रकल्पाची मूळ किंमत 28.67 कोटी रु. होती. या प्रकल्पावर आतापर्यन्त जवळपास 26 कोटी रु. खर्च झालेला आहे. कालाव्यासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्याचा हा प्रश्न आहे. ...

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या संदर्भातील कार्यवाही केव्हा पूर्ण होईल असा प्रश्न उपस्थित केला आहे. एका वर्षाच्या आत ही संपूर्ण कार्यवाही पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. मी सभागृहाला हेही सांगू इच्छितो की, जिल्हाधिकाऱ्यांकडे निधी दिलेला असून निवाडा मंजूर झाला आहे. निधीचे वितरण शेतकऱ्यांपर्यंत प्रत्यक्षात लवकरात लवकर होईल. ही कार्यवाही येत्या एक-दोन महिन्यात होईल. आम्ही स्वत: त्याबाबत पाठपुरावा करु.

सभापती : सन्माननीय मंत्रीमहोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी प्रश्न विचारला त्या अनुषंगाने भूसंपादनाचा प्रस्ताव तयार झाल्यानंतर कलम 4 ची नोटीस काढण्यात येते, त्यानंतर ज्यावेळी अंतिम निर्णय होतो तोपर्यंतचा मधला काळ असतो त्या काळाचे सुध्दा व्याज देण्यात यावे अशी कायद्यामध्ये तरतूद आहे. त्याचा विचार या प्रश्नाच्या अनुषंगाने करता येईल का? असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न होता.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, हे खरे आहे की 11 वर्षे उलटून गेली आहेत. दिनांक 1.11.1977 च्या शासन निर्णयानुसार जो डिले झालेला आहे त्याबाबत संबंधित शेतकऱ्यांना भुईभाडे देण्याची कार्यवाही शासन करेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात द्राक्ष पिकांचे फार मोठया प्रमाणात झालेले नुकसान

(६) * २३८ श्री. जयप्रकाश छाजेड , श्री. उल्हास पवार , श्री.मोहन जोशी , श्री.सय्यद जमा , श्री. सुभाष चव्हाण , श्री. चरणसिंग सप्रा , श्री. जयंत पाटील , श्री.कपिल पाटील , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. संजय केळकर , श्री. चंद्रकांत पाटील : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील दीड लाख एकर द्राक्ष बागांचे पाण्याअभावी माहे नोव्हेंबर, २००९ मध्ये फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी व चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तातडीची कोणती मदत केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.रणजित कांबळे, डॉ.विजयकुमार गावित यांच्याकरिता : (१) नाही.

(२) व (३) प्राथमिक पाहणीत द्राक्ष पिकांचे नुकसान झाल्याचे आढळून आले नाही. सबब, शेतकऱ्यांना मदत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, नाशिक जिले के सिन्नर तालुके में बड़े पैमाने पर द्राक्ष का नुकसान हुआ है और इस बारे में माननीय मंत्री महोदय ने कहा है कि यह सही नहीं है और प्राइमाफेसी रिपोर्ट में ऐसा कुछ नहीं आया है. मैं मंत्री महोदय से जानना चाहता हूँ कि क्या द्राक्ष के उत्पादकों की तरफ से नुकसान के बारे में कोई असेसमेंट सर्वे हुआ है और क्या उन्होंने नुकसान भरपाई देने के लिए सरकार को कोई निवेदन दिया है ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हा प्रश्न अवकाळी पाऊस येण्यापूर्वीच्या काळातील आहे. ऑक्टोबर महिन्यामध्ये ट्रिमिंग पिरिएड असतो तेव्हा शेतकऱ्यांनी पाऊस कमी होता म्हणून गंगापूर धरणातून पाणी सोडण्याची विनंती केली होती. 4 तारखेला धरणे आंदोलन केले होते. 7 तारखेला शासनाने पाणी सोडले. अनायासे 9 तारखेला पाऊस झाला म्हणून पाणी थांबविण्यात आले. तेव्हापर्यंत द्राक्ष पिकाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नव्हते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.238.....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आपल्या सर्वांना आणि महाराष्ट्र शासनाला देखील ज्ञात आहे की, नाशिक जिल्हा हा द्राक्ष बागायतीसाठी प्रसिध्द आहे. नाशिक जिल्हयामध्ये फार मोठया प्रमाणात द्राक्षाचे उत्पादन घेतले जाते. प्रश्नामध्ये जरी नोव्हेंबर महिन्याचा उल्लेख केला असला तरी ऑक्टोबर महिना असेल, सप्टेंबर महिना असेल ज्या ठिकाणी पाणी कमी पडले तेथील फळबागांचे नुकसान झाले आहे. मी स्वत: त्या भागामध्ये एका कार्यक्रमासाठी गेलो असताना एका फळबागेची पाहणी केली आहे. हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असल्यामुळे असे झाले नाही असे सांगून चालणार नाही. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, एका महिन्याच्या आत त्या जिल्हयातील फळबागांची फेरतपासणी करणार आहात का? नुकसान झाले असेल तर शासन त्यांना मदत देणार आहे का?

श्री.रणजित कांबळे : हा प्रश्न वेगळा आहे. त्याचे कारण असे की, प्रश्नामध्ये पाण्याअभावी नुकसान झाले किंवा नाही असे विचारण्यात आले होते. ऑक्टोबर महिन्याअखेर पाण्याअभावी बागायतीमध्ये पाणी सोडले पाहिजे अशी मागणी होती. पाणी जास्त झाले म्हणून नुकसान झाले असाही एक प्रश्न होता. पाण्याअभावी नुकसान झाले आहे का? या प्रश्नाला उत्तर 'नाही' असे आहे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, द्राक्षावर टाऊनी रोगाचा प्रादुर्भाव झाला आणि पाण्यामुळेही नुकसान झाले. द्राक्ष पिकावर टाऊनी रोगाचा प्रादुर्भाव झाला हे खरे आहे का?

श्री.रणजित कांबळे : हा प्रश्न वेगळा आहे.

नंतर श्री.खर्चे..

अशुधारित प्रत/ग्रंथपालीसाठी नाही

कल्याण (जि.ठाणे) येथील हनुमाननगर भागात
चिकुन गुनियाची झालेली लागण

(7) * 1670 श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. चरणसिंग सप्रा , श्री.सय्यद जमा : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कल्याण (पुर्व) (जि.ठाणे) भागातील हनुमाननगर येथील कुष्ठरुग्ण वसाहत आणि आजूबाजूच्या परिसरात चिकुनगुनिया सदृश्य आजाराचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे ऑक्टोबर, 2009 च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या भागातील स्वच्छतेकडे महापालिकेचे होत असलेले दुर्लक्ष या आजाराला कारणीभूत असल्याचा, तेथील रहिवाशाचा आरोप आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने तातडीने या परिसरातील चिकुन गुनियाची साथ आटोक्यात आणण्यासाठी कोणती उपाययोजना केली व उक्त साथीच्या रोगाला कारणीभूत असणाऱ्या महापालिकेतील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. भास्कर जाधव, श्री. अशोक चव्हाण यांच्याकरिता : (1) होय.

(2) व (3) हे खरे नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात जलजन्य व किटकजन्य साथीच्या आजाराचा प्रादुर्भाव होऊ नये, यास्तव साथरोग नियंत्रण कृती आराखडा महानगरपालिकेने तयार केला असून महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागांच्या समन्वयाने त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

श्री. सय्यद जमा : महोदय, या प्रश्नाला मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे म्हणून मी उपप्रश्न विचारु इच्छित नाही.

<u>तारांकित प्रश्न क्रमांक 346</u>

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील विज प्रकल्पातून निर्माण होणारी अर्धी वीज राज्याला मिळण्याबाबत करावयाची अंमलबजावणी

(9) * 1228 **श्री. अरविंद सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री.परशुराम उपरकर , श्री.किरण पावसकर** : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्रात वीजेचे भारनियमन लागू असून राज्यातील विजनिर्मिती कंपन्या चढ्याभावाने बाहेरच्या राज्यांना विजेची विक्री करीत आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, आता राज्यातील वीजनिर्मिती प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेपैकी 50 टक्के वीज राज्यातच विकण्याची सक्ती करणारा प्रस्ताव शासनाने तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर प्रकरणी प्रस्तावाची अंमलबजावणी झाल्यास, राज्यात मोठया प्रमाणावर वीज उपलब्ध होईल, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, राज्यातील खाजगी वीज प्रकल्पांना शासनाने अनेक सोईसुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(5) असल्यास, पायाभूत सुविधांबाबत शासनाचे स्पष्ट धोरण नसल्याने व त्याची माहिती उर्जा विभाग माहिती घेत आहे, हे ही खरे आहे काय ?

श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (1) होय हे खरे आहे.

(2) शासनाने दिनांक 28/3/2005 रोजी खाजगी गुंतवणूक करुन 500 मे.वॅ.व यावरील क्षमतेचे प्रकल्प महाराष्ट्रात उभारण्यासाठी शासकीय निर्णय जाहिर केला होता. सामंजस्य करार केलेल्या प्रकल्पामधून निर्माण होणारी 50 टक्के वीज राज्याने खरेदी करावी याचा त्यात समावेश आहे.

(3) अंशत: खरे आहे.

(4) खरे आहे.

(5) हे खरे नाही. विद्युत कायदा 2003 नुसार विद्युत निर्मिती परवाना मुक्त केला आहे. त्यामुळे राज्यात पायाभूत सुविधा परस्पर प्राप्त करुन प्रकल्प उभारण्यात येतात. त्यामुळे अशा प्रकारच्या प्रकल्पांची माहिती ऊर्जा विभागाकडे असत नाही. प्रकल्पास शासनामार्फत पायाभूत सुविधा उपलब्ध करताना ऊर्जा विभागाची पूर्व परवानगी घेतल्यास सदर प्रकल्पांची नोंद ऊर्जा विभागात घेण्यात येते.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, राज्यातील वीजनिर्मिती प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विजेपैकी 50 टक्के वीज राज्यातच विकण्याची सक्ती करणारा प्रस्ताव शासनाने तयार केला आहे, हे खरे आहे काय असे विचारले आहे. त्याला उत्तर देतांना सांगितले की, सामंजस्य करार केलेल्या प्रकल्पामधून निर्माण होणारी 50 टक्के वीज राज्याने खरेदी करावी याचा त्यात समावेश आहे. तिसऱ्या प्रश्नाला मात्र अंशत: खरे आहे. प्रश्न असा आहे की, किती वीज नक्की आपल्या राज्यात निर्माण होणार आहे व त्यापैकी किती विकली जाणार आहे ? तसेच यातून राज्याच्या विजेची गरज किती प्रमाणात पूर्ण होणार आहे ?

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1228.....

श्री. विजय वडेट्टीवार : महाराष्ट्रात भारनियमन लागू असून राज्यातील वीज निर्मिती कंपन्या चढ्या भावाने बाहेरच्या राज्यांना विजेची विक्री करीत आहेत, हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारलेला असून त्या अनुषंगाने मला सभागृहाला अशी माहिती द्यावयाची आहे की केंद्रशासनाचा सन 2003 चा जो विजेचा कायदा आहे तो सर्व राज्यांसाठी सारखाच लागू आहे त्यातील सेक्शन 14 नुसार वीजनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांना कुठल्याही लायसेन्सची गरज नाही. दुसरे असे की, याच कायद्यातील कलम 42 (3) नुसार वीज निर्माण झाल्यानंतर ती वीज कुठेही व कोणालाही विकण्याची मुभा आहे. परंतु राज्याने सन 2005 मध्ये खाजगी कंपन्यांना वीज निर्मितीची परवानगी देण्याबाबतचे जे धोरण आखले आहे त्याप्रमाणे 500 मेगावॅटच्या वर वीज निर्माण करणाऱ्या कारखान्यांना काही सवलती जाहीर केल्या होत्या. त्या सवलतींचा जवळपास 8 कंपन्यांनी फायदा घेतला व त्यांची नावे सुध्दा माझ्याकडे आहेत, आवश्यक असेल तर मी ती नावे वाचून दाखवू शकतो. प्रश्न असा आहे की, राज्यातील वीज राज्याबाहेर विकली जाते काय ? त्यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, फक्त दोनच कंपन्या अशा आहेत त्या म्हणजे टाटा वीज संयंत्र क्र 8 मधील 92 मेगावॅट वीज आणि मेसर्स इंडोरमा सिन्थेटिक प्रा.लि मधील 69 मेगावॅट वीज आणि दुसऱ्या एका कंपनीची 72 मेगावॅट एवढीच वीज राज्याबाहेर विकली जाते. याचे कारण त्यांना चढ्या भावाने आपल्या विजेपोटी दर मिळतो. पण राज्यसरकारला ज्यावेळी आवश्यकता भासते त्यावेळी यापेक्षाही कमी दराने इतर राज्याकडून आपण वीज खरेदी करीत असतो. ही वीज खरेदी करीत असताना जवळपास जिंदाल कंपनीकडून 4.40 प्रति मेगावॅट, जेएसडब्ल्यूपीटीसी कंपनीकडून 4.50 पैसे प्रति युनिट, जिंदाल छत्तीसगड या कंपनीकडून 3.78 प्रति युनिट आणि लॅमको कंपनीकडून 4.98 प्रति युनिट अशा सात कंपन्यांकडून आपण आवश्यकता पडली तर कमी दरात वीज खरेदी करीत असतो. विजेचा कायदा असल्यामुळे कंपन्यांवर आपण त्यांनी वीज कुठे विकावी यावर बंधन घालून शकत नाही परंतु त्यांना ज्या सोईसवलती आपण दिल्या त्याऐवजी त्यांनी आपली 50 टक्के वीज राज्यालाच दिली पाहिजे या अनुषंगाने आपण धोरण स्वीकारले असून त्या धोरणानुसार त्या कंपन्यांनी आपल्याला वीज दिली पाहिजे.

यानंतर श्री जुन्नरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने कहा है कि सेन्ट्रल गवर्नमेंट के इलेक्ट्रिकसिटी एक्ट के मुताबिक महाराष्ट्र शासन ने 2005 में विद्युत उत्पादन के लिए निजी कंपनियों को अनुमति देने की नीति जाहिर की है. मेरा प्रश्न यह है कि यह परमीशन कॅप्टिव यूज के लिए दी गई या कॉमर्शियल यूज के लिए दी गई है ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि सेन्ट्रल एक्ट के मुताबिक सरप्लस इलेक्ट्रिकसिटी जितनी पैदा करते हैं, उतनी इलेक्ट्रिकसिटी राज्य को देने का प्रावधान है या नहीं ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, कमर्शिअल आणि कॅपीटीव्ह या दोघांसाठी सुध्दा सवलत आहे. सन 2005 च्या धोरणानुसार शासन वीज निर्माण करणा-या कंपन्यांना ज्या सोयीसवलती देते त्यामध्ये प्रकल्पासाठी लागणा-या रस्त्याची सुविधा, पाण्याची सुविधा, कोळसा लिंकेज तसेच प्रकल्पासाठी लागणा-या इतर काही सुविधा असतील, स्टॅम्प ड्यूटी तसेच नोंदणी शुल्कात 100 टक्के सवलत, जकातीमध्ये सुध्दा 100 टक्के सवलत शासनाकडून दिली जाते. राज्यात सरप्लस वीज निर्माण झाली पाहिजे यासाठी शासन वीज कंपन्याना सवलत देत असते. जेएसडब्ल्यू, टाटा पॉवर, रिलायन्स, इस्पात एनर्जी, सेंट्रल इंडिया, जीएमएसआरआय अशा आठ कंपन्यांपैकी जेएसडब्ल्यू लिमिटेड या कंपनीनेच 500 मेगावॅट वीज निर्माण करण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे. शासनाने वीज निर्माण करणा-या कंपन्यांना सवलती दिल्या असल्या तरी बाकीच्या कंपन्यांनी अजून पर्यंत वीज निर्मितीला सुरुवात केलेली नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, धोरणामध्ये विसंगती कशी आहे त्याची माहिती शासनाने आपल्या उत्तरात दिलेली आहे. उत्तरात म्हटले आहे की, "विद्युत कायदा 2003 नुसार विद्युत निर्मिती परवाना मुक्त केला आहे. त्यामुळे राज्यात पायाभूत सुविधा परस्पर प्राप्त करुन प्रकल्प उभारण्यात येतात." खरे म्हणजे शासनानेच रस्ते, पाणी निर्माण केलेले असते. त्यामुळे रस्ते आणि पाणी त्या कंपन्या परस्पर कुठून आणणार आहेत ? या कंपन्याना कोळसा पाहिजे असेल तर तो रेल्वेनेच येईल. फार फार तर त्या कंपन्या फॅक्टरीपर्यंत त्यांच्या खर्चाने रुळ टाकतील. त्यांना जी काही सुविधा पाहिजे असेल तर ते पैसे केंद्रसरकारला किंवा राज्यसरकारला भरत असतील त्यामुळे अशा प्रकल्पांची माहिती ऊर्जा खात्याकडे असू नये का ? या राज्यामध्ये कोणीही

. . . G2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

यावे, प्रकल्प टाकावेत, सोयीसवलती घ्याव्यात आणि वरुन म्हणायचे की, आम्ही तुम्हाला वीज देणार नाही, कारण काय तर केंद्रशासनाचा कायदा आहे ? राज्य विजेच्या तुटवडयात असतांना त्यांनी राज्याला वीज द्यावयची नाही म्हणजे काय ? आपण आताच सांगितले आहे विद्युत कंपन्याकडून आम्ही अंशत: वीज घेणार आहोत. ज्यानी राज्याच्या सवलतीचा फायदा घेतला त्यांना तुम्ही अट घालणार ? त्यामुळे या ठिकाणी आपण जो "परस्पर" शब्द वापरला त्याचा अर्थ काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : आदरणीय श्री. रावते साहेबांना मी सांगू इच्छितो की, वीज कंपन्या सुरु करतांना अगोदर कोणत्याही प्रकारच्या लायसन्सेसची आवश्यकता नव्हती. नवीन जे प्रोजेक्ट आहे ते ऊर्जा विभागाकडे कोणत्याही प्रकारची परवानगी मागत नव्हते. त्यांना परस्पर पाण्याची परवानगी मिळत होती, परस्पर कोल-लिंकेज मिळत होते त्यामुळे 17 फेब्रुवारी, 2009 रोजी यासंदर्भात एक जी.आर. काढण्यात आला. त्या जी.आर.मध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्रात विजेच्या संदर्भात कोणताही प्रकल्प उभा करावयाचा असेल तर त्यांनी ऊर्जा विभागाची परवानगी घेतली पाहिजे, असे झाल्यामुळेच ते आमच्याशी बाईंडीग होतील. ज्या ठिकाणी वीज तयार केली जाते ती वीज ती कंपनी कोठेही विकू शकत होती यासंदर्भात केंद्र शासनाचा कायदा होता. परंतु आज आपल्या राज्याला विजेची गरज असल्यामुळेच या विद्युत प्रकल्पांना आपण सवलती देत आहोत.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, यह बात सही है कि इलेक्ट्रिकसिटी एक्ट के मुताबिक विद्युत उत्पादन के लिए केन्द्रीय सरकार लाइसेंस देती है, लेकिन उसके बाद कई मामलों में राज्य सरकार परमीशन देती है. उदाहरण के लिए जमीन एक्वायर करने के लिए राज्य सरकार की मदद की जरुरत होती है और प्रदूषण कंट्रोल के लिए प्रदूषण बोर्ड की परमीशन की जरुरत होती है. मेरा प्रश्न यह है कि महाराष्ट्र शासन की नीति के मुताबिक जब एम.ओ.यू. करते हैं तो क्या आप उनके ऊपर बंधन लगाएंगे कि अगर आप इतनी पावर जनरेट करेंगे तो उसमें से कुछ पावर आप राज्य को देनी चाहिए.

यानंतर श्री. गायकवाड.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1228.....

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय,राज्य सरकारने काढलेल्या जी.आर. नुसार वीज कंपन्यांना या सुविधा देत असतांना या प्रकल्पातून निर्माण होणा-या वीजे पैकी जास्तीत जास्त 100 टक्के आणि कमीत कमी 50 टक्के वीज त्यांनी राज्याला दिली पाहिजे.ज्यावेळी या प्रकल्पाना सुविधा देण्याचे धोरण राज्य सरकारने जाहीर केले होते त्यावेळी 50 टक्के वीज त्यांनी राज्याला दिली पाहिजे असे ठरविण्यात आले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, जी परिस्थिती समोर आलेली आहे त्या अनुषंगाने. सध्याच्या परिस्थितीमध्ये बदल करण्यात यावा या दृष्टीने राज्य सरकार केन्द्र सरकारकडे प्रस्ताव सादर करणार आहे काय ? वीज निर्मिती प्रकल्पांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देत असतांना छोटया गावामधील तसेच मोठया महानगरामधील स्थानिक स्वराज्य सस्थाचेसुध्दा काही प्रश्न निर्माण होत असतात म्हणूनच राज्य सरकारच्या संबंधित विभागाकडून त्यांनी एकाच वेळी परवानगी घेऊन पायाभूत सुविधाच्या मिळविण्याच्या बाबतीत सुसुत्रीकरण केले पाहिजे. त्याचबरोबर हे प्रकल्प राज्यामध्ये उभे करीत असतांना ते जरी परवानगी घेत नाहीत असे म्हणत असले तरी त्या प्रकल्पामध्ये भूमीपुत्रांना नोकरीत प्राधान्य देण्याच्या दृष्टीने शासन त्या कंपन्यावर बंधन घालणार आहे काय , तसेच या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज राज्य सरकारलाच मिळावी या दृष्टीने केन्द्र सरकारकडे काही प्रयत्न करण्यात येणार आहे काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांना मी सांगू इच्छितो की,दिनांक 17 डिसेंबर 2009 रोजी केन्द्रीय उर्जा मंत्र्यांकडे या संदर्भात एक बैठक बोलावली असून त्या बैठकीसाठी राज्याचे उर्जा मंत्री, उर्जा राज्य मंत्री आणि माननीय मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. या प्रकल्पामध्ये 80 टक्के स्थानिक व्यक्तिंना रोजगार उपलब्ध करुन द्यावा या दृष्टीने राज्य सरकार जरुर त्यांच्यावर बंधन घालणार आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले आहे त्यामुळे यासंबंधीची स्थिती चांगल्या प्रकारे स्पष्ट झालेली आहे. त्याबद्दल विभागाचे आभार मानले पाहिजेत. या प्रकल्पाला लागणारी जमीन आणि पाणी या राज्यातीलच वापरले जाणार आहेत . प्रसंगी सिंचनासाठी लागणारे पाणी तोडून त्या प्रकल्पाच्या घशात घालण्यात येत आहे. त्याचबरोबर या प्रकल्पासाठी सगळया सुविधासुध्दा देण्यात येणार आहे. या उत्तरामध्ये स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की,2003 सालाचा जो कायदा आहे त्या कायद्यानुसार त्या कंपन्यांवर कोणत्याही प्रकारचे बंधन नाही " ही गोष्ट खरी आहे. कारण हा केन्द्र सरकारचा कायदा असून त्या कायद्या नुसार या कंपन्या देशातील कोणालाही वीज विकू शकतात परंतु त्यांना वीज प्रकल्पासाठी सगळया सोयी सुविधा राज्य सरकारकडून दिल्या जातात.त्यांचा प्रकल्प उभा होई पर्यंत एक गाजर म्हणून हा सामंजस्य करार समोर ठेवण्यात आलेला आहे.केन्द्र सरकारच्या कायद्यावर हा सामंजस्य करार मात करु शकत नाही. महाराष्ट्रातील जनतेला खरी स्थिती जाणून घेण्याचा अधिकार आहे . काही भांडवलदाराचे खिसे भरण्याचे हे काम सुरु आहे.आज आपल्याला विजेची गरज आहे.मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, सामंजस्य करार हा केन्द्रीय कायद्याच्या विरोधात राहू शकत नाही. प्रकल्प उभारण्यासाठी ती कंपनी आपल्या राज्यातील सोयी सुविधा वापरणार आहेत.येथील सिंचनाचे पाणी तोडून त्या प्रकल्पाला देण्यात येणार आहे.महाराष्ट्राला त्या कंपन्यांनी वीज दिली पाहिजे असे त्या कायद्यात म्हटलेले नाही.सामंजस्य करारातील 50 टक्के वीज देण्याच्या बाबतीत जे गाजर दाखविण्यात आलेले आहे ते कायदेशीररीत्या त्यांच्यावर बंधनकारक नाही. ही गोष्ट खरी आहे काय ? प्रकल्प उभा होईपर्यंत ही वीज सोयीनुसार येथे विकावयाची आणि नंतर मात्र कायद्याचा बडगा दाखवून मोकळे व्हायचे असे तर या कंपन्याकडून घडणार नाही ना?म्हणून मला माननीय मंत्रिमहोदयांना पॉईन्टेड प्रश्न विचारावयाचाआहे की,सामंजस्य करार हा केन्द्रीय कायद्यावर बंधनकारक असू शकत नाही ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबतीत मी त्यांना संगू इच्छितो की, कोणालाही पाठिंबा देण्याचा हा विषय नाही आठ प्रकल्पाच्या संदर्भात राज्य शासनाने जरुर एम.ओ.यु. करार केलेला आहे परंतु त्या पैकी फक्त एम.जे.एस. डब्ल्यु.लिमिटेड या कंपनीने काम सुरु केलेले आहे बाकीच्या

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कंपन्यांची अजून काम सुरु करण्याची मानसिकता दिसून येत नाही .त्यामध्ये त्यांना काही अडचणी येत आहेत. विजेच्या बाबतीत आपल्याकडे कमतरता असल्यामुळे सामंजस्य करार करण्यात आला आहे. 2005 साली जो सामंजस्य करार केला होता तो केन्द्र सरकारच्या कायद्याला छेद देऊ शकत नाही असे असले तरी राज्यातील जी वीज टंचाई आहे त्यावर उपाययोजना करण्यासाठी राज्य सरकारला हा सामंजस्य करार करावा लागला आहे. राज्य सरकारने 2005 साली जो सामंजस्य करार केला होता . या संदर्भात निश्चितपणें माहिती घेण्यात येईल आणि केन्द्रीय उर्जा मंत्र्यांनी 17 तारखेला दिल्लीला बैठक बोलावली असून त्या बैठकीत त्यांच्याबरोबर चर्चा होईल आणि त्या नंतर यासंबंधीची सविस्तर माहिती सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दगडपारवा (जि.अकोला) प्रकल्पाच्या कामाची सद्य:स्थिती

(10) * 44 **श्री. वसंतराव खोटरे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री.दिलीपराव सोनवणे** : **तारांकित प्रश्न क्रमांक 50193 ला दिनांक 1 जून, 2009 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) दगडपारवा (जि.अकोला) येथील प्रकल्पाच्या कामासाठी उपलब्ध करण्यात आलेल्या निधीतून अपुर्ण असलेली पुच्छ कालवा व इतर कामे पुर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,
(2) नसल्यास, प्रत्यक्ष कामांची सद्य:स्थिती काय आहे,
(3) तसेच, या बाबतीत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (1) दगडपारवा प्रकल्पाच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निधीतून पुच्छ कालव्याची कामे पुर्ण झाली असून इतर कामे पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(2) पुच्छ कालव्याचे काम पूर्ण झालेले आहे.
डाव्या कालव्याचे काम पूर्ण झाले असून उजवा कालवा व त्यावरील उपकालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत. पुच्छ कालव्याच्या पुढील भागामधील नदी रुंदीकरणाची कामे सा.क्र. 0 ते 2700 मी. मधील पुर्ण झाली आहेत. सा.क्र.2700 ते 3930 मी. मधील कामे सद्य:स्थितीत कास्तकारांच्या विरोधामुळे बंद आहे.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माझ्या पहिल्या लेखी प्रश्नाला उत्तर देताना माननीय राज्यमंत्र्यांनी म्हटले आहे की, कालव्याची कामे पूर्ण झाली असून इतर कामे पूर्ण करण्याची कार्यवाही सुरू आहे. तर ही इतर कामे कोणती आहेत ? आणि जी कामे अपूर्ण आहेत ती किती दिवसात पूर्ण आपण करणार आहात ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, या धरणाच्या उजव्या कालव्याचे काम 0 ते 2700 मी.पर्यंतचे पूर्ण झालेले असून 2700 ते 3930 मी. चे म्हणजे 1200 मीटरचे काम जे शहरातून जाते तेवढेच काम त्यांच्या अडवणुकीमुळे थांबलेले आहे. वाटाघाटीने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला पण तो सुटला नाही. तरीही शासनाचे त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. या उजव्या कालव्याच्या कामासंबंधात तेथील 100 टक्के लोकांनी निवेदन देऊन सांगितले आहे की, हे काम करू नका आणि 60 टक्के लोकांनी विरोध केला आहे तरीही इतर लोकांचा विचार करून 60 टक्के काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरित काम जून 2010 पर्यंत पूर्ण होईल.

***

.....आय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने नविन आरोग्य विषयक अभ्यासक्रम सुरु करतांना निश्चित पात्रतेची अट न ठेवल्याची बाब

(11) * 1267 डॉ. दीपक सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. अरविंद सावंत : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) आरोग्य विद्यापीठाने नव्या अभ्यासक्रमांना मान्यता देताना किमान बीएससीची पात्रता ठेवलेली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, आयुर्वेद शाखेसाठी काही अभ्यासक्रमांना मात्र दहावी-बारावीची किमान पात्रत व कोणत्याही विद्याशाखेची मुभा ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर निरनिराळे प्रमाणपत्र अभ्यासक्रम कोर्स सुरु करण्याची खास काही कारणे आहेत काय,
(4) असल्यास, अल्पावधी अभ्यासक्रमाकरिता प्रवेश देतांना निश्चित अशा शैक्षणिक पात्रतेची अटी/शर्ती न ठेवण्याची काय कारणे आहेत,
(5) असल्यास, सदर अल्पावधी अभ्यासक्रमाकरिता 10, 20 ते 40 हजार रुपयांचे शुल्क आकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय ?

श्रीमती वर्षा गायकवाड, डॉ.विजयकुमार गावित यांच्याकरिता : (1) हे अंशत: खरे आहे. वैद्यकीय विद्याशाखेंतर्गत सुरु करण्यात आलेल्या फक्त डी.एम.एल.टी. पदविका, ब्लड बँक टेक्निशियन प्रमाणपत्र अभ्यासक्रम, मेडीकल जेनेटीक्स प्रमाणपत्र अभ्यासक्रम, मेडीकल रिप्रोडक्टीव जेनेटीक्स प्रमाणपत्र या अभ्यासक्रमांसाठी किमान पात्रता बी.एस्सी. ठरविण्यात आली आहे.
(2) होय, आयुर्वेद विद्याशाखेच्या खालील प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी किमान पात्रता दहावी-बारावी ठेवण्यात आलेली आहे.

1) शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्स इन आयुर्वेदीक डाएटीज
2) सर्टिफिकेट कोर्स इन कल्टीवेशन अँड मार्केटींग ऑफ आयुर्वेदीक मेडीसिनल प्लांटस्
3) सर्टिफिकेट कोर्स इन आयुर्वेदीक कॉस्मेटीक्स
4) सर्टिफिकेट कोर्स इन असिस्टंट नर्सिंग इन आयुर्वेद

(3) होय, जे विद्यार्थी एम.बी.बी.एस. यासारख्या आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक शिक्षणाची संधी मिळावी तसेच त्यायोगे रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी विविधप्रकारचे कोर्सेस विद्यापीठामार्फत सुरु करण्यात आले आहेत/येत आहेत.
(4) विविध प्रकारचे अल्पावधी अभ्यासक्रम व त्यासाठी प्रवेशपात्रता निर्धारित करण्याचे काम संबंधित विद्याशाखेचे निर्धारित करण्याचे काम संबंधित विद्याशाखेचे अभ्यासमंडळ व त्या शाखेतील विषयतज्ञ यांचेकडून केले जाते. त्यामुळे अल्पावधी कोर्सकरिता प्रवेश देताना निश्चित अशा शैक्षणिक पात्रतेच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्यांनाच संबंधित अभ्यासक्रमास प्रवेश दिला जातो.
(5) होय. अभ्यासक्रम व त्याच्या कालावधीनुसार विविध रकमेची शुल्क आकारणी केली जाते. तथापि, सदर शुल्क निश्चितीबाबत पुनर्विचार करण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.... आय 3 ..

ता.प्र.क्र. 1267 ...

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी मूळ प्रश्न विचारताना विचारले होते की, आरोग्य विद्यापीठाने नव्या अभ्यासक्रमांना मान्यता देताना किमान बीएससीची पात्रता ठेवलेली आहे हे खरे आहे काय ? त्यावर उत्तर देताना मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, हे अंशत: खरे आहे. तर मग अंशत: खरे म्हणजे नेमके काय आहे ? तसेच पुढे उत्तरात असे म्हटले आहे की, वैद्यकीय विद्याशाखेंतर्गत सुरू करण्यात आलेल्या फक्त डीएमएलटी पदविका, ब्लड बँक टेक्निशियन प्रमाणपत्र अभ्यासक्रम, मेडिकल जेनेटिक्स प्रमाणपत्र अभ्यासक्रम, मेडिकल रिप्रोडक्टिव जेनेटिक्स प्रमाणपत्र या अभ्यासक्रमांसाठी किमान पात्रता बीएस्सी ठरविण्यात आली आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, डीएमएलटी म्हणजे डिप्लोमा इन मेडिकल लॅब टेक्निशियनचा कोर्स आणि यासाठी हा कोर्स जेव्हा राज्य सरकार आणि इतर संस्था हा अभ्यासक्रम चालवित होते त्यावेळेस म्हणजे माझ्यावेळी किंवा सन्माननीय मंत्री डॉ.गावित जेव्हा मेडिकलला होते त्यावेळी या कोर्ससाठीची पात्रता ही केवळ इंटर सायन्स होती. ती आता बीएस्सी का झाली ? कारण हा साधा डिप्लोमा कोर्स आहे, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा कोर्स नाही. तसेच ब्लड बँक टेक्निशियन प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी देखील बीएस्सी उत्तीर्ण या पात्रतेची गरज आहे असे मला वाटत नाही, तरी त्याबद्दल माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. तिसरे म्हणजे आणखी इतर हे जे सगळे कोर्सेस आहेत ते आपण का तयार करता आहात ? त्याला कोठेही कौन्सिल नाही. गेल्या वर्षी महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठाने या बाबतीत आम्हाला सांगितले की, मेडिकल शाखेचे म्हणजे एमबीबीएस साठीचे प्रवेश झालेले आहेत त्यामुळे या वर्षी यासाठी कसे काय प्रवेश घेणार ? सभापती महोदय, मी स्वत: डायरेक्टरांकडे हा प्रश्न उपस्थित केला होता की, यासाठी सीइटी पास झालेले जे लोक आहेत पण ज्यांना प्रवेश मेडिकल शाखेला मिळणार नाही त्या लोकांना अशा प्रकारचे कोर्सेसना जाण्याची संधी मिळावी म्हणून हे पॅरामेडिकल कोर्सेस ठेवले जातात. तर यांना देखील आपण सीईटी ठेवणार आहात काय ? तसेच यासाठी कौन्सिल असणे आवश्यक आहे. सभापती महोदय, माननीय श्री.वळसे-पाटील आणि माननीय श्री.सुरेश शेट्टी हे या विभागाचे तत्कालीन मंत्री व राज्यमंत्री होते त्यावेळी या संबंधात आमचे जे ठरले होते त्याचे नेमके काय झाले ?

.... आय 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, जे काही डीएमएलटी आणि इतर जेनेटिक्स कोर्सेस आहेत त्यामध्ये बेसिकली आता सन्माननीय सदस्य डॉ.सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे पात्रता होती पण आता आपण 12वी नंतर हे कोर्स सुरू करीत होतो. आता यामध्ये दोन प्रकार आहेत. 12वी नंतर आणि बीएस्सीनंतर देखील हे कोर्स सुरू केलेले आहेत. कारण आपण हाफकिन संस्थेमार्फत या कोर्सेसना प्रवेश दिलेले आहेत. ..

(यानंतर श्री. सरफरे ... जे 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1267...

डॉ. विजयकुमार गावित...

याठिकाणी आपण मेडिकल रिप्रॉडक्टीव्ह जेनेटीक्स प्रमाणपत्र अभ्यासक्रम करीत आहोत. हे करीत असतांना त्यामध्ये जे मेडिकल ग्रॅज्युएट्स आहेत, लाईफ सायन्स ग्रॅज्युएट्स आहेत, किंवा अलाईड सब्जेक्ट्स असलेले पदवीधर आहेत त्यांच्याकरिता सहा महिन्यांचा कोर्स सुरु करीत आहोत. त्यापैकी एक जेनेटीक्सचा कोर्स आहे. बाकीचे कोर्स अजून सुरु करावयाचे आहेत. म्हणून याठिकाणी अंशत: म्हटले आहे. त्यामुळे बी.एस्सी. झाल्यानंतर डीएमएलटी हा कोर्स सुरु केला आहे. तो सर्वसाधारणपणे दोन वर्षासाठी आहे. बाकीचे कोर्स जेनेटीक्स संदर्भातील आहेत. त्यामध्ये ब्लड बँक टेक्निशिअन्सचा सहा महिन्यांचा कोर्स आहे. आणि तो विद्यापीठामार्फत चालविला जाणार आहेत. तो अंशत: असल्यामुळे त्याचा याठिकाणी उल्लेख केला आहे. याठिकाणी आपण पॅरामेडिकल टेक्नॉलॉजीचे कोर्सेस पदवीधर लोकांसाठी सुरु करीत आहोत असे विचारले आहे. परंतु त्यांचा या प्रश्नाशी संबंध नसल्यामुळे ते अजून सुरु झाले नाहीत. आता आपण सहा महिन्यांचा जेनेटिक्सचा कोर्स सुरु केला आहे. आणि म्हणून ग्रॅज्युएटनंतर डीएमएलटीचा दोन वर्षाचा कोर्स सुरु करणार आहोत.

डॉ. दीपक सावंत : आपण पॅरामेडिकल कौन्सिलबाबत उत्तर दिले नाही....

डॉ. विजयकुमार गावित : यामध्ये बोर्ड ऑफ स्टडीज, ॲकॅडमिक कौन्सिल आहे, त्याचबरोबर मॅनेजिंग कौन्सिल आहे, त्यांना विद्यापीठामध्ये अशाप्रकारचे कोर्सेस सुरु करण्याचा अधिकार आहे. तशाप्रकारचा अधिकार त्यांना असल्यामुळे त्यांनी हे कोर्सेस सुरु केले आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : माननीय सदस्यांनी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करु नये. मी आपणास उपप्रश्न विचारण्यास संधी देतो.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, तिसऱ्या प्रश्नाला उत्तर देतांना असे म्हटले आहे की, "जे विद्यार्थी एम.बी.बी.एस., बी.ए.एम.एस. यासारख्या आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक शिक्षणाची संधी मिळावी तसेच त्यायोगे रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी विविध प्रकारचे कोर्सेस विद्यापीठामार्फत सुरु करण्यात आले आहेत/येत आहेत". याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. परंतु या छोटया छोटया कोर्सेससाठी 10 हजार, 20 हजार, 40 हजार रुपये फी ठेवली आहे. यामुळे आपला मूळ उद्देश साध्य होणार आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. विक्रम काळे....

उत्तराच्या शेवटी म्हटले आहे की, "सदर शुल्क निश्चितीबाबत पुनर्विचार करण्यात येत आहे". आपण हे शुल्क निश्चित करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे? तसेच, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी कमीत कमी फी किती दिवसात निश्चित करण्यात येणार आहे?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, काही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कोर्सेस सुरु होणार आहेत त्यांची जी फी निश्चित करावयाची असेल, त्याचप्रमाणे खाजगी वैद्यकीय महाविद्यालयामधील फी निश्चित करावयाची असेल ती करीत असतांना विद्यापीठाचे प्रतिनिधी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक, व कॉलेजेसची जी बॉडी असेल त्यांच्याबरोबर बसून फी निश्चित केली जाईल. त्या कोर्सेसची फी जास्त राहणार नाही याची काळजी घेतली जाईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, यामध्ये आयुर्वेदिक अभ्यासक्रम आहेत. बेरोजगार तरुण व महिला प्रशिक्षणार्थींना या कोर्सेसचा लाभ मिळाला पाहिजे, आणि त्यामधून त्यांना रोजगार मिळाला पाहिजे. याकरिता हे चारही कोर्सेस उपयुक्त आहेत. माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी विचारलेल्या प्रश्नाप्रमाणे या कोर्सेसची फी निश्चित करणे गरजेचे आहे. ही फी निश्चित करीत असतांना महानगरपालिकेच्या बजेटमधून सबसिडी मिळावी याकरिता त्यांच्याबरोबर समन्वय साधणार काय? तसे केले तर त्याचा बराच फायदा होईल. आज खाजगी विद्यापीठामध्ये 5 ते 10 हजार रुपये फी कमी करुन विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्याकरिता विद्यार्थ्यांच्या फीच्या रकमेचे संरक्षण करण्यासाठी आपण महानगरपालिकेबरोबर समन्वय साधणार काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1267 . . . .

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले की, महानगरपालिका आहे, विद्यापीठाचे सदस्य आहेत, डायरेक्टरच्या ऑफीसमधील कोणी सदस्य किंवा डायरेक्टर यांच्याबरोबर एकत्र बसून निश्चितपणे फी नक्की केली जाईल आणि कोर्स सुरु होण्यापूर्वी ही फी निश्चित केली जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, महाराष्ट्राचे हे दुर्दैव आहे, पण जर आपण साऊथ मध्ये गेलात तर तेथे 200-300 असे अनेक पॅरामेडिकल कोर्सेस सुरु झालेले आहेत. पण आपण हे साधे कोर्सेस सुरु करण्यासाठी सुध्दा वेळ घेत आहोत. माननीय मंत्री महोदयांनी मघाशी सांगितले की, यासाठी ॲकॅडमिक कौन्सिलची मान्यता पाहिजे.पण तसे काही नाही. सिनेटमध्ये आपण आहात आणि मी देखील आहे. परंतु हा विषय सिनेटमध्ये कधीही चर्चेसाठी येत नाही. जे कौन्सिल करावयाचे असते, ते डायरेक्टर ऑफ मेडिकल एज्युकेशन यांच्या मदतीने करावयाचे असते. त्यांनी फॉर्म्युलेट करावयाचे असते हे आपल्याला कदाचित माहिती नसेल. म्हणून मी आपल्याला माहिती करुन देत आहे. सभापती महोदय, मघाशी चुकीची माहिती रेकॉर्डवर आलेली आहे, ती काढून टाकण्यात यावे. दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, ज्या विद्यार्थ्यांना एम.बी.बी.एस.ला प्रवेश मिळत नाही आणि मग ते हवालदिल होतात. फिजिओथेरपीला ॲडमिशन मिळते आणि तेथेच ॲडमिशन स्टॉप होते. पण पुढे जे कोर्सेस आहेत, त्याबाबतीत सी.ई.टी.नंतर अशा प्रकारच्या पदविका अभ्यासक्रम घेण्याच्या बाबतीत मी माननीय मंत्री महोदयांना सांगितले होते. सी.ई.टी.मध्ये या अभ्यासक्रमांचा अंतर्भाव करावा की, ज्या विद्यार्थ्यांना पॅरामेडिकल कोर्सेससाठी प्रवेश हवा असेल तर सी.ई.टी.च्या माध्यमातून यासाठी आपण परवानगी देणार आहात काय ? दुसरी महत्वाची बाब आहे की, आपण जेनेटीक्सचा उल्लेख केला. B.Sc. is a vast term. बी.एस्सी विथ फिजिक्स पाहिजे की बी.एस्सी विथ केमिस्ट्री पाहिजे की बी.एस्सी विथ झ्युऑलॅजी पाहिजे की बी.एस्सी विथ बॉटनी पाहिजे ? तुम्हाला काय पाहिजे ? याबाबतीत स्पेसिफाय कधी करणारा आहात ? यासाठी कोणकोणत्या विद्यार्थ्यांनी अर्ज करावयाचा ? जर त्याने अर्ज केला तर त्याचा अर्ज नाकारला जाणार आहे. त्यामुळे बी.एस्सी. म्हणजे काय ? ते अगोदर सांगावे.

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, मी सर्वात प्रथम सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो. त्यांनी असे सांगितले की, पॅरा मेडिकल कौन्सिल असावयास पाहिजे.

. . . .के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1267 . . . .

डॉ.विजयकुमार गावीत...

तसे ते असले पाहिजे,पण हा दुसरा पार्ट आहे. एज्युकेशनच्या पार्टमध्ये विद्यापीठाने कोणते कोर्सेस सुरु करावेत, काय नाहीत हे ठरविण्याचा अधिकार विद्यापीठाला आहे आणि ते मॅनेजिंग कौन्सिल ठरविते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याबाबतीत विद्यापीठाला अधिकार नाही. आपण माहिती घ्यावी आणि त्यासाठी पाहिजे तर हा प्रश्न राखून ठेवावा. हा अधिकार डायरेक्टर ऑफ मेडिकल एज्युकेशन यांना आहे हे मी ठामपणे सांगू इच्छितो. आपण सिनेटवर आहात आणि मी देखील सिनेटवर आहे.

सभापती : मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, अगोदर माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, "The Maharashtra Act X of 1999" नुसार "The Maharashtra Universities of Health Sciences Act, 1998" चे सेक्शन 27 हे "Powers and Functions of Management Council" च्या संदर्भात आहे, त्यात असे म्हटले आहे की, "The Management Council shall exercise the following powers and perform the following duties, namely :-

(a) Make such provisions, as may enable colleges and institutions to undertake specialised studies and, where necessary or desirable, organise and make provision for common laboratories, libraries, museums and equipment for teaching and research :

(b) establish departments, colleges, schools, institutions of higher learning, research and specialised studies, hostels and provide housing for staff, on the recommendation of the Academic Council:"

त्यामुळे त्यांना या पॉवर्स् आहेत आणि त्यानुसार त्यांनी केलेले आहे.दुसरी गोष्ट खरी आहे की, आपण ज्यावेळेला त्यांना प्रॅक्टीस करण्यासाठी परवानगी देऊ,त्यावेळेला कौन्सिलची परवानगी नसल्यामुळे बऱ्याच वेळेस अडचणी निर्माण होतात. म्हणून ज्या पॅरामेडिकल स्टडीज् आहेत, त्या ..

. . . .के-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

साठी आपण कौन्सिल तयार करीत आहोत आणि ही बाब एल ॲण्ड जे.डी. कडे मान्यतेसाठी गेलेली आहे. तिसरा प्रश्न असा आहे की, आपण पॅरामेडिकल मध्ये 19 नवीन कोर्सेस सुरु करीत आहोत आणि आपण एम.एस.सी.आय.टी.मध्ये त्यांचेही इन्ट्रोडक्शन करीत आहोत.

. . . .के-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील वाशी येथून भेसळयुक्त गुटखा व चहा जप्त केल्याची घटना

(१२) *** १४६१ श्री. हेमंत टकले, श्रीमती मंदा म्हात्रे ,डॉ. वसंत पवार , श्री.रमेश शेंडगे : सन्माननीय अन्न व औषधे प्रशासन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१)मॅग्नेशियम कार्बोनेटचा वापर केलेला सुमारे साडेपाच लाख रुपयांच्या गुटखा आणि ५० हजारांचा भेसळयुक्त चहा, अन्न व औषध विभागाने नवी मुंबईतील वाशीतून जप्त केल्याची घटना दिनांक २८ ऑगस्ट, २००९ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रमेश बागवे, श्री.मनोहर नाईक यांच्याकरिता : (१) अंशत: खरे आहे. दि. २५/८/०९ रोजी भेसळयुक्त चहा व खाद्यरंगाचा नमुना घेऊन उर्वरीत रु. ४९,३४०/- किंमतीचा साठा जप्त केलेला आहे. तसचे दिनांक २६/८/०९ रोजी गुटख्याचा रु. ५,५९,३७०/- किंमतीचा साठा जप्त केलेला आहे.

(२) होय. सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली आहे.

(३) (१) गुटखा बाबतच्या कार्यवाहीत गुटख्याचा नमुना अप्रमाणित घोषित करण्यात आला असून त्यात मॅग्नेशियम कार्बोनेट आढळून आले आहे. याप्रकरणी प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे व पुढील तपास चालु आहे.

(२) सदर प्रकरणी विश्लेषणास घेतलेल्या चहा मध्ये खाद्य रंगाची भेसळ केल्याचे आढळून आले आहे. व सदर घटनेबाबत प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला आहे. व आरोपीस अटक करण्यात आली आहे. याबाबत पूढील तपास व चौकशी चालू आहे.

(३) पुढील तपास पूर्ण होताच संबंधितांवर अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई घेण्यात येईल

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, वाशीला भेसळयुक्त गुटखा आणि 50 हजारांचा भेसळयुक्त चहा अन्न व औषध विभागाने पकडला, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. कारण या अधिकाऱ्यांनी लोकांच्या आरोग्याशी खेळण्याचा जो प्रयत्न केला जात आहे, तो हाणून पाडण्याचे काम संबंधित अधिकाऱ्यांनी केलेले आहे. या बाबतीत संबंधितांवर अन्न व भेसळ कायद्याखाली गुन्हा दाखल केला आहे, त्याबद्दल त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. त्याचप्रमाणे नव्या मुंबई अनेक गोडाऊन आहेत. तेथे अनेक प्रकारची भेसळ चालते. मध्यंतरी तूरडाळ, तेल यामध्ये सुध्दा भेसळ करण्यात आली.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे.....

अशी भेसळ शोधून कारवाई कधी करण्यात येईल कारण नव्या मुंबईत जे अन्नधान्य येते त्यामध्ये मोठया प्रमाणात भेसळ केली जाते. त्या संदर्भात लवकरात लवकर कारवाई करुन शासनाने त्याबाबतचे निवेदन द्यावे..

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताईंनी प्रश्न विचारलेला आहे की, डाळी वगैरेमध्ये भेसळ केली जाते, त्याबाबत कारवाई करणार काय? ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारे अन्नामध्ये भेसळ आढळून येईल त्या त्या ठिकाणी कडक कारवाई करण्यात येईल, याबद्दल सन्माननीय सदस्यांनी निश्चिंत रहावे. वाशीमध्ये टाटा इंडिका आणि ट्रक या दोन वाहनातील भेसळयुक्त चहा आणि गुटखा पकडून तो माल जप्त केलेला आहे आरोपीला देखील अटक करण्यात आलेली असून त्याच्यावर अन्न व भेसळ प्रतिबंधक कायदा,1954 प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : संपूर्ण चहाच भेसळयुक्त मिळत आहे. प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 21 वर दुधाच्या भेसळीच्या संदर्भातील प्रश्न आहे. माननीय मंत्रिमहोदयांकाडे गृह विभाग देखील आहे.म्हणून यासंदर्भात अन्न आणि औषध नियंत्रणाची जबाबदारी देखील आपल्यावर आहे. आतापर्यंत वेगवेगळया प्रकारच्या भेसळीच्या संदर्भात गुन्हे दाखल झालेले आहेत त्यातील बहुतेक सर्व लोक जामिनावर सुटून परत भेसळ करायला मोकळे झालले आहेत. हा गुन्हा अजामीनपात्र करण्यात आलेला असे शासनाचे म्हणणे आहे. परंतु. द्रुतगती न्यायालयात हे खटले उभे करुन सहा महिन्याच्या आत, निदान वर्षभराच्या आत त्यांना कडक शिक्षा होईल यादृष्टीने कार्यवाही करण्यात येईल काय?

श्री. रमेश बागवे : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी याठिकाणी असा मुद्दा उपस्थित केलेला आहे की, कारवाई केली तरी गुन्हगार सुटतात,म्हणून त्यांच्यावर कडक कारवाई करणार काय? याबाबतीतील कायद्यातील तरतुदींच्या अनुषंगाने आमचे अधिकारी कारवाई करतात पण या गुन्हेगारांना सोडण्याचे काम न्यायालयाचे असते. म्हणून यासबंधात जास्तीत जास्त कडक निर्बंध राहतील अशा तऱ्हेची योजना करण्यात येईल आणि द्रुतगती न्यायालयाच्या वतीने खटले चालवून न्याय देण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी उत्तरात असे म्हटले आहे की, "अहवाल मागविलेला आहे". या अहवालामध्ये काय नमूद केले आहे, कुठल्या कंपनीचा हा माल होता, ज्यांच्यावर शासनाने कारवाई केली आहे त्यांच्यावर कुठली कलमे लावलेली आहेत? आणि जर त्या कंपनीवर कलमे लावलेली आहेत तर उत्तरात असे म्हटलेले आहे की, "पुढील तपास पूर्ण होताच संबंधितांवर अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई करु." म्हणजे अजून तपास झालेला नाही काय आणि त्यांना गुन्हेगार म्हणून शाबित केलेले नाही काय? एखाद्या कंपनीचा तो माल आहे अशी माहिती मिळाली असेल तर त्या कंपनीचे नाव सांगण्यात यावे त्यांच्याकडे शासनाचा परवाना असेल तर तो परवाना रद्द करण्यात येईल काय?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या अनुषगाने सभागृहाला सांगू इच्छितो की, त्या ट्रकमध्ये हिना गुटखा पकडलेला आहे. तो टाटा कंपनीचा ट्रक आहे आणि त्या ट्रकचा नंबर-8137 असा आहे. त्या ट्रकच्या चालकाला आणि मालकाला पकडलेले असून त्या मालकाला अटक करण्यात आली आहे. सुनील गोसावी जोंधळेकर, संजय विद्याधर मिश्रा, योगेश शहा अशा व्यक्तींना अटक केलेली आहे. एका व्यक्तीचे नांव अंजूम असे आहे. त्याचा संपूर्ण पत्ता मिळालेला नाही. आमच्या खात्याच्या माध्यमातून त्याचा शोध घेण्यासाठी कर्नाटक निप्पाणी या ठिकाणी पोलीस गेलेले आहेत. त्या ठिकाणी एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आलेले आहे. त्या व्यक्तीचे नाव अखलाक अमिर शेख असे आहे. या गुन्हयाचा तपास चालू आहे.त्या कंपनीचे नाव हिना गुटखा असे आहे. या कंपनीच्या मालकाला अटक केलेली असून मालकाचे नाव मी सादर केलेले आहे.त्याच्यावर अन्न व भेसळ प्रतिबंधक कायद्यान्वये रीतसर कारवाई केलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना याठिकाणी सगळे विश्लेषण केलले आहे. परंतु या राज्यामध्ये गुटखा बंदी आहे अशी माझी माहिती आहे तर हा हिना गुटखा मार्केटमध्ये कसा मिळतो? हा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, अन्न व औषध प्रशासनामार्फत तपास करण्यात येत आहे. तेव्हा यामध्ये भेसळ आहे की नाही हे तपासून बघण्यासाठी किमान किती वेळ लागतो ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने दि. 19 सप्टेंबर, 2000 रोजी गुटखा बंदीचे आदेश दिले होते.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 1461 .... श्री. रमेश बागवे ...

गुटखा विक्रेते कोर्टामध्ये गेलेले होते. हायकोर्टाने आपल्या बाजूने निर्णय दिलेला होता. त्यांनी सुप्रीम कोर्टामध्ये अर्ज दाखल केला आणि सुप्रीम कोर्टाने गुटखा बंदीचा आदेश 2 ऑगस्ट, 2004 रोजी उठविला. त्यामुळे गुटख्यावरील बंदी उठलेली आहे. गुटख्यावरील बंदी उठलेली असली तरी गुटख्यामध्ये जो मॅग्नेशियम कार्बोनेट नावाचा घटक असतो तो शरीराला अपायकारक असतो आणि तो घटक मिसळल्यामुळे अन्न भेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई करतो. लॅबचा रिपोर्ट येण्यास किती दिवस लागतात अशी विचारणा सन्माननीय सदस्यांनी केली. तो रिपोर्ट 40 दिवसांच्या आत अपेक्षित असतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 2004 साली सुप्रीम कोर्टाने गुटखा बंदी उठवली. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये माननीय मंत्रिमहोदय श्री. अनिल देशमुख यांचे पोस्टर्स लागले होते. लोकांना आनंद झाला होता. हायकोर्टाने मान्यता दिली होती. नंतर ते सुप्रीम कोर्टात गेले. सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला. यामध्ये लोकांच्या आरोग्याचा संबंध असल्यामुळे पाच वर्षे आपल्या वकिलांनी काय केले ? ही तातडीची बाब आहे.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, कोर्टाने गुटखा बंदीवरील आदेश उठविले पण त्याबाबत शासनाच्या वतीने प्रयत्न चालू आहेत. त्या गुटख्यामध्ये जे घातक पदार्थ मिसळलेले असतात त्याबाबतीत आम्ही कारवाई करतो.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. विजय वडेट्टीवार (ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचा सन 2007-08 चा तिसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. प्रकाश सोळंके (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचा सन 2008-09 चा 51 वा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "पुणे येथील पंडित जवाहरलाल बाल सुधारगृहातील 12 मुले भिंतीला भगदाड पाडून पळून जाण्यास वॉचमनने मदत करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, भगवान साळुंखे यांनी "हजारो मागासवर्गीय शिक्षण सेवक तीन वर्षे पूर्ण होऊनही केवळ अप्रशिक्षित असल्याने वेतनश्रेणीपासून नियमबाह्य पध्दतीने वंचित ठेवणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी " दिनांक 7 मार्च, 2009 रोजी सराखा, जि. नागपूर येथे वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना हरणाचे कातडे व 40 किलो मांस यासह रंगेहाथ पकडणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, व्ही. यू. डायगव्हाणे, कपिल पाटील यांनी " नागपूर महानगरपालिका व्यवस्थापनाने त्यांचेकडील माध्यमिक, उच्च माध्यमिक व प्राथमिक शाळा शिक्षक कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगातील सन 1996 ते 1998 पर्यंतच्या थकबाकीची शालेय शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेले 100 टक्के अनुदान इतर कामासाठी वापरणे, शिक्षकांची थकबाकी अद्यापही न देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही. यू. डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी "आदिवासी विकास विभाग अंतर्गत दुर्गम व नक्षलग्रस्त विभागातील विविध शासकीय माध्यमिक आश्रमशाळांवर तीन वर्षासाठी नियुक्ती न देता केवळ एक-एक वर्षासाठी नियुक्ती देणे, शिक्षण सेवकांचा तीन वर्षे सेवेचा काळ पूर्ण होऊनही त्यांना नियमित न करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेतला असून शिक्षकांच्या वेतनवाढीत चार हजार ते नऊ हजार रुपयांचे नुकसान झाल्याने शिक्षकात पसरलेला असंतोष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "शासनाने सन 1991 ते 1999 या कालावधीत नेटसेट परीक्षा उत्तीर्ण असलेल्या अधिव्याख्यात्यांच्या मागण्यांसंदर्भात समिती गठीत करण्याचे आश्वासन देऊन ते न पाळणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मी एका महत्वाच्या विषयावरील औचित्याचा मुद्दा आपल्यासमोर मांडत आहे. विविध पक्षाचे आमदार निरनिराळया मंत्रिमहोदयांना प्रत्यक्ष भेटून किंवा पत्रव्यवहार करुन राज्यात विविध विकासाची कामे चाललेली असतात मग ती आमदार फंडातून चालेली असतील किंवा शासनाने जाहीर केलेल्या विकास कामाची असतील, त्याची माहिती जिल्हाधिकारी यांच्याकडून किंवा मंत्रालयातून घेत असतात. निवडणुकीच्या वेळी निरनिराळया विभागांची पॅकेजेस जाहीर करण्यात आली. त्यानुसार कोकणासाठी 5,235 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. त्या पॅकेजच्या आधारे कोकणात कोणती विकास कामे सुरु झालेली आहेत त्याबाबतचा जी.आर. ना जिल्हयाच्या ठिकाणी उपलब्ध असतो ना विविध खात्यांमध्ये उपलब्ध असतो. त्यामुळे लोकप्रतिनिधींना ठोस अशी माहिती मिळत नाही असे लक्षात आले आहे. विकास कामे शिक्षणासंबंधीची असतील, आरोग्यासंबंधीची असतील, रस्त्यांची असतील त्यासंबंधी शासनाच्या माध्यमातून निर्णय घेतले जातात. त्या निर्णयाची माहिती जी.आर.च्या माध्यमातून लोकप्रतिनिधींना उपलब्ध झाली तर ही सर्व कामे कोठे आणि कशाची चालू आहेत ते समजू शकेल. हे जी.आर.लोकप्रतिनिधींना उपलब्ध व्हावेत यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. शासनाने त्याबाबत ठोस निर्णय घेतला तर लोकप्रतिनिधींना ही माहिती अवगत होईल आणि त्या माहितीचा उपयोग पुढे काम करण्यासाठी होऊ शकेल.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी महत्वाचा विषय औचित्याच्या मुद्याद्वारे मांडलेला आहे. यासंबंधी शासनाने स्टॅंडिंग ऑर्डर्स देऊन जी.आर.च्या प्रती सन्माननीय लोकप्रतिनिधींना मिळण्याच्यादृष्टीने लक्ष घालावे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील सिंधुदुर्ग किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर आहे, या मंदिरासंबंधी मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रामध्ये स्मारक बांधण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी 350 कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. हे स्मारक होत असताना सिंधुदुर्ग किल्ल्यात शिवाजी महाराजांचे राज्यातील एकमेव मंदिर आहे. त्या मंदिराचे सुशोभिकरण करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीत 1.50 कोटींचा प्रस्ताव मंजूर झाल्याची घोषणा करण्यात आली होती. परंतु त्याबाबत अद्याप पुढील कोणतीच कार्यवाही झालेली नाही. या मंदिरासाठी शासनाने ताबडतोब निधी उपलब्ध करुन त्या मंदिराचे सुशोभिकरण करण्यात यावे असा मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी महत्वाचा विषय मांडलेला असल्यामुळे शासनाने लक्ष घालावे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा मांडत आहे. महाराष्ट्र राज्यात 1978 मध्ये अपंग एकात्म शिक्षण योजना सुरु झाली असून सन 1992 च्या राष्ट्रीयकृत कार्यक्रमानुसार ही योजना केंद्र पुरस्कृत योजना प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत कार्यान्वित झाली. या योजनेमध्ये सध्या प्राथमिक स्तरावर 581 युनिट्स व माध्यमिक स्तरावर 117 युनिट्समधून सुमारे 7000 अपंग विद्यार्थी सामान्य शाळेत शिक्षण घेत आहेत. दिनांक 31 मार्च, 1990 नंतरच्या काळात विशेष शिक्षकांचे वेतन व विद्यार्थ्यांच्या सोयी सवलतींसाठी केंद्र शासनाकडून अदा केले जात होते.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

(श्री. रामनाथ मोते....)

केन्द्र शासनाच्या दिनांक 13 एप्रिल 2009च्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या निर्णयानुसार अपंग एकात्म शिक्षण योजना माध्यमिक स्तरावर राबविली जाणार असल्याचे कळविण्यात आलेले आहे. अद्याप यासाठी आर्थिक तरतूद न दिल्यामुळे या युनिटस्मध्ये काम करणा-या शिक्षकांना 8 महिन्यापासून वेतन मिळालेले नाही. सभापती महोदय, या संदर्भात एका शिष्टमंडळाने मुंबईमध्ये आपली भेट घेतली होती. आपण त्यांच्या प्रश्नाचा सहानुभूतीपूर्वक विचार केला आणि सचिव व मंत्रिमहोदयांशी संपर्क साधून याबाबत त्यांना विनंती केली होती आणि लेखी पत्र देखील शिक्षण विभागाला दिलेले होते. दिनांक 16 नोव्हेंबरला दिलेल्या पत्राच्या संदर्भात अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. हे आमचे अपंग, अंध शिक्षक गेल्या 9 महिन्यापासून वेतनापासून वंचित आहेत. आपण या संदर्भात राज्य शासनाला निर्देश देऊन हा विषय मार्गी लावावा अशी मी या औचित्याच्या प्रश्नाद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याची नोंद घेतलेली आहे.

--

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्याच्या रोजगार आणि स्वयंरोजगार खात्यामार्फत महाराष्ट्रभर सेवायोजन कार्यालये सुरु आहेत. त्या कार्यालयामार्फत अनेक बेरोजगार तरुणांना नोक-या मिळतात. सद्य:स्थितीत 40 लाख बरोजगार तरुण वेटिंग लिस्टवर आहेत. कालच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या वेळी असे सांगण्यात आले की, महाराष्ट्रात आणखी पाच हजार नोक-या उपलब्ध होणार आहेत. गेल्या आठवड्यात या खात्याच्या सचिवांनी असे सांगितलेले आहे की, रोजगार आणि स्वयंरोजगार खात्यामार्फत चालविण्यात येणारी सेवायोजन कार्यालये बंद करण्यात येणार आहेत. त्याऐवजी करिअर गाईडन्स असा विभाग सुरु करण्यात येणार आहे. या करिअर गाईडन्स मार्फत बेरोजगार तरुणांना नोक-या मिळणार नाहीत तर फक्त गाइडन्स मिळणार आहे. सेवायोजन कार्यालये बंद केली तर महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांवर मोठा अन्याय होणार आहे. रोजगार मिळण्यासाठी

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...)

अनेक बरोजगार तरुण आपली नावे सेवायोजन कार्यालयामध्ये नोंदवितात. ही कार्यालये बंद होणार असतील तर ती दुर्दैवाची गोष्ट आहे. दुसरे असे की, करिअर गाईडन्स करण्यासाठी स्टाफ उपलब्ध नाही. त्या खात्याचे बजेट फक्त सात ते सव्वासात कोटी रुपये आहे. सभापती महोदय, ही सेवायोजन कार्यालये बंद करण्याचा रोजगार आणि स्वयंरोजगार विभागाचा बेत हाणून पाडावा आणि सेवायोजन कार्यालये आहे तशी कार्यरत ठेवून त्याद्वारे बेरोजगार तरुणांना नोक-या उपलब्ध करुन द्याव्यात असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सांवत यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याची नोंद घेतलेली आहे.

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, मी खालील सार्वजनिक महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सचका सामना ही मालिका मागील काही काळापासून इलेक्ट्रॉनिक्स मेडियाद्वारे दाखविली जाते. सदर मालिकेत पती-पत्नीना बोलावून अत्यंत खाजगी स्वरुपाचे प्रश्न विचारले जातात. त्या प्रश्नाचे उतर खरे की खोटे बघितले जाते. त्यामुळे अनेक कुटुंबात वैवाहिक जीवनात अविश्वासाचे वातावरण निर्माण होते, कुटुंब व्यवस्थेला धोका निर्माण होतो, संसार हा विचाराचा व विश्वासाचा असतो, संशय जेथे येतो तेथे विचार व विश्वास नांदू शकत नाही. कुटुंबाची जबाबदारी देशाच्या विकासात सामुदायिक सहभाग देण्याची असते. या मालिकेमुळे सामाजिक बंधनाच्या जाणिवाच उद्ध्वस्त होण्याचा धोका आहे. पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे घरे उद्ध्वस्त होतील. पतीपत्नीच्या विश्वासाला हादरे बसतील, असे मनोरंजनाचे कार्यक्रम जे पुन्हा स्त्री-पुरुषांच्या चारित्र्याला केंद्र बिंदू करुन उपभोगवादी सरंजामी जाणिवा जपण्याचे काम करत आहेत याची सभगृहाने दखल घेऊन मलिका त्वरित बंद करण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करावी.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी उपस्थित केलेल्या अैचित्याच्या मुद्याची नोंद घेतलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांची औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. एक अतिशय ज्वलंत असा प्रश्न महाराष्ट्राच्या कानाकोप-यात विचारला जातोय आणि आजच्या वर्तमानपत्रातूनही तो वाचनात आलेला आहे. तो प्रश्न म्हणजे महाराष्ट्रात मूग, ज्वारी, बाजरी, नाचणी यापासून दारु निर्माण करणा-या 45 पैकी 23 कारखान्यांना कॅबिनेटने मंजुरी दिलेली आहे. तर असा निर्णय प्रत्यक्षात घेतला गेला आहे काय ? तसेच यासंदर्भात असे सांगितले जात आहे की, मूग, ज्वारी, बाजरी यांना चांगला भाव मिळावा म्हणून त्यापासून दारु उत्पादनाला परवानगी देण्यात आलेली आहे. तेव्हा उत्पादन शुल्क विभागाने या कारखान्यांना मंजुरी दिलेली आहे काय ? या कारखान्यामुळे लोकांमध्ये निर्माण होणारी व्यसनाधीनता हा एक मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. असे सांगितले जाते की, हे कारखाने विदर्भात उभारले जाणार आहेत.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

परंतु संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हे कारखाने मंजूर केले गेले आहेत. म्हणून आपले संरक्षण आम्हाला हवे आहे. कारण जी जनता या सभागृहापर्यंत पोहोचू शकत नाही किंवा ज्या प्रश्नांना सभागृहाबाहेर न्याय मिळू शकत नाही अशा वेळेला सभागृहातून त्यावर ठोस काय निर्णय झाला हे कळू शकते. आमच्या असेही वाचनात आले की, पूर्वी त्या प्रकल्पांना मान्यता दिली गेली. मग नवीन प्रकल्पांना स्थगिती दिली आहे का? नसल्यास ती स्थगिती देण्यात यावी. या प्रश्नाकडे औचित्याच्या माध्यमातून मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. आपण या संदर्भात विशेष लक्ष घालून आम्हाला संरक्षण द्यावे वशासनाला निर्देश द्यावेत अशी विनंती करते.

सभापती : सन्माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांनी हे प्रकरण स्वत: पहावे. मी स्वत: देखील जातीने लक्ष देतो.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कामकाज पत्रिकेवरील बाबीसंबंधी</u>

सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना, शासकीय विधेयक आणि अशासकीय कामकाज यापैकी लक्षवेधी सूचना आज पूर्ण करण्यात येतील. दोन शासकीय विधेयक आहेत. माझी सभागृहाला विनंती आहे की, दोन्ही शासकीय विधेयक आजच पारित करण्याच्या दृष्टीने सहकार्य करावे.

श्री.दिवाकर रावते : अशासकीय कामकाज सोमवारी विशेष बैठक घेऊन त्या विशेष बैठकीमध्ये पूर्ण करण्यात यावे.

सभापती : कार्यक्रमपत्रिकेवरील कोणतीही बाब आपण रद्द करायची नाही असे ठरले आहे. अशासकीय ठराव आज होतील. पूर्ण न झाल्यास ते रद्द होणार नाहीत. पुढील काळात ते घेण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : अशासकीय कामकाज आज पूर्ण न झाल्यास विशेष बैठकीमध्ये घेण्यात यावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, 11 नोव्हेंबर, 2009 रोजी कोयना परिसरात भूकंप झाला होता. त्या संदर्भातील नुकसानभरपाई मिळण्यासाठी मी अशासकीय ठराव दिलेला आहे व तो आज चर्चेला येणार आहे. योगायोगाने आजची तारीखही 11 आहे. त्यामुळे हा ठराव आजच चर्चेला घेण्यात यावा.

सभापती : ठीक आहे. तीन अशासकीय ठरावांपैकी सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली व सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे अशासकीय ठराव अनुक्रमे 26 व 11 पुढे ढकलण्यात येत आहेत, डॉ.नीलम गोऱ्हे यांचा अशासकीय ठराव क्रमांक-70 आज चर्चेला घेण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : म्हाडातर्फे अनुसूचित जाती जमातीसाठी राखून ठेवण्यात आलेल्या घरांच्या वितरणामध्ये झालेला गैरव्यवहार

मु. शी. : म्हाडातर्फे अनुसूचित जाती जमातीसाठी राखून ठेवण्यात आलेल्या घरांच्या वितरणामध्ये झालेला गैरव्यवहार यासंबंधी श्री.सुभाष चव्हाण,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, बांद्रा यांनी अनुसूचित जाती जमातीसाठी ठेवण्यात आलेल्या राखीव कोट्यातील घरांचे अर्ज बनावट दलालांनी हलखुर्द, कातकरवाडी (ता.खालापूर,जि.रायगड) येथील काही आदिवासींची आर्थिक पात्रता नसतानाही त्यांच्या नांवे अर्ज भरुन स्वस्तात घरे हडपण्याचा कट माहे नोव्हेंबर, २००९ मध्ये वा त्यादरम्यान दक्षता विभागाने उघडकीस आणणे, याबाबत विशेष पोलीस महानिरिक्षक तथा, मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी तसेच हलखुर्द, कातकरवाडी येथील फसवणूक केलेल्या आदिवासींनी पोलीस अधिक्षक, अलिबाग, जि. रायगड येथील पोलीस स्टेशनला वारंवार तक्रार करुनही पोलीसांकडून अद्याप कोणतीही कारवाई करण्यात न येणे, यामुळे म्हाडामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढत असल्याचे आढळून येणे, सबब रायगड जिल्ह्यातील हलखुर्द व कातकरवाडी येथील आदिवासींच्या नावाने खोटी कागदपत्रे सादर करुन त्यांची फसवणूक करणाऱ्या विरुध्द कारवाई करण्याची तसेच सध्या म्हाडामध्ये होत असलेला भ्रष्टाचार रोखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मला आपल्या परवानगीने निवेदनामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. पृष्ठ क्रमांक-2 वरील पहिल्या परिच्छेदातील दुसऱ्या ओळीतील "श्री.संतोष वाघमारे व इतर 15 जणांचे अर्ज प्रतिक्षा यादीसाठी यशस्वी ठरले" या ऐवजी "श्री.संतोष वाघमारे, श्री.नाना वाघमारे, श्री.गणपत वाघमारे व इतर 13 जणांचे अर्ज प्रतिक्षा यादीसाठी यशस्वी ठरले" असे वाचावे.

लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे सुधारणा केल्याप्रमाणे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : निवेदन सुधारल्याप्रमा□ सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, अनुसूचित जाती जमातीसाठी राखीव कोट्यातील घरासाठी उपलब्ध असलेल्या म्हाडाच्या फॉर्मवर काही दलालांनी आदिवासी लोकांची नावे भरुन आरक्षणाचा गैरफायदा घेतला. शासनाने निवेदनात म्हटले आहे की, 139 आदिवासी लोकांकडून म्हाडाचे सदनिकांसाठीचे फॉर्म भरुन घेतले. म्हाडाचे मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी यांनी ही माहिती गोळा करुन त्याबाबतची चौकशी करण्यासाठी कोणत्या प्रकारचा पत्रव्यवहार पोलीस अधीक्षक, रायगड यांच्याशी केला आहे का?

श्री.सचिन अहिर : होय. पत्रव्यवहार केला आहे.

श्री.सुभाष चव्हाण : त्या संदर्भात आतापर्यंत कोणती कारवाई झाली आहे?

श्री.सचिन अहिर : याबाबत दक्षता विभागाला एक निनावी फोन आल्यानंतर या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली गेली. या सर्व प्रकारच्या फॅक्ट्स होत्या आणि प्रथमदर्शनी म्हाडाची फसवणूक झाली असल्याचा अहवाल तयार करुन खालापूरचे पोलीस अधीक्षक यांच्याशी पत्रव्यवहार करण्याचे काम केले. शेवटी पत्रव्यवहार करीत असताना त्यांच्याकडून कोणताच प्रतिसाद न मिळाल्याने त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांशी पत्रव्यवहार करण्याचे काम केले. हा पत्रव्यवहार केल्यानंतर 29 जणांचे जबाब देखील नोंदवून घेण्याचे काम केले गेले व जे आदिवासी आहेत त्यांची चौकशी करण्याचे काम देखील झालेले आहे.

(नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ज्या ज्या वेळी शासनाने अशा प्रकारच्या योजना जाहीर केल्या त्या त्या वेळेस जास्तीत जास्त एजंटांचा सुळसुळाट होतो. म्हणून आजपर्यंत अशा किती दलालांवर कारवाई केलेली आहे ?

श्री. सचिन अहिर : महोदय, अशा चांगल्या योजना शासनाने जाहीर केल्यानंतर काही एजंट परस्पर या योजनेच्या माध्यमातून गैरप्रकार करण्याचे प्रयत्न करीत असतात आणि अशा तक्रारी वेळोवेळी प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार उचित कारवाई सुध्दा शासनाने केलेली आहे. त्या धर्तीवर आजपर्यंत 33 लोकांवर कारवाई केलेली असून एफआयआर सुध्दा दाखल केले आहेत तर काही एजंटांना अटक केली असून त्यांच्या केसेस कोर्टात सुरु आहेत.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आदिवासी कुठेच गेले नाहीत तर केवळ त्यांचे नाव वापरुन 29 सदकिा हडपण्याचा हा प्रयत्न केलेला आहे. ज्यावेळेस आपण या प्रश्नाला उत्तर दिले त्यावेळेस शेवटी सांगितले की आदिवासी लोकांना बोलावून त्यांची चौकशी करण्यात आली. परंतु आदिवासींचे म्हणणे असे आहे की, आमचा या प्रकरणाशी संबंधच नाही तर त्यांच्या नावे म्हाडाचीच फसवणूक केलेली आहे. तसेच निवेदनात आपण म्हटले आहे की, श्री नरेंद्र शर्मा अथवा त्यांचे साथीदार यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यासारखा सकृतदर्शनी पुरावा आढळून न आल्याने सदर प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. सुरुवातीलाच आपण दिलेले आहे की, आदिवासींची आर्थिक पात्रता नसतांना तसेच अनामत रक्कम स्वत: भरुन उर्वरित रकमेचा स्वत: फायनान्स उपलब्ध करुन देऊ अशी बतावणी करुन म्हाडाच्या सोडतीतील आरक्षणाचा गैरफायदा घेऊन 139 आदिवासी लोकांकडून म्हाडाचे फॉर्म भरुन घेतले. परंतु आदिवासींच्या नावाने ही म्हाडाचीच फसवणूक करण्यात आलेली आहे. त्यासाठी लागणारी रक्कमही या एजंटांनीच भरले आणि नंतरचा पैसा सुध्दा त्यांनीच उभा केला. तरी देखील आपण सकृतदर्शनी पुरावा आढळून न आल्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला नाही, असे निवेदनात म्हटले आहे. परंतु एवढे सर्व केल्यानंतर देखील आपल्याला या कृत्यात पुरावा आढळून आला नाही का?

श्री. सचिन अहिर : महोदय, उत्तरात जे म्हटले आहे ते दौलत वाघमारे यांचे स्टेटमेंट रेकॉर्ड करण्याचे काम केले आहे. हे स्टेटमेंट रेकॉर्ड केल्यानंतर एस.पी. शी पत्रव्यवहार केला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ....

की, अशा प्रकारचे स्टेटमेंट आमच्या व्हिजीलन्स ऑफिसरने रेकॉर्ड केलेले असून याबाबत योग्य ती पुढील कारवाई करावी. सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करायला पाहिजे होती व ती न करता आपण म्हटल्यानुसार 29 आदिवासींना चौकशीसाठी बोलावून त्यांची चौकशी करण्याचे काम पोलिसांनी केले आहे. ही बाब प्रथमदर्शनी माझ्याही लक्षात आली होती की, एजंटामार्फत या आदिवासींची आर्थिक क्षमता नसतानाही त्यांचे पैसे भरुन योजनेचा फायदा उठविण्याचे काम झालेले आहे. अशा प्रकारे सदनिका हडप करुन त्यांच्या पध्दतीने ती विकण्याचे प्रयत्न होत असतात. म्हणूनच सकृतदर्शनी म्हाडाची फसवणूक झालेली आहे व त्या अनुषंगाने माननीय गृहमंत्र्यांना, गुन्ह्यांची नोंद करुन पुढील कारवाई करण्याबाबत विनंती करण्यात येईल. कारण आम्हाला कारवाई करण्यासाठी काही मर्यादा आहेत.

.....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई, ठाणे व नवी मुंबई परिसरात वाढत असलेले दरोड्यांचे प्रमाण

मु.शी.: मुंबई, ठाणे व नवी मुंबई परिसरात वाढत असलेले दरोड्यांचे प्रमाण यासंबंधी सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे वि.प्र. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नवी मुंबईतील खारघर स्थित युको बँकेवर दिनांक १३ एप्रिल, २००९ वा त्या सुमारास पडलेल्या सशस्त्र दरोडयात ७२ हजार रुपयांची लूट होणे, तसेच ठाणे जिल्हयातील सी.बी.डी.बेलापूर परिसरात दिनांक १८ एप्रिल, २००९ रोजी दरोडेखारांनी घातलेल्या सशस्त्र दरोडयात एका नागरिकाचा झालेला मृत्यू, तसेच ३ मे, २००९ रोजी मुंबईतील नायगाव येथील अपना सहकारी बँकेवर सशस्त्र दरोडेखोरांनी दरोडा घालून सुमारे ३० लाख रुपयांची चोरी करणे, बृहन्मुंबईत व नवी मुंबई परिसरात सतत दरोडेखोरांनी घातलेल्या सशस्त्र दरोडयाच्या थैमानामुळे नागरिकांत पसरलेले भीतीचे व तीव्र चिंतेचे वातावरण व दरोडेखोरांना अटक करण्यात पोलिसांना आलेले अपयश सबब संबंधित दरोडेखोरांना तातडीने अटक करण्याची स्थानिक नागरिकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया"

श्री. आर.आर.पाटील (गृह मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मुंबई व ठाणे परिसरात मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या वाढत आहे. या भागात महिलांचे मंगळसूत्र तसेच इतर दागिने जाण्याचे प्रकारही वाढत आहेत. निरनिराळ्या ठिकाणी दरोड्यांचे प्रकार होत आहेत. ठाणे जिल्ह्यातील दोन चार महिन्यांच्या काळात पाच-सहा ठिकाणी दरोडे पडले आहेत. त्याचप्रमाणे बँकांवर दरोडे पडण्याचेही प्रकार वाढतच आहेत. त्यात सी.टी. बँक असेल अथवा देना बँक असेल अशा बँकांवर सुध्दा दरोड्यांचे प्रमाण वाढत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर

उत्तरामध्ये म्हटले आहे की, "काही ठिकाणी आरोपी सापडलेले नाहीत, तर काही ठिकाणी 7 पैकी 2 आरोपी सापडले व बाकीचे सापडले नाही". घटना घडून 7 महिने उलटून गेले तरी सुध्दा बँकेवर दरोडे टाकणारे आरोपी सापडत नाही ही बाब गृहविभागाला लाजिरवाणी आहे. गृहविभागाने बँकाना सीसी कॅमेरे लावले पाहिजेत, सुरक्षा रक्षक ठेवले पाहिजेत अशा सूचना केल्या असतीलच. शासनाच्या नियमाप्रमाणे बँकेने सुरक्षा रक्षक ठेवले आहेत की, नाही याची तपासणी गृह विभागाकडून केली जात असते त्यामुळे आपण अशा प्रकारची तपासणी केली आहे काय ? कोणकोणत्या बँकानी सुरक्षा रक्षक ठेवले नाहीत किंवा ज्या बँकानी सी.सी. कॅमेरे लावले नसतील त्यांच्यावर आपण कारवाई केलेली आहे काय ? कारवाई केली नसेल तर आपण तशा प्रकारची कारवाई करणार आहात काय ? बँकावर आणि घरांवर जे दरोडे पडत आहेत त्यासंदर्भात शासन कोणत्या प्रकारची ठोस उपाययोजना करणार आहे ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्या बँकानी शासनाच्या नियमांचे पालन केले नाही त्यांच्यावर दरोडेखोरांनीच कारवाई केलेली आहे. विनोदाचा भाग सोडला तर एक गोष्ट खरी आहे की, संबंधित पोलीस स्टेशनच्या सूचनांचे पालन बँका करीत नाहीत. दोन्ही बँकावर जो दरोडा पडला त्याचा तपास होऊ शकला नाही. दोन्ही बँकाचे तपास करण्याची निदेश मी क्राईम शाखेला दिलेले असल्यामुळे दोन्ही बँकांचा तपास मुंबई क्राईम शाखा करेल. दोन बँकापैकी एका बँकेने वॉचमन नेमला होता परंतु त्याच्या हातात कोणत्याही प्रकारचे हत्त्यार नव्हते. बँका जर वॉचमनसाठी शस्त्र परवाना मागत असतील तर असे शस्त्र परवाने बँकांच्या शिफारशीवरुन वॉचमनसाठी उपलब्ध करुन दिले जातील. या दोन्ही बँकांवर बँक उघडत असतांनाच दरोडे पडलेले आहेत. बँका उघडण्याच्या वेळेस पोलिसांची गस्त वाढविण्यात येईल व शासनामार्फत योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या पहिल्या पॅरात म्हटले आहे की, पहिल्या गुन्हयामध्ये अनोळखी इसमांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत. आरोपींचे रेखा चित्र तयार करुन वर्तमान पत्रांना तसेच केबलवर माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे किती आरोपींचे रेखाचित्र कोणत्या वर्तमानपत्रात आणि कोणत्या केबलवर दिलेली आहेत याची माहिती दिली तर बरे होईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, नेहमीच्या पध्दतीने रेखाचित्र प्रसिध्द केलेले आहे व कोणत्या वर्तमानपत्रात रेखाचित्र प्रसिध्द केले आहे याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जिल्हा जळगाव येथील औद्योगिक वसाहतीमधील सुंदरपुरीया स्टील ॲन्ड रोलर फ्लोअर मिलमध्ये स्वस्त धान्य दुकानातील लाखो रुपये किमतीचा गहू आढळून येणे.

मु. शी. : जिल्हा जळगाव येथील औद्योगिक वसाहतीमधील सुंदरपुरीया स्टील ॲन्ड रोलर फ्लोअर मिलमध्ये स्वस्त धान्य दुकानातील लाखो रुपये किमतीचा गहू आढळून येणे यासंबंधी श्री दिलीपराव सोनवणे, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, विक्रम काळे वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अन्न धान्य महामंडळाचा शिक्का असलेल्या स्वस्त धान्य दुकानातून वितरीत करावयाची सुमारे एकवीस लाख रुपये किंमतीच्या स्वस्त गव्हाच्या गोणी जळगांव औद्योगिक वसाहतीमधील सुंदरपुरीया स्टील ॲन्ड रोलर फ्लोअर मिल मध्ये आढळून येणे, तसेच 35 लाख किमतीच्या गव्हाच्या रिकाम्या गोण्या आढळणे, जिल्ह्यातून तसेच पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यातील शासकीय शिक्के असलेल्या गोण्या आढळणे, गेल्या अनेक वर्षापासून बहुतांशी मिल मध्ये शासकीय गव्हाचा सर्रासपणे गैरव्यवहार करणारी टोळी असणे, गोरगरीब जनतेला अन्न धान्यापासून वंचित ठेवून आटा, मैदा तयार करुन काळया बाजाराद्वारे पैसा कमविण्याचा अवैद्य धंदा सर्रासपणे चालविणे, याबाबत शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, सबब शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व याबाबत शासनाची भूमिका."

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) ..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप सोनवणे : सभापती महोदय, जळगाव जिल्हयातील एमआयडीसी मधील सुंदरपुरीया स्टील ॲन्ड रोलर फ्लोअर मिल मध्ये जवळ जवळ 50 लाख रुपये किमतीचा स्वस्त धान्य दुकानातील गहू जप्त करण्यात आला. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील बीपीएल कार्ड धारकांसाठी तसेच अंत्योदय योजनेतील गोरगरींबासाठी असलेला गहू गोळा केला जातो. जिल्हयातून, महाराष्ट्रातून नव्हे तर पंजाब, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश या ठिकाणावरुन एफसीआयचा शिक्का असलेल्या धान्याची पोती सापडलेली आहेत. त्या ठिकाणी अशा प्रकारचा गहू गोळा करुन आटा, रवा, मैदा, पशू खाद्य तयार करुन त्यावर गृहलक्ष्मीचा शिक्का मारुन या मालाची सर्रासपणे विक्री केली जाते. गोरगरींबासाठी जे धान्य शासन उपलब्ध करुन देत असते ते धान्य या मिलमध्ये गोळा केले जाते. त्या ठिकाणी 21 लाख रुपये किमतीच्या गव्हाची पोती, 35 लाख रुपये किमतीच्या रिकाम्या गव्हाच्या गोण्या तसेच 1600 क्विंटल गहू प्रत्यक्ष आढळून आलेला आहे. उत्तरामध्ये "अटक" केलेली आहे असे म्हटलेले आहे. या ठिकाणी स्वस्त धान्य दुकानातील गहू गोळा करण्याचे मोठे रॅकेट असून अनेक मिलमध्ये अशा प्रकारचा सर्रास धंदा सुरु आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, या घटनेमध्ये मोठया लोकांचा, अधिका-यांचा, पदाधिका-यांचा संबंध आहे काय ? याचा तपास होणे आवश्यक आहे. त्यामुळे रेशन दुकानदार आणि फ्लोअर मिल मालक-चालक यांच्यावर कारवाई होणार आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे ..

अशा रेशन दुकानदारांची नावे सांगण्यात येणार आहे काय, तसेच त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येणर आहे काय, त्याचप्रमाणे 75 हजार रुपयांचा बेवारस गहू महानगरपालिकेच्या साने गुरुजी दवाखान्याच्या पडक्या इमारतीमध्ये आढळून आला होता. त्याबाबतीत पोलिसांकडे तक्रार करण्यात आली होती परंतु त्यासंदर्भात पुढे कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही . परवाना निलंबित करण्याची कारवाई करण्यात येईल असे सांगण्यात येते परंतु प्रत्यक्षात ही कारवाई केली जात नाही. काही वेळा ती कारवाई केली जाते आणि लगेच त्यांना परवाना दिला जातो त्यामुळे संबंधित दुकानदार पुन्हा दुकान सुरु करतात तेव्हा या बाबातीत सबंधिताविरुध्द शासनाकडून कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय व्यापक स्वरुपाचा प्रश्न विचारलेला आहे. जळगाव येथे ही घटना घडली आहे ही गोष्ट खरी आहे. एका फलोअर मिलमध्ये मोठया प्रमाणावर गव्हाचा साठा सापडला असून त्या मिलचे मालक श्री. महेंद्र अग्रवाल यांच्या विरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा 1955 मधील कलम 3 व 7 अंतर्गत कारवाई करण्यात आली असून त्यांना अटकही करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर हा माल देखील जप्त करण्यात आला आहे. तसेच येथून पुढे ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या घटना घडतील त्याबाबतीतही संबंधिताविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती वाढत आहेत त्यामुळे जे व्यापारी या वस्तुंचा साठा करतील त्यांच्याविरुध्द शासन कडक कारवाई करील.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, निवेदनामध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की, "जानेवारी 2009 ते नोव्हेंबर 2009 या कालावधीत जिल्हयात 2299 तपासण्या करण्यात आल्या असून त्यामध्ये दोषी आढळलेल्यां विरुध्द दंड आकारणे, निलंबन करणे ,दुकान रद्द करणे या स्वरुपाची कारवाई करण्यात आलेली आहे." मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की , किती दुकानदारा विरुध्द दंड आकारणी केली, किती दुकानाराविरुध्द परवाना निलंबनाची कारवाई केली आणि किती दुकानदानाराच्या विरुध्द परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात आली आहे ?

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना संपूर्ण राज्यातील माहिती देऊ इच्छितो . त्यानुसार संपूर्ण राज्यात 50 हजार स्वस्त धान्याची दुकाने असून त्याची तपासणी केल्यानंतर 39 हजार 607 दुकानदार किरकोळ दोषी आढळून आले, 861 दुकानदार मध्यम दोषी स्वरुपाचे आणि 746 दुकानदार गंभीर दोषी आढळून आले आहेत त्या पैकी 435 दुकानदारांचे लायसेन्सचे निलंबन केलेले आहे. 456 दुकानदारांचे लायसेन्स रद्द केलेली आहेत आणि 30 लाख रुपयांच्या आसपास दंड आकारण्यात आलेला आहे. त्याचबरोबर 121 व्यक्तींना अटक करण्यात आली आहे . धान्य साठा करण्याच्या बाबतीत राज्य सरकारने जी मर्यादा घालून दिलेली आहे त्यापेक्षा एखाद्या व्यापा-याने जास्त धान्याचा साठा केला असेल तर त्या साठेबाज व्यापा-याच्या विरुध्द सुध्दा जीवनावश्यक वस्तू कायदा 1955 अंतर्गत कारवाई करुन 47 व्यक्तीना आतापर्यंत अटक करण्यात आली आहे.पुढील काळातसुध्दा जे व्यापारी साठेबाजी करतील त्याच्याविरुध्द शासन कडक कारवाई करील..

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, महानगरपालिका प्रशासनाच्या साने गुरुजी दवाखान्याच्या पडक्या इमारतीमध्ये जवळजवळ 75 हजार रुपयाचा गहू सापडला असून त्याबाबतीत तक्रार करण्यात आली असून माननीय मंत्रिमहोदयांनी उदत्तर देतांना सागितले की या बाबतीत कारवाई करण्यात येईल. मला असे विचारावयाचे आहे की, या प्रकरणी जी स्पेसिफिक तक्रार करण्यात आली आहे त्याबाबतीत चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.अनिल देशमुख : अवश्य चौकशी केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्यासंबंधी

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, मघाशी मी औचित्याचा मुद्दा मांडला होता परंतु आता माननीय गृह मंत्री सभागृहात उपस्थित असल्यामुळे त्यांच्याकडून खुलासा व्हावा म्हणून मी हा मुद्दा पुन्हा मांडू इच्छिते.त्यासाठी आपण मला परवानगी द्यावी.

उपसभापती : ठीक आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की , धान्या पासून मद्यार्क तयार करण्याच्या संदर्भात संपूर्ण् राज्यातील अनेक संघटना आणि संस्था आम्हाला प्रश्न विचारत आहेत. आमच्या पक्षानेसुध्दा त्याबाबतीत स्पष्ट भूमिका घेतलेली आहे . ज्वारी, बाजरी, नाचणी या धान्यावर प्रक्रिया करुन दारु बनविण्याच्या कारखान्यांना शासनाने परवानगी दिली आहे किंवा नाही ...?.

नंतर श्री सुंबरे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ...

23 कारखान्यांना परवानगी दिली आहे असे वृत्त सातत्याने येत आहे. मी या ठिकाणी औचित्त्याच्या मुद्याद्वारे सरकारला विनंती केली आहे की, मद्यार्क निर्मितीला आपण परवानगी देऊ नये आणि आता ही परवानगी दिली आहे तर त्यांना स्थगिती देण्यात यावी. अशा पद्धतीने शेतीचे नियोजन करून शेतीमालावर प्रक्रिया केली पाहिजे हे आम्हाला मान्य आहे. परंतु खाद्य पदार्थांपासून अशा प्रकारे मद्यार्क निर्मिती करावयाची आणि त्यासाठी सबसिडी सरकारने द्यायची हे कितपत योग्य आहे? ही सबसिडी देखील 50 कोटी रूपयांची दिली आहे म्हणजे दर लीटरमागे 10 रूपये सबसिडी झाली याप्रमाणे दारू मुबलक निर्माण होणार आहे. तेव्हा ज्वारी, बाजरी, मका वगैरे धान्यापासून मद्यार्क निर्मितीच्या कारखान्यांना आपण जी परवानगी देण्याचा जो निर्णय घेतला हे तोआपण रद्द करावा अशी मी या औचित्त्याच्या मुद्याद्वारे पुन्हा एकदा विनंती करते. मला आशा आहे सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यावर ठामपणे निर्णय घेतील.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, धान्यापासून मद्यार्क निर्मिती करणाऱ्या काही कारखान्यांना शासनाने परवानगी दिली आहे. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर माझी या संदर्भात चर्चा झाली आहे. वस्तुत: धान्यहे खाण्यासाठीच वापरले गेले पाहिजे आणि जागतिक व देशीय स्तरावर देखील आज धान्याचा तुटवडा आहे. त्याचबरोबर हेही खरे आहे की, केव्हा केव्हा अवेळी पाऊस पडतो त्यामुळे धान्य खराब होते आणि अशा खराब झालेल्या धान्याचा वापर आपण जनावरांसाठी करू शकतो. पण काही वेळेस गुरांचे खाद्य म्हणूनही उपयोग करू शकत नाही इतके धान्य खराब झालेले असते आणि अशा खराब धान्याचा वापर मद्यार्कासाठी केला पाहिजे. परंतु सरसकट चांगले धान्य मद्यार्क निर्मितीसाठी वापरले गेले तर धान्याचा तुटवडा मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. त्यामुळे शासनाने हा जो निर्णय घेतला आहे त्याबाबत शासन जरूर पुनर्विचार करील आणि चांगले धान्य मद्यार्क निर्मितीसाठी निश्चितपणे वापरले जाणार नाही याची दखल घेतली जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण मला हा औचित्त्याचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी दिली त्याबद्दल खरोखरी मी आपला आभारी आहे. त्याचबरोबर मी माननीय मंत्री महोदयांकडे अशीही मागणी करते की, आपण या बाबतीत केवळ दक्षता घेऊन चालणार नाही तर अशा पद्दतीने कारखान्यांना परवाने मिळता कामा नयेत असेच आपले धोरण आपण ठेवणार का ?

.... टी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ...

श्री. आर.आर.पाटील : यापुढे परवाने तर सोडूनच द्या पण ज्यांना दिले आहेत त्यांच्याबाबतीत देखील निश्चितपणे पुनर्विचार केला जाईल.

***

..... टी 3 ..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मेळघाटामध्ये कुपोषित बालकांच्या मृत्यूचे प्रमाण वाढलेले असतानाच त्यांच्यासाठी दिलेल्या निधीचा होत असलेला अपहार.

मु.शी.: मेळघाटामध्ये कुपोषित बालकांच्या मृत्यूचे प्रमाण वाढलेले असतानाच त्यांच्यासाठी दिलेल्या निधीचा होत असलेला अपहार या संबंधी डॉ.दीपक सावंत, सर्वश्री नितीन गडकरी, सय्यद पाशा पटेल, केशवराव मानकर, अशोक मानकर, गुरूमुख जगवानी, संजय केळकर, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, प्रतापसिंह मोहिते-पाटील, संजय दत्त, जयप्रकाश छाजेड, दिवाकर रावते, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री परशुराम उपरकर, गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी त्याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो.

" मेळघाटमध्ये कुपोषित बालकांच्या मृत्यूचे प्रमाण गत वर्षापेक्षा वाढणे, या भागासाठी एकूण 21 कोटी 45 हजार रूपयांचे डिस्पोझिबल डिलिव्हरी कीट आणि हायपोथर्मिचा कीटस् खरेदी करणे, यामध्ये सर्व शासकीय मार्गदर्शक तत्त्वे डावलून सर्जिकल ब्लेडऐवजी दाढी करण्यासाठी वापरण्यात येणारी टोपाझ ब्लेड, मूळ यादीतील सर्जिकल ॲबसॉबट गॉज नसणे, तसेच बालकांची जन्मल्यावर नाळ या टोपाझ ब्लेडने कापून आदिवासी बालकांच्या जन्माच्या वेळी निर्घृणपणाचे कृत्य आरोग्य खात्यातर्फे होणे, त्याचबरोबर याची किंमत 15.60 आकारणे, कोट्यवधी रूपये खर्च करून अनावश्यक 25000 कीटस् खरेदी करणे, तसेच हायपोथर्मिचा कीटमधील एकूण 8 वस्तुंपैकी 4 वस्तू असणे, त्याची किंमत 390 रूपये आकारण्यात येणे, यामुळे कुपोषित बालकांसाठी वापरण्यात येणारा निधी त्यांच्या आरोग्यावर खर्च न होता सदर निधीचा होणारा अपहार, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाय योजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्रीमती फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्याने मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे.)

.... टी 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवर मा.आरोग्य राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर..)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मला या लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारण्यासाठी थोडा अधिक वेळ पाहिजे तरी आपण त्यासाठी थोडे पेशन्स ठेवून मला परवानगी द्यावी अशी मी सुरूवातीलाच आपल्याला विनंती करतो आणि माझा प्रश्न विचारण्यास सुरूवात करतो.

सभापती महोदय, हा महत्वाचा विषय असून 3 कोटीचा या साऱ्या व्यवहारात घोळ झाल्याचा प्रश्न आहे. सभापती महोदय, मेळघाटामध्ये झालेल्या बालमृत्यूंबाबतीतील हा प्रश्न आहे. विदर्भामध्ये हे अधिवेशन चालू आहे आणि गेल्या वर्षी देखील अगदी शेवटच्या दिवशी याच विषयावर येथे चर्चा झाली होती. त्यावेळी जी आश्वासने सरकारकडून देण्यात आली पण त्यादृष्टीने काही कारवाई झालेली नाही. पण त्याही पेक्षा भयानक प्रकार मी आपल्यासमोर येथे मांडणार आहे. सभापती महोदय, गर्भवती महिलेची डिलिव्हरी जेव्हा होते त्यावेळी डिस्पोझिबल डिलिव्हरी कीट वापरले जाते आणि त्याबरोबर हायपोथर्मिचे कीटही दिले जाते. या मेळघाटामध्ये बालमृत्यूचा आकडा किती आहे याचा विचार करण्यापेक्षा तो आकडा सतत वाढत आहे हे राज्य सरकारने दुर्दैवाने या उत्तरात मान्य केलेले नाही. पण या निवेदनातच म्हटलेले आहे की, विविध कारणांमुळे 447 बालमृत्यू झाले होते आणि 2008-09 मध्ये 467 बालमृत्यू झाले होते. तर 2009 च्या ऑक्टोबर अखेर एकूण 349 इतके बालमृत्यू झाले आहेत. म्हणजेच ही संख्या वाढते आहे. अर्थात हे हिमनगाचे एक टोक आहे. पण आपण पाहिल्यास बालमृत्यूंची खरी नोंद करणारे आकडे पाहिज्यास ती 100 ने जास्त आहे. सभापती महोदय, मी स्वत: मेळघाटामध्ये तेथील खासदारांबरोबर जाऊन आलो आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे .... यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

यापूर्वी सुध्दा मी त्याठिक्राणी एकदा जाऊन आलो आहे. मागील महिन्यात मेळघाटमधील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रांना दोन फेऱ्या मारल्या आहेत. सभापती महोदय मी, याठिकाणी डिस्पोझिबल डिलिव्हरी कीट आपणास दाखविण्याकरिता आणली आहे. शासनाने उत्तरामध्ये हे कीट निर्जंतुक असल्याचे म्हटले आहे. आता मी आपणासमोर आपल्या परवानगीने या कीटचे पाकिट कापतो.

उपसभापती : आपण सभागृहामध्ये कात्री कशी आणली?

डॉ. दीपक सावंत : (गंमतीने) माननीय उपसभापतींच्या परवानगीने आणली. ती कात्री सभागृहामध्ये कशी आली यापेक्षा या कीटमध्ये काय आहे ते आपण पाहिले पाहिजे...

उपसभापती : सभागृहामध्ये कात्री आणण्यापूर्वी आपण माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची परवानगी घेतली होती काय?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, होय. या कीटमध्ये ॲबसॉबट गॉज आहे, दोरा आहे. या दोऱ्याने नाळ बांधली जाते. त्याचबरोबर हा दाढी करावयाचा टोपाझ ब्लेड आहे. वास्तविक पहातां, आपल्या विश्लेषणामध्ये म्हटले आहे की, यामध्ये सर्जिकल ब्लेड वापरले पाहिजे, सर्जिकल ॲबसॉबट गॉज वापरला पाहिजे, कॉटन वापरले पाहिजे. त्याचबरोबर यामध्ये एका लाईफबॉय साबणाचे सहा लहान चौकोनी तुकडे करुन देण्यात आलेले आहेत. या साबणाची किंमत 15.60 पैसे आहे. असे अडीच लाख कीट्स खरेदी केले आहेत. वास्तविक पहाता, एनआरएचएमच्या निकषाप्रमाणे हे सर्व साहित्य निर्जतुक असले पाहिजे. तसेच, ते गॅमा रेडीएशनमधून पास करणे आवश्यक आहे. त्याकरिता बीएआरसीमध्ये जावे लागते. त्याठिकाणी गॅमा रेडीएशनमधून पास करण्याकरिता एक ट्रकभर माल लागतो. परंतु जोपर्यंत एक ट्रकभर माल नेला जात नाही तोपर्यंत बीएआरसी गॅमा रेडिएशन करावयास देत नाही, अशाप्रकारचे त्यांचे पत्र माझ्याकडे आहे. याठिकाणी अमरावतीचे लोकल पर्चेस असून ते एमएसएसआयडीसीकडून खरेदी केले आहे. इतक्या क्रूरपणे हा प्रकार केला जात आहे, यामधून गर्भवती मातांना इन्फेक्शन होण्याचा 100 टक्के प्रयत्न राज्य सरकारकडून केला जात आहे.

सभापती महोदय, दुसरे असे की, हायपोथर्मिया कीट हे बाळाला थंडी वाजू नये याकरिता दिले जाते. त्यामध्ये स्वेटर, मिनी वूल ब्लॅंकेट, सॉक्स जोडी, नॅपकीन, कानटोपी, प्लॅस्टिक शीट आणि मच्छरदाणी असे आठ आयटेम आहेत. सभापती महोदय, मी मेळघाटमधील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जाऊन पाहिले आणि तेथील अधिकाऱ्यांना हायपोथर्मिया कीट मिळाले काय?असे विचारले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

डॉ. दीपक सावंत...

असता त्यांनी मिळाले नसल्याचे सांगितले. परंतु 50-50 हायपोथर्मिया कीट त्याठिकाणी उपलब्ध होते. अशाप्रकारे हे कीट उपलब्ध असतांना कोणत्याही अधिकाऱ्यांनी ते दिले नाहीत. या प्रत्येक कीटची किंमत 390/- रुपये असून जवळ जवळ साडे चार हजार कीटची खरेदी करण्यात आली. म्हणून माझा पहिला प्रश्न असा की, ज्यांनी हे कीट खरेदी केले आहेत त्यांच्यावर राज्य सरकार काय कारवाई करणार आहे? दुसरे असे की, हायपोथर्मिया कीट आणि डिस्पोझिबल डिलीव्हरी कीट ज्याला आपण दाई कीट म्हणतो ते खरेदी करणाऱ्यांवर आपण काय कारवाई करणार आहात? तिसरा प्रश्न असा की, मेळघाटमध्ये टेमरुसोंडा नावाचे गाव आहे. त्या गावामध्ये तेथील खासदारांबरोबर मी गेलो होतो. त्याठिकाणी असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रामधील वॉर्म रुमचे फोटो आणि सीडी माझ्याजवळ आहेत. ही वॉर्म रुम पाहिली असता त्यामध्ये रक्ताळलेली बेड शीट होती. तसेच, त्याठिकाणी असलेले ब्लँकेट उघडून पाहिले असता त्यावर लहान लहान किटक फिरत होते. त्या ब्लँकेटमध्ये नवजात अर्भकाला झोपविले जाते. त्या अर्भकाला उष्णता देण्यासाठी त्याठिकाणी एक बल्ब लावला आहे. मेळघाटमध्ये आज प्रचंड थंडी आहे. अशाप्रकारे हे राज्य सरकार क्रूरपणे वागणार असेल तर...

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

यावर कधी कारवाई होणार आहे ? सभापती महोदय, मी प्रत्येक अधिवेशनामध्ये आपल्याला त्रास देतो. आतापर्यंत जवळजवळ 21 प्रश्न विचारलेले आहेत, पण यामध्ये अजूनही एक टक्क्याने देखील सुधारणा झालेली नाही. फक्त राज्य शासनाचे अधिकारी आकडयांचा खेळ करतात आणि एवढे दिले, तेवढे दिले असे सांगतात. यासाठी करोडो रुपये मिळतात. याकरता आदिवासी विकास विभागाकडून निधी मिळतो, सार्वजनिक आरोग्य विभागाकडून निधी मिळतो, महिला व बालविकास विभागाकडून निधी मिळतो. महिला व बालविकास विभागाचे माननीय मंत्री श्री.सुभाष झनक साहेबांनी सांगितले की, आम्ही अंगणवाडी सुरु करणार आहोत. पण अंगणवाडी सेविकांना गेल्या सहा महिन्यापासून मानधन देण्यात आलेले नाही. याकडे देखील लक्ष द्यावे. सभापती महोदय, माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी डी.एस.ओ.वर आणि ज्यांनी खरेदी केले आहे, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? याची मला उत्तरे देण्यात यावीत.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी पहिल्यांदा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचे अभिनंदन करु इच्छितो. त्यांनी आज सभागृहामध्ये लक्षवेधी सुचनेच्या माध्यमातून महत्वाचा विषय मांडलेला आहे. खरे म्हणजे माझ्याकडे हे खाते नव्याने आलेले आहे. मला ठाऊक आहे की, या खात्यामध्ये काय घडते आणि त्यामध्ये कोणती सुधारणा करावयाची आहे. पण मी सांगू इच्छितो की, आज सकाळी एका प्रश्नाला उत्तर देताना या सदनामध्ये सांगितले आहे की, यापुढे सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत खरेदी करीत असताना क्वॉलिटीवर खास लक्ष दिले जाईल आणि या विषयाच्या अनुषंगाने आज सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. आपण अमरावती डिव्हीजनमध्ये दोन प्रकारचे कीटस् खरेदी केले. मी सकाळी जेव्हा ब्रिफींगसाठी बसलो होतो, तेव्हा त्या कीटस्चे सॅम्पल पाहिले. त्यावेळी डिस्पोजेबल कीटस्चे सॅम्पल होते आणि हायपोथेरमिया कीटस्चे सॅम्पल विभागाकडे नव्हते. त्यामुळे त्यासंबंधी मी काही सांगू शकत नाही. परंतु सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंतसाहेबांनी सदनामध्ये जे डिस्पोजेबल किटस् दाखविले, त्यातील टोपाझ ब्लेडच्या बाबतीत राहू द्या पण त्याची ओव्हर ऑल क्वालिटी पाहून मला स्वत:ला असे वाटते की, यामध्ये जी खरेदी झालेली आहे,ती बरोबर झालेली नाही. आपण हे कीट 15 रु.60 पैसे या दराने खरेदी केलेले आहे. त्यामध्ये चार आयटम होते. एक म्हणजे टोपाझ ब्लेड, ग्लोज आणि बाकी जे काही होते, तर त्याबाबतीत मी स्वत: मंत्री म्हणून या

. . . .व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी . . . .

बाबतीत समाधानी नाही हे स्पष्टपणे सांगू इच्छितो. दुसरे जे कीट आहे त्यामध्ये आठ आयटम पाहिजेत. 1) एक स्वेटर 2) एक झबले 3) एक वुलन ब्लॅन्केट 4) एक सॉक्सची जोडी 5) नॅपकीन 6) इअर कॅप 7) मस्कीटो नेट 8) प्लॅस्टीक शीट इ. अशा प्रकारचे कीटस्चे वितरण झाल्यामुळे सध्या आमच्याकडे एकही कीट उपलब्ध नाही असे मला आमच्या विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले. एकतर 17 लाख 55 हजार कीटस् खरेदी आहे आणि दुसरी 25 हजार कीटस्ची खरेदी केलेली आहे आणि ती कमी प्रमाणात आहे.

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : एकंदर दोन कोटी रुपयांची खरेदी केलेली आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, तसे नाही.

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : 21.25 लाख रुपयांची खरेदी केलेली आहे याचा आपल्या उत्तरामध्ये उल्लेख आला आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय,15 रुपये 60 पैसे या हिशोबाने 25 हजार किटस् घेतलेली आहेत आणि दुसरे कीट 17 लाख 55 हजाराचे आहे. मी या विषयाच्या संबंधात आदरणीय गृहमंत्री यांच्याशी बोललो आहे. मी त्यांना या प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्याची विनंती केलेली आहे. त्याप्रमाणे याची सी.आय.डी.मार्फत संपूर्ण चौकशी होणार आहे. तसेच डी.एच.ओ.यांनी ऑर्डर इश्यू केलेल्या आहेत,त्यांच्या बाबतीत सांगावयाचे तर सी.आय.डी.चा रिपोर्ट आल्यानंतर तुरंत त्यांना सस्पेंड करण्याच्यादृष्टीने कारवाई करणार आणि मी सकाळी दुसरी एक महत्वपूर्ण घोषणा केली होती की, जो सप्लायर असेल. . . .

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1267....

श्री. सुरेश शेट्टी...

आरोग्य खात्याला जे कोणी औषधे किंवा यंत्रसामुग्रीचा पुरवठा करतात, मग ते सब ग्रेडेड, अंडर ग्रेडेड् किंवा स्प्युरियस असेल त्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात येईल. एमएसएसआयडीसी ही महाराष्ट्र शासनाची ऑर्गनायझेशन असली तरी यापूढे एमएसएसआयडीसीतून कुठलीही खरेदी आरोग्य खात्यामार्फत होणार नाही हे मी या सभागृहात सांगू इच्छितो.

उपसभापती : माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी शासनाची भूमिका स्पष्ट केलेली आहे. त्याबाबत बोलत असताना आपण असे संगितले की, डी.एच.ओ. ची सी.आय.डी. चौकशी केली जाईल आणि आणि सी.आय.डी. चौकशीचे निष्कर्ष आल्या नंतर.....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, डी.एच.ओ. ने सी.ई.ओ.ची परवानगी घेऊनच ऑर्डर इश्यू कलेली आहे. जिल्हा परिषदेची आरोग्य समिती असेल, सी.ई.ओ. असेल, डी.एच.ओ. असेल या सर्वांनी एकत्र येऊन पर्चेस ऑर्डर प्लेस केलेली आहे. सी.आय.डी. चौकशी झाल्यानंतर संबंधित अधिकारी जे कोणी असतील, जे गुन्हेगार असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. आर. आर. पाटील :सभापती महोदय, मी सन्माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो. त्यांनी या ठिकाणी अतिशय योग्य असे उत्तर दिलले आहे. लोकांच्या जीविताशी खेळ खेळणे हे निश्चित योग्य नाही. त्यांनी याबाबतचा तपास सी.आय.डी.कडे देण्याचे ठरविले आहे. मी गृहखात्याचा मंत्री या नात्याने सांगू इच्छितो की, डी.आय.जी.लेव्हलचा अधिकारी या चौकशीसाठी नेमला जाईल आणि पुढचे अधिवेशन संपण्यापूर्वी ही सगळी चौकशी पूर्ण केली जाईल आणि या चौकशीनंतर सी.आय.डी.चे जे निष्कर्ष असतील ते या सदनासमोर ठेवले जातील. जे दोषी असतील त्यांच्या विरुध्द फोजदारी कारवाई तर केलीच जाईल परंतु सस्पेन्शनच्या पुढची शिक्षासुध्दा केली जाईल पण असे प्रकार या राज्यामध्ये सहन केले जाणार नाहीत ही भूमिका मंत्र्यांनी घेतलेली आहे ती योग्य आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, निकृष्ट दर्जाच्या किट त्याठिकाणी पोहचलेल्या आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दि.26-3- 2007 ला या किट्सचे वाटप झालेले आहे. आणि दुसऱ्या किट्सचे दि. 22-6-2008 ला वाटप झालेले आहे. हया सर्व किट्स वाटप करण्यात आलेल्या आहेत आणि त्या वापरण्यात देखील आल्या आहेत. ज्या किट्स बाकी असतील त्यांचे वाटप करण्यात येणार नाही.

डॉ. एन.पी. हिराणी : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी माननीय मंत्रिमहोदयांचे अभिंनंदन केलेले आहे मी सुध्दा त्यांचे अभिनंदन करतो. अत्यंत ज्वलंत विषय त्यांनी या सभागृहात मांडला आहे. सन्माननीय गृह मंत्र्यांचे देखील मी याठिकाणी अभिनंदन करतो त्यांनी तडखाफडकी अत्यंत चांगली अशी ॲक्शन या सभागृहात जाहीर केलेली आहे. माझी अशी विनंती आहे की, यापुढे असे प्रकार होऊ नये याची काळजी घेणे सुध्दा अत्यंत आवश्यक आहे. विशेषत: ज्या ठिकाणी मनुष्याच्या जीवनाचा प्रश्न आहे. त्याठिकाणी स्पेसिफिकेशन करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी स्पेसिफिकेशन एवढेच दिलेले आहे की, ब्लेड सर्जिकल. पण असे सांगता येणार नाही. कुठल्या प्रकारचे सर्जिकल ब्लेड लागतात ते स्टँडर्डाईज करावे. अशा प्रकारचे सर्जिकल ब्लेड घेतले पाहिजे. आणि त्यांच्याच कोटेशनमध्ये निर्णय घेतला पाहिजे. साबणाच्या बाबतीतसुध्दा चार ते दहा स्टँडर्ड कंपन्यांची नावे सांगावीत आणि याच कंपन्याचं साबण घेण्यात यावे असे सांगण्यात यावे. अशा प्रकारे प्रत्येक खरेदी करावयाच्या मटेरियलचे स्पेसिफिकेशन आरोग्य विभागाने जर आधी स्पेसिफाय केले तर मला वाटते अशा प्रकारचे भ्रष्टाचार या पुढच्या काळात टाळता येतील याची काळजी माननीय मंत्रिमहोदय घेतील काय, अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे येथे मांडलेले आहेत त्याबाबतीत सभापती महोदय, मी आपल्या मार्फत त्यांना सांगू इच्छितो की, मी या खात्याचा कारभार हाती घेतल्यानंतर आरोग्य खात्याचे जे वेगवेगळे कम्पोनन्ट्स आहेत. त्यामध्ये पहिल्यांदा एचआरडी, प्रोक्युअरमेंट, हेल्थ केअर, क्लीनलीनेस आणि इन्फ्रास्ट्रक्चर हे आहेत. ते सगळे करण्याचा प्रयत्न आम्ही दोघे करणार आहोत. प्रोक्युअरमेंट करताना स्पेसिफिकेशनचा मुद्दा याठिकाणी उपस्थित करण्यात आलेला आहे. मी आज सकाळीच सांगितले की, प्रोक्युअरमेंट करताना वर्ल्ड बँकेचे जे नॉर्म्स आहेत, ज्या लेडडाऊन प्रॅक्टीसेस आहेत त्यापेक्षा पुढे जाऊन वेगळी स्पेसिफिकेशन समिती नेमणार आहोत. औषधे असोत अथवा यंत्रसामुग्री असो त्यासाठी स्पेशलाईज्ड प्रोफेशनल्सची स्पेसिफिकेशन समिती नेमणार आहोत. स्पेसिफिकेशन समितीने शिफारस केल्याप्रमाणे टेंडर काढण्यात येतील.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .....

आणि जे ड्रग्स आपण प्रोक्युअर करतो त्याबाबत आतापर्यंत अशी पध्दत होती की, ड्रग मॅन्युफॅक्चर करीत असताना आमचे लोक जाऊन इन्स्पेक्शन करतात आणि साईट इन्स्पेक्शन करुन प्रॉडक्शनच्या वेळी सॅम्पल्स घेऊन ते टेस्ट करतात. परंतु आता आम्ही एक नवीन पध्दत घालत आहोत की, कोणतेही ड्रग्स असो ते महाराष्ट्राच्या कोणत्याही हॉस्पिटलमध्ये आणि पी.एच.सी.मध्ये सप्लाय झाल्यानंतर त्या जिल्ह्याचे कलेक्टर आणि त्या जिल्ह्याच्या एस.पी.ला आम्ही ऑथराईज करणार आहोत की, प्रत्येक महिन्यात पाच पाच सॅम्पल्स मंत्रालयात पाठवावयाचे आणि त्या सॅम्पलचे मुंबईतील एफडीएच्या लेबॉरटरीमध्ये टेस्टिग होणार आणि महाराष्ट्रामध्ये कोठेही एक जरी सॅम्पल सबस्टॅण्डर्ड निघाले तर संपूर्ण सप्लाय परत पाठविणार आणि त्या कंपनीला ब्लॅकलिस्ट करणार असा नियम आम्ही ठरविणार आहोत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अंबाजोगाई (जि. बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातील सी.टी.स्कॅन मशिन सात महिन्यांपासून बंद असणे

मु. शी. : अंबाजोगाई (जि. बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातील सी.टी.स्कॅन मशिन सात महिन्यांपासून बंद असणे यासंबंधी ॲड. उषा दराडे व श्री. अरुण गुजराथी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामनंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी गत सात महिन्यापासून सिटी स्कॅन बंद असणे, याबाबत संबंधित वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील जबाबदार व्यक्तींचे होणारे दुर्लक्ष परिणामी रुग्णांना औषधोपचार न मिळणे, सदर रुग्णालयात उपचाराकरीता येणाऱ्या सर्वसामान्य व गोरगरीब रुग्णांना खाजगी दवाखान्यामधून अवास्तव खर्च करुन सिटी स्कॅन करावे लागणे त्यामुळे स्थानिक जनतेत शासनाबद्दल निर्माण झालेली उदासिनता व संतापाची भावना सबब रुग्णालयामध्ये तातडीने सिटी स्कॅन यंत्र सुरु व्हावे म्हणून शासनाने केलेली कार्यवाही वा उपाययोजना व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

प्रा. वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते..

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये असा उल्लेख केलेला आहे की, अंबेजोगाई (जिल्हा बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी सी.टी.स्कॅन मशीन सन 1999-2000 मध्ये रुपये 2,25,25,000/- इतक्या किंमतीस घेतली आणि ती मशीन 20.4.2009 ला बंद पडली. त्या मशिनची क्ष किरण ट्यूब खराब झालेली होती ती खरेदी करण्यासाठी 36 लाख रुपये दिले. त्याची खरेदी करुन ती मशिन 24.9.2009 रोजी कार्यान्वित करण्यात आली आणि ती मशिन परत 27.9.2009 रोजी बंद पडली. वॉरंटी असल्यामुळे पुन्हा दुसरी ट्यूब मिळाली आणि ती मशिन 26.10.2009 रोजी कार्यान्वित करण्यात आली. ती मशिन नंतर 29.10.2009 रोजी बंद पडली. 36 लाखाच्या एक्स रे ट्यूबची जी खरेदी झालेली आहे त्या खरेदीच्या संदर्भामध्ये संशय निर्माण होतो. त्याची चौकशी केली जाईल काय आणि ज्या कंपनीकडून ती घेतलेली आहे त्यांच्या विरोधात कारवाई केली जाईल काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, आज त्या ठिकाणी सी.टी.स्कॅन मशिनची अडचण आहे. निवेदनाच्या परिच्छेद 5 मध्ये सद्य:स्थितीत सी.टी.स्कॅन तपासणी आवश्यक असलेले रुग्ण नजीकच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात पाठविले जातात असे जे म्हटले आहे ते असत्य आहे. त्या ठिकाणी रुग्णांना खाजगी रुग्णालयामध्ये जावे लागते. त्यामुळे त्या ठिकाणी नव्याने सी.टी. स्कॅन मशिन देऊन त्यासाठी काही आर्थिक तरतूद करण्यात येणार आहे काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयामध्ये जी सी.टी.स्कॅन मशिन आहे त्याची खरेदी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 1999-2000 मध्ये 2 कोटी 25 लाख 25 हजार रुपयांना करण्यात आली होती. त्याचा दहा वर्षाचा वारंटी पिरियड होता. आपल्याला माहीत आहे की, 20.4.2009 ला एक्स रे ट्यूब खराब झाल्यामुळे ही मशिन बंद पडली. नंतर शासनाने त्यासाठी 36 लाख रुपये दिले. पुन्हा ती मशिन बंद पडली. परत ती मशिन चालू केली. मशिन चालू केल्यानंतर पुन्हा बंद पडली. एक्स रे ट्यूब बंद पडण्यामागचे सगळ्यात महत्वाचे कारण म्हणजे ती मशिन ओव्हरहिट झाल्यामुळे बंद पडली. पण तिचा वारंटी पिरियड असल्यामुळे पुन्हा ती आपल्याला 23.10.2009 ला बदलून मिळाली आणि पुन्हा ती मशिन 26.10.2009 ला कार्यान्वित झाली. त्यानंतर पुन्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

प्रा. वर्षा गायकवाड ....

29.10.2009 ला मशिन बंद पडली. याचे सर्वात महत्वाचे कारण देताना कंपनीचा जो अहवाल तेथील डीन मॅडमला देण्यात आला त्या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, विद्युत कंपनीचा विद्युत पुरवठा सुरळीत व योग्य प्रमाणात नसल्यामुळे हे झालेले आहे. त्या ठिकाणी असे झालेले आहे की, विद्युत पुरवठा बरोबर नाही. त्या ठिकाणी फ्लक्चुएशन फार असल्यामुळे आणि ओव्हरहिट झाल्यामुळे ही मशिन बंद पडलेली आहे. दुसऱ्या वेळी जेव्हा ती मशिन सुरु करण्यात आली तेव्हा त्यामध्ये असे आढळून आले की, अर्थिन्गचा जो पॉइन्ट होता तो निकामी झाल्यामुळे ती मशिन बंद झाली होती. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे याचे काम 6.12.2009 ला करण्यात आले. आता सध्या ती मशिन बंद असली तरी रुग्णांना त्रास होऊ नये म्हणून आपण जवळच्या शासकीय रुग्णालयामध्ये त्यांची व्यवस्था केलेली आहे. सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असा होता की, आपण सी.टी.स्कॅनचे नवीन मशिन देणार काय ? ती बाब शासनाच्या विचाराधीन आहे आणि आम्ही असा प्रयत्न करणार आहोत की, 2010-2011 चें जे वार्षिक अंदाजपत्रक येईल त्यामध्ये या सी.टी.स्कॅन मशिनसाठी प्रावधान करण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय हे मराठवाड्यातील पहिले वैद्यकीय महाविद्यालय आहे आणि त्या महाविद्यालयातील हे सी.टी. स्कॅन मशिन कधीही चालू नसते.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले आहे की, एक्स-रे टयूब वॉरन्टी पिरियडमध्ये असल्यामुळे बदलली आहे. हे सर्व खरे आहे. निवेदनात शेवटी असे म्हटले आहे की, "नजिकच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात रुग्णांना संदर्भित करण्यात येत आहे." अंबाजोगाईपासून बीड 100 कि.मी.अंतरावर आहे, लातूर 50 कि.मी.अंतरावर आहे, याला जवळचे अंतर म्हणता येईल काय ? लातूरला नवीन सी.टी.स्कॅन मशिन देण्यात आली आहे. परवा तेथे गेलो असता ती देखील बंद असल्याचे आढळून आले. एक्स-रे टयूब दीड महिन्याच्या अंतराने बंद पडत असेल तर तेथील डीन झोपा काढत होते काय ? गरीब लोकांना खाजगीरित्या स्कॅनिंग करावयाचे असेल तर 4 हजार रुपये द्यावे लागतात. त्यामुळे शासन यासंबंधी ठोस कार्यवाही करुन नवीन मशिनचा पुरवठा करणार आहे काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, ही सी.टी.स्कॅनची मशिन 10 वर्षापूर्वीची होती. त्याच्या एक्स-रे टयूबची क्षमता 1 हजार इतकी होती. परंतु त्या मशिनवर 4 लाख 56 हजार इतक्या केसेसची प्रोसेस झाली आहे. म्हणून ही मशिन बदलणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे सन 2010-2011 या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये नवीन मशिन खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी बाकीच्या ठिकाणच्या सी.टी.स्कॅनच्या मशिन्स बंद पडतात अशी माहिती दिली आहे. शासनाने सर्व डीन्सना सूचना दिलेल्या आहेत की, रुग्णालयात ज्या ज्या मशिन्स असतील, एक्स-रे टयूब असतील त्यांचे जे आयुष्य ते संपल्यानंतर वा संपण्यापूर्वी त्यामध्ये बिघाड होणार असेल तर त्याची माहिती संचालनालय स्तरावर द्यावी, जेणे करुन हया मशिन्स खराब होण्यापूर्वी दुरुस्त केल्या जातील. बीड जिल्हयाची सी.टी.स्कॅन मशिन बंद होण्याचे कारण मी यापूर्वीच सांगितलेले आहे. तेथे विजेच्या पुरवठयात चढउतार होत असल्यामुळे एमएसइडीसीकडून फिडर बसविले होते. तरी सुध्दा त्या मशिनमध्ये बिघाड झाला आहे.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, सी.टी.स्कॅन मशिन बिघडतात असे चित्र जवळपास सगळीकडे दिसते. शासकीय रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचे खाजगी रुग्णालयाच्या डॉक्टर्सबरोबर संगनमत असते. सी.टी.स्कॅन मशिन चालविणारे जे तज्ज्ञ असतात ते मुद्दाम हे मशिन बंद ठेवतात. हे एक कारण आहे. तसेच या मशिनवर ओव्हर लोड येतो. वाजवीपेक्षा अधिक काम या मशिनवर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

डॉ.एन.पी.हिराणी....

केले जाते त्यामुळे ते मशिन खराब होते. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे खाजगी सी.टी.स्कॅन मशिनला काम मिळावे म्हणून शासकीय कर्मचारी खोडसाळपणे मशिन बंद ठेवत आहेत या प्रवृत्तीला शासन पायबंद घालणार आहे काय ? तसेच या मशिनवर ओव्हर लोड येतो तो कमी करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना करणार आहे, जेणे करुन मशिन खराब होणार नाही. प्रत्येक शासकीय रुग्णालयात सी.टी.स्कॅन मशिन चांगल्या दर्जाचे आणले तरी सुध्दा ते बंद पडते त्याला ही दोन कारणे आहेत. त्यासंबंधी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? नवीन मशिन घेण्यासाठी लवकरात लवकर प्रावधान केले जाणार आहे असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. ही तरतूद किती दिवसात किती रक्कमेची तरतूद करुन नवीन मशिन घेण्यात येईल ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, शासनाने एक भरारी पथक स्थापन केलेले आहे. त्यामध्ये मंत्रालय स्तरावरील प्रतिनिधी, संचालनालयाचे प्रतिनिधी, महाविद्यालयांचे डीन अशा 4 सदस्यांचा समावेश आहे. हे भरारी पथक वैद्यकीय महाविद्यालयांना व शासकीय रुग्णालयांना भेट देणार आहेत. तेथे असलेली औषधे, इमारतीचे बांधकाम, यंत्रसामुग्री यांचे निरीक्षण करणार आहेत, अशाप्रकारची एक उपाययोजना केलेली आहे. त्याबाबत सर्व डीन्सना सूचना दिलेल्या आहेत. तसेच मशिनमध्ये, टयूबमध्ये बिघाड झालेला असेल त्याची पूर्व सूचना देण्यास सांगितले आहे. ज्या डीन्सकडून संचालनालय स्तरावर अशी माहिती येणार नाही अशा प्रोफेसर्सवर निश्चित कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

पृ. शी. : खेड, मंडणगड, दापोली,(जि. रत्नागिरी) या तालुक्यात विनापरवाना जंगलतोड होणे

मु. शी. : खेड,मंडणगड, दापोली,(जि.रत्नागिरी) या तालुक्यात विनापरवाना जंगलतोड होणे याबाबत श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री. संजय केळकर यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

खेड, मंडणगड, दापोली (जि. रत्नागिरी) या तालुकयात वन विभागाच्या जबाबदार अधिका-यांच्या संगनमताने विनापरवाना बेकायदेशीर जंगलतोड मोठ्या प्रमाणावर चालू आहे. अधिकारी कागदावरच वन झाडे लागवडीची नोंद करतात व कादावरच परवानगी देतात. प्रत्यक्षात जागेचा सर्वे केला जात नाही. असे धक्कादायक वृत्त बेकयदेशीर जंगलतोडीचे, लाकूड वाहतुकीचा ट्रक पकडल्याचे समोर आले आहे. दापोली, मंडणगड मधील बेकायदेशीर जंगलतोड थंबवावी व भ्रष्टाचारी अधिका-यांवर कारवाई व्हावी म्हणून जनतेने असंख्य आंदोलने केली. परंतु शासनाच्या निष्क्रीय वृत्तीमुळे जंगलमाफिया मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. याचा सामान्या जनतेस त्रस होत असल्याने जनता संतापली आहे व त्याचा केव्हाही उद्रेक होण्याची शक्यता असल्याने शासनाने जंगल माफियांच्या विरोधात तातडीने कारवाई करावी, म्हणून सदर बाब विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणत आहे.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : चैत्यभूमी (दादर) शेजारील इंदू मिलची जमीन संपादन करुन तेथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक होण्याबाबत.

मु. शी. : चैत्यभूमी (दादर) शेजारील इंदू मिलची जमीन संपादन करुन तेथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक होण्याबाबत श्री.सुभाष चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

आघाडी सरकारने संयुक्त जाहीरनाम्यात आश्वासित केल्याप्रमाणे (संयुक्त जाहीरनामा -21 कलमी कार्यक्रमांतर्गत कलम क्र. 9 अन्वये) मुंबई शहरातील भारतरत्न प.पू.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभूमी शेजारील इंदू मिलची (इंडियन युनायटेड मिल) जमीन संपादन करुन तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक बांधण्याची मागणी दलित समाजाकडून वारंवार होत आहे. त्या स्मारकाचे बांधकाम लवकरात लवकर होण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

...3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मालवणी भाषेच्या कलेला व मराठी नाटयकलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी कै.मच्छिंद्र कांबळी कला अकादमी सुरु करणे

मु. शी. : मालवणी भाषेच्या कलेला व मराठी नाटयकलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी कै.मच्छिंद्र कांबळी कला अकादमी सुरु करण्याबाबत श्री.परशुराम उपरकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.परशुराम उपरकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

कोकणातील मालवणी भाषा सातासमुद्रापलीकडे नेणारे नटसम्राट कै. मच्छिंद्र कांबळी, नुकताच मालवणी वस्त्रहरण नाटकाचा झालेला 5000 वा प्रयोग, या प्रयोगाला माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि विविध पक्षाच्या नेते मंडळीनी लावलेली उपस्थिती, या मालवणी भाषेची आवड आणि गोडी निर्माण करणारे कै. मच्छिंद्र कांबळी यांच्या नावाने मराठी नाट्यकलाकारांना व मालवणी भाषेला आणि कलेला प्रोत्साहन देण्याकरिता कै. मच्छिंद्र कांबळी कला अकादमी सुरु करुन निधीची तरतूद करण्याची कोकणात झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत केलेली घोषणा,परंतु त्यानंतर ही कला अकादमी स्थापन करण्याच्या संदर्भात शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तेव्हा कोकणामध्ये कै.मच्छिंद्र कांबळी कला अकादमी लवकरात लवकर सुरु करावी अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करीत आहे.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सातारा शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे वास्तव्य असलेल्या वास्तूचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक करण्याची केलेली मागणी

मु. शी. : सातारा शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे वास्तव्य असलेल्या वास्तूचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक करण्याची केलेली मागणी याबाबत ॲड.उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या ॲड. उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

सातारा शहरातील सदरबाजारमधील सि.स.नं.1 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्राथमिक शिक्षण घेत असताना अपल्या कुटुंबासोबत 1896 ते 1904 या कालावधीमध्ये वास्तव्य झाले होते. या वास्तूचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक करण्याची मागणी होत आहे. त्यानुसार सदर वास्तू दिनांक 13.2.2007 रोजी शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्य संरक्षित स्मारक म्हणून जाहीर केलेली आहे. त्या वास्तूचे संपादन करुन जनतेला पहाण्यासाठी खुले करण्याकरिता त्या वास्तूच्या संपादनाची कार्यवाही सुरु करावी, जिल्हाधिकारी, सातारा यांनी संपादनासाठी निधी द्यावा म्हणून शासनाकडे अकरा महिन्यापूर्वी, म्हणजे दिनांक 27.2.2009 रोजी मागणी करुन देखील अद्याप निधी उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे संपादनाच्या कामात अडचणी निर्माण झालेल्या आहेत. तेव्हा या विषयी शासनाने तातडीने उपाययोजना करण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित मूल / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वाहनांचे नोंदणी क्रमांक लिहिताना नियमांची पायमल्ली होणे

मु. शी. : वाहनांचे नोंदणी क्रमांक लिहिताना नियमांची पायमल्ली होणे याबाबत श्री.विक्रम काळे,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.विक्रम काळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

राज्यात नवीन वाहन खरेदी केल्यानंतर त्याची नोंदणी परिवहन कार्यालयातर्फे करण्यात येते व त्यानंतर त्या वाहनांना नोंदणी क्रमांक दिले जातात. परंतु हे दिलेले क्रमांक आपापल्या वाहनांवरील नंबर प्लेटवर लिहिताना मात्र अनेक लोक शासनाचे नियम धाब्यावर बसवून स्वत:च्या पध्दतीने क्रमांक लिहिताना दिसून येतात. उदाहरण द्यावयाचे झाल्यास 4141 क्रमांक मिळाला असल्यास दादा, 7171 क्रमांक मिळाला असल्यास नाना, 219 क्रमांक मिळाला असल्यास राव अशा पध्दतीने नंबर प्लेटवर क्रमांक लिहिले जातात. यामुळे अपघात झाल्यास त्या गाडीवरचा क्रमांक वाचणे व लक्षात ठेवणे कठीण जाते.

आज सुध्दा विधानभवनाच्या आवारामध्ये अशी कैक वाहने उभी आहेत ज्या वाहनांवरील क्रमांक लिहिताना नियमांची पायमल्ली झाल्याचे दिसून येईल. तेव्हा अशा प्रकारे वाहतूक नियमांची पायमल्ली करणाऱ्यांवर शासनाने तातडीने कारवाई करावी व संबंधित वाहनांच्या नंबर प्लेट नियमानुसार लिहिण्याची कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) विधेयक

मु. शी. : L.C.BILL No.VII OF 2009.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PREVENTION OF DANGEROUS ACTIVITIES OF SLUMLORDS, BOOTLEGGERS, DRUG-OFFENDERS AND DANGEROUS PERSONS ACT, 1981.)

श्री.रमेश बागवे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक 7 महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, 1981 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या विधेयकाद्वारे व्हिडिओ पायरसी करणाऱ्या व्यक्तिंचा धोकादायक व्यक्ती म्हणून एमपीडीए कायद्यांतर्गत समावेश करावा, यासाठी एमपीडीए कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आले आहे. व्हिडिओ पायरसीमुळे संपूर्ण राज्यामध्ये चित्रपट निर्मिती करणाऱ्यांवर व वितरकांवर आणीबाणीची परिस्थिती ओढावली आहे. शासनाचा महसूल देखील बुडत आहे. समाजामध्ये बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या व्यक्तिच्या माध्यमातून टोळीयुध्दे होतात. गुन्हेगारांना प्रोत्साहन मिळते. अवैध उत्पन्नाचा मार्ग मिळतो. म्हणून व्हिडिओ पायरसीचा गुन्हा करणाऱ्या व्यक्तिवर जरब बसावी म्हणून सध्याच्या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी हे विधेयक मांडले आहे. या दुरुस्तीमुळे गुन्हेगारांना एक वर्षाची स्थानबध्दता करण्याची तरतूद केलेली आहे. कॉपी राईटच्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे शिक्षा होणारच आहे. त्यात कमीत कमी 6 महिने ते 3 वर्षे कारावास व 50 हजार रुपयांपर्यंत दंड अशी तरतूद आहे. परंतु या सुधारणेमुळे एक वर्षाची स्थानबध्दतेची तरतूद केल्यामुळे व्हिडिओ पायरसीला पायबंद बसेल आणि समाजामध्ये एक प्रकारची शांता व सुव्यवस्था निर्माण होईल. सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा येणार नाही यासाठी हे विधेयक मांडले आहे. मी आपल्या माध्यमातून सभागृहाला विनंती करतो की, हे विधेयक संमत करावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

(नंतर श्री.खर्चे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009 चे विधानपरिषद विधेयक क्र. 7 - महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्येविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत जो प्रचलित कायदा आहे त्यात सुधारणा करण्यासाठी मंत्री महोदयांनी सभागृहात विधेयक पारित करण्यासाठी आणलेले आहे. त्या विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, माननीय मंत्री महोदयांनी विधेयक विचारार्थ ठेवत असताना यामध्ये झोपडपट्टी गुंड यांचाही समावेश केल्याचे सांगितले आहे. तसेच या सुधारणेच्या माध्यमातून व्हिडियो पायरसी हा मुद्दा सुध्दा त्यांनी यामध्ये ॲड केल्याचे सभागृहाला सांगितले आहे. व्हिडियो पायरसी हा एक विचित्र असा विषय आहे. केबल ऑपरेटर्स राज्यात हजारोच्या संख्येने आहेत आणि त्यांच्या माध्यमातून हे सर्व प्रसारण चालत असते. हे ऑपरेटर्स डीश टी.व्ही. च्या माध्यमातून हे प्रसारण करीत असतात. त्या व्यतिरिक्त हे सर्व व्हिडियो पायरसी कशा प्रकारे होते व कोठून होते याचा विचार केला तर खरे म्हणजे चित्रपट निर्मितीमधील एक प्रकारचे गँगवारच याला म्हणता येईल. एखाद्याचा चित्रपट उद्ध्वस्त करावयाचा असेल तर दुसरे लोक त्याच्या व्हिडियो सी.डी. तयार करुन बाजारात विकायला आणतात. हा पुरवठा एवढ्या मोठया प्रमाणात असतो की पिक्चर रिलीज होऊन थिएटरमध्ये जाईपर्यंत तो लोकांपर्यंत पोहचलेला असतो. यामागे उद्देश असा असतो की, तो पिक्चर चालूच नये अशा प्रकारे एक मोठी आर्थिक उलाढाल निर्माण करणारी ही बाब आहे. आता ही पायरसी येते कोठून आणि कशी घडते तर त्यात प्रामुख्याने परदेशातून विशेषत: पाकिस्तान यामध्ये आघाडीवर आहे. अशा सी.डी. चे वितरण आणि नियोजन इतक्या मोठ्या प्रमाणावर असते की या धंद्यातील लोकांना पकडणेच मुश्कील झाले. व्हिडियो पायरसीचे वॉर हे चित्रपट निर्मितीपासून सुरु झाले असून एकमेकांना उद्ध्वस्त करण्यासाठीच ते सुरु असते. पण त्याच वेळी असा प्रकार निर्माण होतो की, केबल ऑपरेटर्स हा घटक जो मोठ्या प्रमाणात आहे त्यांच्यामध्ये सुध्दा गँगवार सारखे प्रकार सुरु असतात. हे ऑपरेटर्स 50-50 एकाच भागात, मोठ्या शहरात असतात. त्यांच्यामध्ये प्रचंड प्रमाणात मारामाऱ्या व शीतयुध्द सुरु असते. अशा केबल ऑपरेटर्सचे पोलिसांशी लागेबांधे असतात. एखाद्या केबल ऑपरेटला सुपारी घेऊन उद्ध्वस्त करावयाचे असेल तर पायरसी सी.डी. खिशात घेऊन हे पोलीस त्याच्याकडे जातात आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

तीच सी.डी. दाखवून पंचनामा करतात. त्यावेळेस "काय करु" हा जो शब्द पोलीस वापरतात त्याचाच अर्थ "काय देतो" असा असतो. आता जो कायदा आपण सुधारणेसाठी आणत आतात त्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर उलाढाल यातून होण्याची शक्यता आहे. येथे मग 5, 25, 100 किंवा 1000 अशाने हा सौदा होणार नाही तर तो लाखाच्या घरात जाईल. कारण या कायद्यात एमपीडीएनुसार शिक्षा होणार, मग त्याला जामीन वगैरे काहीच नसेल. अशा वेळेस केबल ऑपरेटर आपला धंदा सोडून देईल कारण पोलिसांनी पकडले तर तोच उद्ध्वस्त होण्याची शक्यता जास्त आहे. अशा प्रकारे पोलिसांसाठी एक नवे बिळ यामुळे आपण निर्माण करीत आहात अशी शंका येते. तसेच हातभट्टीबाबत बोलायचे तर हातभट्टीबाबतचा कायदा यापूर्वी देखील केला पण कुठे थांबली ? आजही राज्यात मोठ्या प्रमाणात सुरुच आहे. कदाचित माननीय मंत्री महोदय श्री नारायण राणे साहेबांना या कायद्याची जाणीव आपण करुन दिली असावी किंवा अशा प्रकारच्या कायद्यासंबंधीची चर्चा मंत्रिमंडळात झाली असावी म्हणून त्यांच्या लक्षात आले असेल. त्यानुसार त्यांनी विदर्भातील पाच जिल्ह्यांमध्ये शेतकरी दारु पिऊन मरतात याची त्यांना जाणीव झाली असेल म्हणूनच त्यांच्या डोक्यात तसा विचार आला असण्याची शक्यता आहे. पण ज्यावेळेस आपण एखादा दारुबंदीचा कायदा करतो, आज वर्धा जिल्ह्यात दारुबंदी आहे पण तरी देखील महिन्या दोन महिन्यातून आम्हाला चॅनलच्या माध्यमातून ऐकायला मिळत असते की, या जिल्ह्यात हातभट्टीचा धंदा चालत असतो. तो देखील महात्मा गांधींचा सन्मान राखण्यासाठी दारुबंदी केली असली तरी सेवाग्राम या त्यांच्या आश्रमाच्या शेजारी व आजुबाजूलाच अशा प्रकारच्या दारुच्या भट्टया लागतात असेही ऐकायला मिळते. अस्तित्वात असलेल्या कायद्याची अमलबजावणी होत आहे की नाही अथवा त्या कायद्याची भीती दाखवून भ्रष्टाचार वाढविण्यासाठी ही एक वेगळयाच प्रकारची परिस्थिती यामुळे राज्यात निर्माण होणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

मला आबांचे कौतुक वाटते. डॉ.दीपक सावंत यांनी मेडीकल किटच्या संदर्भातील गैरव्यवहार आपल्या समोर आणलेला आहे. माननीय सुरेश शेट्टीसाहेबांनी आताच नवीन कारभार हातात घेतलेला आहे. जुन्या मंत्र्यांच्या कारभारातील हा कारभार आता पुढे आलेला आहे. माननीय शेट्टी साहेबांच्या अगोदर त्या खात्यावर कोणते मंत्री होते ? पुर्वीचे मंत्री आता सुध्दा आहेतच ना ? एवढा मोठा घोटाळा केल्यानंतर सुध्दा ते अजूनही मंत्री आहेतच फक्त त्यांचे खाते बदलले आहे. तु अगोदर चोरी केली त्या चोरीचा अनुभव नवीन खात्यात वापर म्हणून तर तुम्ही त्यांना दुसरे खाते दिले नाही ना ? जे माननीय शेट्टी साहेबांना जमले ते त्या मंत्र्यांना का जमले नाही हा प्रश्न आहे. मुंबईवर जेव्हा आतंकवाद्यांनी हल्ला केला होता त्या आतंकवाद्यांना माननीय आबा तुम्ही बोलावले होते का ? हया हल्ल्यात पोलिसांनी शूरगिरी दाखवली आहे. पोलिसांनी हल्ल्याच्या वेळेस मर्दुमकी दाखवली असतांना आबा आपल्याला राजीनामा का द्यावा लागला तर उत्तर दायित्व म्हणून आपल्याला राजीनामा द्यावा लागला. आबा तुम्ही जसे उत्तर दायित्व निभावले तसे उत्तर दायित्व या सभागृहात आलेले असल्यामुळे आपल्याच एका मंत्र्यांचे पोस्टमार्टेम आपल्याच एका मंत्र्यांने केलेले आहे व त्याला आबा आपण दुजारा दिला आहे. आबा मला खरेच तुमचे कौतुक वाटते. तुम्ही सभागृहाच्या माध्यमातून जनतेला आपले कर्तुत्व दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. मला वाटते हे खाते पूर्वी डॉ. गावीत साहेबांकडे होते. या ठिकाणी आपण उठून सांगितले की, पहा आमच्या राज्यात असा प्रकार झाला तर आम्ही गप्प बसत नाही तर ताबडतोब सस्पेंड आणि सीआयडी चौकशी करतो व त्याची जबाबदारी मी स्वत: घेतो आणि पुढील अधिवेशनात यासंदर्भातील अहवाल सभागृहाला सादर करतो. आपण जो निर्णय घेतला त्यासंदर्भात आपल्याला कौतुक वाटते. परंतु याचे उत्तर दायित्व पहिल्या मंत्र्यांवर आलेले आहे. या विषयाच्या संर्भात मी डीएचओ, सीईओ तसेच जे जे या प्रकरणात अडकलेले आहेत त्यांची चौकशी करतो असे आपण या ठिकाणी बोलला आहात. खरे म्हणजे यामध्ये ग्रामविकास मंत्री सुध्दा येतात. मला वाटते ग्रामविकास मंत्र्यांचा विषय लक्षात आल्यामुळे आपण जोरात उठले असावेत असे मला वाटते. 26/11 च्या घटनेच्या वेळेस आबा आपला काही दोष नाही असे आमच्याकडे उपलब्ध असलेल्या राम प्रधान समितीच्या अहवालात म्हटलेले आहे. या अहवालात पोलिसांनी केलेल्या कामांचा पूर्ण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

लेखा जोखा आलेला आहे. 26/11 मध्ये आपला काहीही दोष नसतांना सुध्दा उत्तर दायित्व म्हणून आपण राजीनामा दिला होता. त्या प्रकरणातील मंत्री आता नवीन खात्याचे मंत्री झालेले आहेत. त्या मंत्र्यांचाही उत्तरदायित्वाचा आता प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, औषध विषयक गुन्हयांचा समावेश आपण या कायद्यात केलेला आहे. कायदा कसा असतो ते मी आपल्यला सांगतो. मी चीनमध्ये गेलो होतो त्यावेळेस टीव्ही पहात असतांना टीव्हीवर भेसळ युक्त औषध विकण्याकरिता तीन अधिका-यांनी मदत केली होती म्हणून त्यांच्यावर ट्रायल झाली आणि तो गुन्हा टीव्हीवर दाखवला जात होता. या घटनेची लाईव्ह ट्रायल टीव्हीवर दाखवली जात होती. या प्रकरणाच्या संदर्भात न्यायाधिश साहेबांनी तीनही अधिका-यांना मृत्यूदंडाची शिक्षा दिली. न्यायाधिश साहेबांनी "मृत्यूदंड" असा शब्द उच्चारल्या बरोबर मागून पोलीस आले आणि त्यांना उचलून नेले.

सभापती महोदय, काल माननीय सय्यद जमा बोलत होते की, "भेसळ करणा-या व्यापा-यांना मृत्यूदंडाची शिक्षी तीन महिन्यात द्या". आपल्याला अजूनपर्यंत अफजल गुरुला फाशी देता येत नाही कशाला मृत्यूदंड शब्दाचा उच्चार करता.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.

तीन वीर पत्नी दिल्लीला जाऊन श्रीमती सोनिया गांधी यांना भेटून आल्या आहेत. कसाबला ताबडतोब फाशी देण्यात यावे असे त्यांनी सांगितले आहे. फाशीची शिक्षा सुनावल्या नंतरसुध्दा त्याला अफजल गुरुप्रमाणे फाशी दिले जाणार नाही अशी भीती त्यांना वाटत आहे. म्हणूनच या प्रकरणी निर्णय होण्याच्या अगोदरच त्यांनी दिल्लीला जाऊन सांगितले आहे की, कसाबला फाशी देण्याची तुम्ही मानसिक तयारी करावी. कायद्याच्या वापरासबंधीची आज अशी स्थिती आपल्याकडे निर्माण झालेली आहे असे मला या विधेयकाच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या विधेयकात "धोकादायक व्यक्ती " असा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु "धोकादायक व्यक्ती" म्हणजे कोण ? याची व्याख्या मला समजलेली नाही. त्यामुळे त्याबाबतचा खुलासा करण्यात आला तर बरे होईल. आपल्याला कधी निलंबित करतील याबाबत या सदनात येतांना मला नेहमीच भीती वाटते. मी जागेवर बसलेलो असतांनासुध्दा मला निलंबित करण्यात आले होते. यामुळे मी धोकादायक व्यक्ती आहे काय असे मला वाटावयास लागलें आहे.तेव्हा धोकादायक व्यक्तीचे विश्लेषण काय आहे या बाबतीत खुलासा करण्यात यावा. .

सभापती महोदय या विधेयकाच्या उद्देश आणि कारणांमध्ये असे म्हटलेले आहे की, " शिवाय अतिरिक्त खबरदारी म्हणून, जिच्याविरुध्द कॉपी राईट अधिनियम, 1957 अन्वये चलचित्रपटाशी किंवा ध्वनिमुद्रणाशी संबंधित कॉपीराईटच्या उल्लंघनासाठी किमान एक तरी आरोपपत्र दाखल करण्यात आले असेल आणि न्यायलयाने त्या अपराधाची दखल घेतलेली असेल अशा व्यक्तीलाच केवळ दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणारी व्यक्ती म्हणून स्थानबध्द करता येऊ शकेल "

सभापती महोदय, या निमित्ताने मला एक उदाहरण द्यावयाचे आहे. विधान भवनाच्या परिसरामध्ये "दादा", "नाना", "काका" असे लिहिलेल्या अनेक गाडया उभ्या आहेत . त्या ठिकाणी जाऊन कोणत्याही गाडीतील सीडी बाहेर काढून आपण पहावी ही सीडी पायरसीचीच असल्याचे तुम्हाला दिसून येईल. तुमच्या आणि माझ्या गाडीत सुध्दा पायरसीची सीडी असते कारण ओरिजनल सीडी मिळतच नाही. मूळ सीडीमध्ये चांगल्या गायकांची आणि संगीतकारांची गाणी आहेत परंतु कोणी तरी दुस-याच्या आवाजात डुप्लीकेट सीडीज तयार करुन बाजारात

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विकण्यासाठी आणल्या आहेत. त्यामुळे आज ओरिजनल सीडीतील चांगली गाणी आपल्याला ऐकता येत नाही ही बाब यामध्ये येऊ शकते किंवा नाही हे मला माहीत नाही.आज कोणतीही सीडी लावली तरी त्यातून मूळ गाणे ऐकावयास मिळतच नाही. म्हणून मी कंटाळलो आहे. तुम्हाला जरी मूळ गायकाची सीडी ऐकावयाची असली तरी कोणत्याही दुकानात गेला तरी ती मूळ सीडी शोधूनही मिळणार नाही. बाजारात लाखो पायरसीच्या सीडीज मात्र उपलब्ध आहेत .

सभापती महोदय, या विधेयकातील तरतुदीमध्ये असे म्हटलेले आहे की, "खबरदारी म्हणून, जिच्या विरुध्द कॉपी राईट अधिनियम 1957 अन्वये चल चित्रपटाशी किंवा ध्वनिमुद्रणाशी संबंधित कॉपीराईटच्या उल्लंघनासाठी किमान एक तरी आरोपपत्र दाखल करण्यात आले असेल " म्हणजेच कायदेशीर तरतूद अशी आहे की, जर आरोपपत्र दाखल केले असेल आणि न्यायालयाने त्या अपराधाची दखल घेतली असेल अशा व्यक्तीलाच केवळ दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्श्न करणारी व्यक्ती म्हणून स्थानबध्द करता येऊ शकेल " म्हणजेच कोणत्याही व्यक्तीविरुध्द शासनाला कारवाई करावयाची नाही असे दिसते.सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे वकील आहेत तेव्हा त्यांनी याबाबत विश्लेषण करुन मला सांगावे.या सदनामध्ये धाक निर्माण करणारा कायदा व्हावा अशी माझी अपेक्षा आहे. त्या कायद्याचा धाक अशी कृत्ये करणा-यावर निर्माण झाला असेल तरच त्याला कायदा म्हटले पाहिजे परंतु सुटका होण्यासाठी पळवाटाची निर्मिती जर त्यातून होणार असेल तर तो कायदा होऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तीची वाट लावावयाची असेल तर त्याकरिता अटीच टाकण्यात आलेल्या आहेत आणि त्या अटीमध्ये कोण बसणार आहे ? आता पर्यंत अशा प्रकारच्या किती व्यक्ती सापडल्या आहेत , या संबंधी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा असे मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो ज्यांच्यावर कॉपीराईटच्या कायद्याचे उल्लंघन केल्याचे एक तरी आरोपपत्र दाखल केलेले आहे आणि न्यायालयाने त्याची दखल घेतलेली आहे अशा किती व्यक्ती आढळून आलेल्या आहेत.यासंबधीची माहिती आम्हाला दिली गेली पाहिजे. अशा प्रकारची हजारो प्रकरणे घडली

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

आहेत आणि आता परिस्थिती आपल्या हाता बाहेर गेलेली आहे म्हणून एमपीडीएचा कायदा त्या व्यक्तीसाठी लागू करावा असे शासनाला वाटत आहे काय ? श्री.अरुण गवळी यांनासुध्दा हाच कायदा लावण्यात आला व त्यास जामीन मिळत नाही. पायरसीचा गुन्हा केल्यानंतर त्या व्यक्तीलासुध्दा तोच कायदा लागू करण्यात आला असून त्या व्यक्तीला आता जामीन मिळणार नाही. त्यामुळें ती व्यक्ती एक दोन वर्षे तुरुंगात शिक्षा भोगत राहील तिला बाहेर येता येणार नाही. अशा प्रकारचा कायदा ज्यावेळी करण्यात येतो त्यावेळी नेहमीच पोलिसांचे उखंळ पांढरे होत असते..

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

मग तुम्हाला हा कायदा का करावासा वाटला ? अशा किती घटना तुमच्या निदर्शनास आल्या ? असे काय घडले की तुम्हाला हा कायदा करावासा वाटला ? याबाबतच्या किती तक्रारी तुमच्याकडे आल्या तसेच किती बोगस चलत्चित्रफिती तुम्ही जप्त केल्या आहेत ? ज्याप्रमाणे पोलीस दारू जप्त केल्यानंतर ती पोलिसांच्या गोडाऊनमध्ये जमा केली जाते जोपर्यंत त्यांचा पचनामा होत नाही तो पर्यंत गोडाऊनमध्ये ठेवली जाते, ती फेकून देता येत नाही वा नष्ट करता येत नाही. हळूच त्यातील थोडी प्यायली तर चालते. तर अशा जप्त केलेल्या चित्रफितीने तुमची किती गोडाऊन्स भरली आहेत ? ज्यामुळे आता तुम्हाला हा कायदा आणावा लागला आहे.

सभापती महोदय, आपण हातभट्टीची दारू बंद व्हावी, लोकांनी हातभट्टीची दारू पिऊ नये म्हणून नारंगी-मोसंबी दारू काढली. अर्थात मला या विषयातील जास्त ज्ञान नाही त्यामुळे ती दारू काय आणि कशी आहे वगैरे मी येथे सांगू शकत नाही. परंतु 'देशी दारूचे दुकान' असे कोठेही गेलो तरी गावात एक मोठा फलक लावलेले दुकान दिसतेच दिसते. आपण हे कशासाठी सुरू केले ? तर हातभट्टीची दारू पिऊन लोक मरतात म्हणून. गरीबांना परवडेल अशा किंमतीत त्यांना सहज चांगल्या प्रतीची दारू उपलब्ध व्हावी म्हणून आपण नारिंगी-मोसंबी दारू काढली, त्याचे कारखाने काढले. पण त्यामुळे हातभट्ट्या बंद झाल्या का ? आपण ठामपणे तसे सांगू शकता का ? किंबहुना हातभट्टीची दारू पिऊन 70 लोक मेल्याची घटना घडल्यामुळे सभागृहात झालेल्या चर्चेच्या वेळी तत्कालीन मंत्री महोदयांनी हातभट्टीची दारू कशी काढली जाते, तिचे वितरण कसे होते, फुगे कसे नेले जातात वगैरे सारे वर्णन करून येथे सांगितले होते. तेव्हा कायदा करूनही हातभट्टीची दारू बंद झालेली नाही शिवाय आपण नारंगी-मोसंबी नावाची कारखान्यातील दारू आणली. पण आता तर येथील सहा जिल्ह्यांमध्ये शेतकरी दारू पिऊन आत्महत्या करतात म्हणून पुन्हा दारूबंदी करण्याची मागणी खुद्द मंत्रीच करू लागले आहेत. महाराष्ट्राच्या इतर भागामध्ये मात्र शेतकरी दारू प्यायले तरी हरकत नाही कारण तेथील शेतकरी दारू पिऊन आत्महत्या करीत नाहीत तर ते झुरून झुरून मरत असतील. मात्र विदर्भातील शेतकरी दारू पिऊन आत्महत्या करतात म्हणून आता तसा कायदा करा. झोपडपट्टी गुंड वगैरेंच्या बाबतीत आपण कायदा करीत आहात. पण आता मुंबईतील गँगवॉर बंद झाली आहेत. त्याबद्दल आबा आणि त्यांचे पोलीस आयुक्त स्वत:ची पाठ थोपटतात. पण परवाच पुण्याला एका बिल्डरला गोळ्या घातल्या गेल्या आहेत. तेव्हा लोकांना

.... इइ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ...

दिसून आले आहे की, हे गँगवॉर अजूनही सुरू आहे. पूर्वी हे गँगवाले गुंड बिल्डर्सकडून खंडणी गोळा करायचे आणि कोणी दिली नाही की त्याला मारायचे. पण आता हे गुंड, दादा लोक बिल्डरांचे भागीदारच झाले आहेत. त्यामुळे खंडणी वगैरे गोळा करण्याची काही भानगडच राहिली नाही. पण पोलिसांना मात्र वाटते की, गँगवॉर आता संपले आहे. संपले काही नाही, उलट ते लोक व्यवस्थित सारा पैसा जमा करून राहिले आहेत. तेव्हा यासाठीचा कायदा तुम्ही व्यवस्थित केला पाहिजे. हातभट्टीची दारू बंद करण्यासाठी, हातभट्ट्या बंद करण्यासाठी आपण कायदा केला, प्रयत्न केला पण ती काही बंद झाली नाही. आता विदर्भामध्ये देखील आपण पुन्हा दारूबंदी केली तर हातभट्ट्या वाढतील. काय आपला हा आदर्श आहे ? सभापती महोदय, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माननीय श्री.शरद पवार निवडणुकानंतर म्हणाले की, या पुढील निवडणुका कठीण जाणार आहेत. कारण याच निवडणुकीत दारू आणि पैशाचा झालेला अमाप वापर मी माझ्या आतापर्यंतच्या आयुष्यात कधीही पाहिला नव्हता.

(यानंतर श्री. सरफरे .... एफएफ 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

याचा अर्थ आपण मतदारांना दारु पाजून आणि पैसे वाटून सत्तेवर आलात, आपण सोज्वळपणे आलेला नाहीत. नांदेड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्यावेळी मतदारांना वाटण्यासाठी हैद्राबादमधून आणलेले दारुचे 15 ट्रक पकडण्यात आले. हे 15 ट्रक एका रांगेमध्ये उभे होते. तरीसुध्दा आपण या सभागृहामध्ये दारु आणि पैसे वाटून निवडून येता. सभापती महोदय, काल झालेल्या निवडणुकीमध्ये हे प्रकार पाहिल्यानंतर मला धक्का बसला, कापरे भरले. हे कसे झाले? याबद्दल मी चिंतन करीत आहे. मी एका कुटुंबाच्या घरी गेलो असता तीन लेकरे घेऊन एक माय रडत बसली होती. तिला एका पक्षाच्या उमेदवाराने 5 हजार रुपये दिले होते. त्यावेळी गावकरी म्हणाले की, साहेब या महिलेला चार-पाच महिने तरी चिंता नाही. ती आपल्या लेकरांकरिता 20 रुपये रोजाच्या कामावर जाते. त्यामुळे तिला एवढे पैसे मिळाल्यामुळे पाच ते सहा महिने पैश्याची चिंता नाही. तर मग मी विचार केला की, एका घरामध्ये दहा मते असतील आणि एकेका मताला आपण दोन-दोन हजार वाटणार असाल तर 20 हजार रुपये एकाच वेळी मिळतात. अमरावतीच्या मतदारसंघामध्ये एकेका मतासाठी पाच-पाच हजार रुपये वाटण्यात आले. एका मताची किंमत एवढी लावली? एवढे पैसे आपण कोठून आणता? एवढे पैसे ऐकल्यानंतर माझ्या अंगावर शहारे येतात. अशाप्रकारे एका मताला एक हजार, दोन हजार रुपये मिळणार असतील, एकूण 20 हजार रुपये मिळणार असतील तर कोण विचारतो तुमच्या आत्महत्त्येला, कोण विचारतो तुमच्या लोड शेडींगला? सगळे तेल लावत गेले, माझी सोय झाली पुढचे पुढे पाहू.

सभापती महोदय, या कायद्यामधील "धोकादायक व्यक्ती" याची व्याख्या आपण सांगितली पाहिजे. समाजामध्ये काम करणारे लोक धोकादायक नाहीत? ते एमपीएडीए या कायद्यामध्ये जात नाहीत? यामधून नक्षलवाद निर्माण होणार नाही तर काय? यामधून नक्षलवाद वाढणार नाही तर काय? अशाप्रकारे तुम्ही लोकांना विकत घेऊन त्यांना नागवे करणार असाल तर नक्षलवादी गप्प बसणार नाहीत. मला तर अशी भिती वाटते की,उद्या संपूर्ण विदर्भामध्ये नक्षलवाद्यांचे आंदोलन होईल. याठिकाणी ते वेगळे विदर्भ राज्य मागत आहेत, कदाचित उद्या वेगळे नक्षलवादी राज्य निर्माण होईल अशी परिस्थिती आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी त्या संदर्भात काल भाषण करतांना सांगितले आहे. अशी परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे "धोकादायक" या शब्दाची व्याख्या आम्हाला समजली पाहिजे. ती आपण याठिकाणी दिलेली नाही." अनैतिक व्यापार करणारे गुन्हेगार" म्हणजे काय? "अनैतिक" या शब्दाचा अर्थ काय आहे? तो अजून मला कळलेला नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. दिवाकर रावते....

आपण मला समजावून सांगितला तर बरे होईल. सेक्स स्कँडलमधील एका मुलीने असे स्टेटमेंट दिले की, वर्षभरापासून हे माझे लैगिक शोषण करीत आहेत.मला हे लोक मुंबईला घेऊन गेले, त्याठिकाणी मी दोन महिने राहिले, त्यानंतर दुसऱ्या ठिकाणी मला घेऊन गेले त्याठिकाणी चार महिने राहिले. आपण बलात्कार समजू शकतो, तो जबरदस्तीने आणि जुलमाने केलेला असतो. परंतु याठिकाणी आम्ही या लोकांबरोबर जातो, दोन-दोन महिने रहातो. अशाप्रकारच्या अनैतिक व्यापाराबद्दल गुन्हा दाखल केला जातो. यामध्ये कित्येक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. माझ्याकडे मोठ- मोठया लोकांची नावे आहेत. त्यामध्ये पोलिसांचे प्लँटेशन असते. पोलिसांनी प्लँन करुन भाडयाने ब्लॉक घेतलेला असतो, त्याठिकाणी पोलीस घेऊन जातो. त्याबाबत आता संशोधन सुरु आहे. आपण त्याला जेलमध्ये बसविले, हा विषय जेलमध्ये पाठविल्याबद्दल नाही. त्यामुळे या प्रकाराला आपण अनैतिकता म्हणणार की, काय म्हणणार? मी कोणतीही घटना जस्टिफाय करीत नाही.एखाद्या व्यक्तीने सांगितले की, मला अनैतिक प्रकरणामध्ये या लोकांनी सहा महिने डांबून ठेवले....

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

मग ध्वनी चलच्चित्र आणि ध्वनीमुद्रण हा कायदा मंजूर केला. आज सदनासमोर जे विधेयक चर्चेसाठी सादर करण्यात आलेले आहे, ते अगोदर विधानसभेमध्ये मंजूर झाले आहे. त्यानंतर हे विधेयक या सदनामध्ये मंजुरीसाठी आलेले आहे.शासनाने या संदर्भात अध्यादेश काढलेला असल्यामुळे हे विधेयक मंजूर झाल्यानंतर त्याला लगेच कायद्याचे स्वरुप प्राप्त होणार आहे. मग इतक्या दुकानांवर घाडी घालाव्या लागतील की मग तुम्हाला तुमच्याकडे असलेले पोलीस सुध्दा पूरे पडणार नाहीत. कारण सर्व सी.डी.जप्त कराव्या लागतील. त्या या कायद्याच्या अंतर्गत येतील. मग संबंधितांवर प्रायमाफेसी केस तयार होतील. त्यानंतर काय-काय होणार आहे ते बघा. पहिली केस झाली की, ती न्यायालयीन असली पाहिजे, तुम्ही म्हटल्याप्रमाणे कॉपी राईट कायद्याचे उल्लंघन केल्याबाबतचे एक तरी आरोपपत्र दाखल करावयास पाहिजे.त्यानुसार एक आरोप पत्र दाखल झाल्यानंतर मग न्यायालयाने गुन्हा दाखल करुन घेतला पाहिजे, तसा तो दाखल करुनही घेतला जाईल.अशा प्रकारे प्रायमाफेसी केस दाखल झालेले पाच हजार लोक या महाराष्ट्रामध्ये तयार होतील आणि त्यांना रोज कोणीतरी सांगतील की,आता पुढे काय ते बोला, नाहीतर तुम्ही आत चला.अशा प्रकारे ते लोक क्वॉलिफाईड झाले आणि एम.पी.डी.ए.या कायद्यांतर्गत एक किंवा दीड किंवा दोन वर्षाकरता तुरुंगामध्ये जाण्यासाठी त्यांची पात्रता तयार झाली. मग असे हे गुन्हेगार निर्माण करावयाचे आणि एखाद्या मुलीने सांगावे की, माझे लैंगिक शोषण होते, तशा प्रकारे या आरोपींचे कायम आर्थिक शोषण करावयाचे. त्याला विचारावयाचे की, "बोल, काय देतो ?" "तुझे काय करु" आणि ते तयार आहेत, कारण आता ते क्वॉलिफाईड आहेत,तुम्ही या कायद्यातून असे निर्माण केलेले आहे,त्याला अटी लावण्यात आलेल्या आहेत. अशा प्रकारे या अटी व संदर्भ असल्यामुळे एकदा गुन्हा झाला, दोन वेळा गुन्हा झाला की आपले पोलीस खाते याबाबतीत हुशार आहे. जसे आतंकवाद्यांना तोंड देण्यासाठी धजावत नाही, तसे या लोकांना सरळ करताना आणखी सगळे निर्माण करा.मला अजूनही कळत नाही. पण मला एक गोष्ट समजत नाही, मी त्याबाबतीत नेहमी विचार करीत असतो की, एखाद्या अधिकाऱ्याला 20 हजार, 40 हजार, 50 हजार पगार असतो. परंतु त्यांची मुले परदेशामध्ये शिकण्यासाठी कशी जातात ? या लोकांना ही गोष्ट कशी जमते ? मला याचे गणित अजूनही सुटलेले नाही. माझे असे सांगणे आहे की, या बाबतीत एकदा तरी ऑडीट करण्यात यावे. कारण तेथूनच भ्रष्टाचार वाढत आहे. एकदा मुले परदेशामध्ये गेली की

. . . .2 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

त्यांचा खर्च वाढतो. मग मुलांचा त्यासाठी फोन येतो. अशा वेळी त्यांना पैसे पाठविण्यासाठी ते निर्माण केले पाहिजेत. अशा वेळी मुलांच्या गरजा भागविण्यासाठी ताकद असलेल्या नस्तीवर पेनचा वापर करुन पैसे निर्माण होत असतात.. मग त्याची इच्छा असो किंवा नसो. मला श्री. तिनईकर साहेब नेहमी सांगावयाचे. मी त्यांना नेहमी विचारत असे की, भ्रष्टाचार कसा निर्माण होतो ? त्यावर ते सांगत असत की, काही नाही, साधी गोष्ट आहे.आपल्याला मिळणाऱ्या पगारातून आनंदामध्ये संसार करण्याऐवजी ज्यावेळेला पुढची झेप घेतली जाते की, मला घरात टी.व्ही.पाहिजे, सोन्याची चेन पाहिजे, अमुक पाहिजे-तमुक पाहिजे आणि अशा वेळी तर ते घरात आणण्याची त्या अधिकाऱ्याची कुवत नसेल तर ते आणण्याकरता तो अधिकारी घरच्या हट्टाला बळी पडतो आणि त्यावेळेला पहिला भ्रष्टाचार सुरु होतो हे मान्य करावे लागेल. काय करणार? शेवटी त्याचा नाईलाज असतो.त्याची मनातून इच्छा नसते. तेव्हा मुळामध्ये कोणताही अधिकारी भ्रष्टाचारी नसतो. मला श्री. तिनईकर यांनी सांगितलेले हे गणित आहे.शेजाऱ्यांकडे सगळया गोष्टी आहेत. मग त्या माझ्याकडे का नाहीत ? इतरांकडे इम्पोर्टेड गाडया आहेत आणि माझ्याकडे नाही म्हणून मला पोटदुखी नाही. आपल्या ऐपतीप्रमाणे सर्वकाही करावयास हरकत नाही.पण साध्या पगारातील माणूस एवढया श्रीमंतीमध्ये रहातो, तेव्हा त्याबाबतीत ऑडीट करावयास पाहिजे. कारण भ्रष्टाचाराचे मूळ तेथेच आहे.ही बाब तेथूनच सुरु होते.दारुचा विषय आहे,तो तेथेच संपवून टाकला.या कायद्यातून निर्माण होणाऱ्या ज्या धोकादायक बाबी आहेत, त्यासंदर्भात हे विधेयक मंजूर करण्याच्या बाबतीत आपण मार्गदर्शन केले तर फार बरे होईल.

सभापती महोदय,मी सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा साहेबांना धन्यवद देतो.ते एक बाब विसरले,त्यांना वाटले की,ते विरोधी पक्षाच्या बाजूला बसलेले आहे.ते काल सांगत होते की, तीन महिन्यात फाशी द्या. मला त्यांचे कौतुक वाटले. अशी चोखंदळ माणसे तुमच्याकडे कशी राहिली हेच मला कळत नाही. तोही प्रश्नच आहे. म्हणून आज आबांना देखील धन्यवाद द्यावयास हरकत नाही. आज धन्यवाद देण्याचाच दिवस आहे. "महात्मा गांधी की जय हो" करीत आपण 12 कारखान्यांना परवानगी दिली. पक्षामध्ये महात्मा गांधीचे नाव घ्यावयाचे, त्यांच्या नावाने पक्ष चालवावयाचा आणि दारुची लायसन्स द्यावयाची. ठीक आहे. तुमची तत्वे आहेत, तुमची प्रणाली आहे.या विधेयकाची गरज आहे, कायदा चांगला आहे,त्याचे आपल्याला स्वागतच करावयास पाहिजे. पण मी त्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत मनापासून चिंता व्यक्त करतो आणि मी गुरुजींना सांगू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

इच्छितो की, आपण आम्हाला सर्वांना कायद्याच्या पातळीवरुन एक चांगल्या प्रकारचा कायदा कशा प्रकारे राबविला गेला पाहिजे याबद्दल मार्गदर्शन केले तर फार आनंद होईल एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते यांनी या ठिकाणी या विधेयकावर बोलत असताना एका ठिकाणी उल्लेक केला की, "या निवडणुकीमध्ये माननीय पवार साहेबांनीसुध्दा अती पैसा आणि दारुचा वापर केला." सन्माननीय सदस्यांचा असा तर्क आहे की, समोरच्या बाजूचे निवडून आलेले सत्ताधारी पक्षाचे जे सदस्य आहेत त्यांनी याचा वापर केलेला आहे. सभापती महोदय, आज या ठिकाणी दुर्दैवाने ही राज्य व्यवस्थाच अशी झालेली आहे, त्याला तुम्ही सुध्दा अपवाद नाही आणि आम्ही सुध्दा अपवाद आहोत असे नाही. ही सर्व व्यवस्थाच अशी झालेली आहे. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये बीडमध्ये काय झाले हे जर मी आपल्याला सांगितले तर आपल्याला ते बरे वाटणार नाही. त्यामुळे ही व्यवस्थाच व्यवस्थितपणे दुरुस्त करावी लागेल.

उपसभापती : एकमेकांवरचे आरोप आता बंद करा. Let us talk on the merit of this Bill.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2009 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 7 महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी अधिनियम, 1981 यात काही सुधारणा करण्याकरिता हे विधेयक याठिकाणी आलेले आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणात औषधद्रव्यविषयक गुन्हेगार हा एक मुद्दा आहे. एवढया विषयापुरते मर्यादित मी याठिकाणी बोलणार आहे. औषधामध्ये जी काही भेसळ होते ती भेसळ ताबडतोब कधीच नोटिफाय होत नाही. अन्न व औषध प्रशासनाकडे त्यासंबंधीचे नमुने पाठविण्यात येतात, त्यानंतर ते नमुने तपासण्यासाठी पंधरा ते वीस दिवस लागतात. पण हे औषध घेतल्यामुळे याचे साईड इफेक्ट होतात. त्याचे पर्यावसान कधी कोणाचा जीव जाण्यामध्ये देखील होते. एखाद्या औषधाची रिॲक्शन येऊन जर एखाद्या माणसाचा जीव गेला तर तो गुन्हेगार कलम 302 नुसार एखाद्याचा खून करणे या सारख्या शिक्षेला पात्र ठरला पाहिजे. मला याबाबतीत अधिक माहीत नाही. ॲड. कुलकर्णीसाहेब सभागृहात बसलेले आहेत. ते याबाबतीत अधिक मार्गदर्शन करतील. पण यामध्ये अशा प्रकारची काही प्रोव्हिजन असली पाहिजे. जीवनावश्यक वस्तूमध्ये औषध विषयक भेसळ ही प्रमुख मानली जाते. कारण पायरसी केली तरी त्यामुळे कोणाचा जीव जात नाही. झोपडपट्टी गुंड वगैरे सगळया गोष्टी महत्वाच्या असल्या तरी ओषध विषय भेसळ माणसाच्या, समाजाच्या दृष्टीने अतिशय महत्वाची जीवाशी खेळणारी गोष्ट आहे. आज अनेक औषधे अशी आहेत की, त्यामध्ये भेसळ होतेच. 500 मिलीग्राम कॉन्टीटी असेल तर त्यामध्ये 300 ते 400 मिलीग्राम औषध असते. यावर कुठलेही क्वालिटीकंट्रोल नाही. त्यादृष्टिकोनातून काय करण्यात येणार आहे हे माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तरात सांगावे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे (गृह (शहर) राज्यमंत्री) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी याठिकाणी औषधिद्रव्यविषयक मुद्दा उपस्थित केलेला आहे. हा कायदा केंद्र शासनाने केलेला आहे. या केंद्र शासनाच्या कायद्यानुसार राज्य शासन कारवाई करते. अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा, 1954 प्रमाणे आपण कारवाई करतो. या कायद्यान्वये गुन्हेगारावर केस केल्यानंतर न्यायालयात त्या गुन्हेगाराला सोडले जाते. म्हणून नवीन एम.पी.डी.ए. चा कायदा यासाठीच करण्यात येत आहे. या कायद्यानुसार त्याला जामीन न देता एक वर्ष स्थानबध्दतेची शिक्षा सूचविण्यात आलेली आहे. म्हणून जे अशा प्रकारचे गुन्हे करतील त्यांना या कायद्यामुळे जरब बसेल. म्हणून ओषधिद्रव्यविषयक कायद्यामध्ये त्याचा धोकादायक व्यक्ती म्हणून उल्लेख केलेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी याठिकाणी धोकादायक व्यक्ती म्हणजे काय असा प्रश्न उपस्थित केला आहे. सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा आणणारी व्यक्ती म्हणजे धोकादायक व्यक्ती. नागरिकांच्या जीविताला आणि मालमत्तेला ज्याच्याकडून धोका निर्माण होतो त्याला धोकादायक व्यक्ती म्हणून संबोधले जाते. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी विचारले की, आताच या कायद्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता काय आहे? माननीय सभापती महोदय, आपण कॉपी राईट ॲक्ट, 1957 प्रमाणे कारवाई करतो. त्यामध्ये सहा महिने ते तीन वर्षाची कैद आहे. परंतु या कायद्यामध्ये 50 हजार ते 2 लाख रुपयापर्यंतच्या दंडाची तरतूद असली तरी त्यामुळे त्यांच्यावर म्हणावा तसा निर्बंध बसत नाही म्हणून त्यांना एक वर्षाच्या कैदेची शिक्षा दिली तर जरब बसेल. अशा तऱ्हेचा पायरसीचा कायदा करण्याची गरज कां निर्माण झाली अशी विचारणा सन्माननीय सदस्यांनी केली. याबाबत मी सांगू इच्छितो की, पायरसीच्या अनुषंगाने सन 2006 मध्ये कॉपीराईट ॲक्टखाली आपण केसेस केलेल्या आहेत. 2006 मध्ये नोंदविण्यात आलेल्या गुन्हयाची संख्या 214 असून त्यामध्ये अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या 337 आहे आणि 4,17,88,257 रुपये इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त केलला आहे.

यानंतर श्री. बरवड।

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे ....

2007 मध्ये 203 गुन्हे नोंदविण्यात आले त्यामध्ये 305 लोकांना अटक करण्यात आली आणि 4 कोटी 62 लाख 61 हजार 363 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. 2008 मध्ये 338 गुन्हे नोंदविण्यात आले. त्यामध्ये 431 आरोपींना अटक करण्यात आली आणि पकडलेल्या मुद्देमालाची किंमत 16 कोटी 36 लाख 13 हजार 658 रुपये आहे. अशा प्रकारचे भयानक स्वरुपाचे गुन्हे होतात. आपल्याला कल्पना असेल की, हिंदी आणि मराठी चित्रपटासाठी सुमारे 150 कोटी रुपयांची उलाढाल होते आणि 30 ते 35 टक्के प्रमाणे हिशेब केला तर शासनाचे 400 ते 500 कोटी रुपयांचे नुकसान होते. राज्य शासनाला करमणूक करातून जो महसूल मिळतो त्यामध्ये त्यामध्ये 100 ते 150 कोटी रुपयांचे नुकसान होते. या सर्व गोष्टींबाबत विचारविनिमय करुन या अवैध धोकादायक व्हिडिओ पायरसी करणाच्या ज्या व्यक्ती असतील त्यांच्यावर निर्बंध घालण्यासाठी या कायद्यामध्ये बदल केलेला आहे. मी सभागृहाला अशी विनंती करतो की, कॉपीराईट ॲक्ट प्रमाणे कारवाई होणारच त्याचबरोबर एक वर्षाची स्थानबध्दता होईल आणि त्यामुळे फार मोठी जरब बसेल. याचा अंतर्भाव एमपीडीए मध्ये केला तर नक्की या अवैध धंद्याला आळा बसेल. हे विधेयक मंजूर करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही सम्मिलित), विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्र 7 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

उपसभापती : सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 7 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

पृ. शी. : प्रादेशिक नियोजन व नगररचना (तिसरी सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. IX OF 2009

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT,1966)

श्री. विजय वडेट्टीवार (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक 9 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे विधेयक मांडण्यामागचा जो उद्देश आहे त्यामध्ये ज्याप्रमाणे नगरपरिषदेसाठी आणि महानगरपालिकेसाठी आपण डी.पी.प्लॅन करतो, नगररचना योजनांसाठी टी.पी.प्लॅन करतो, क्षेत्र विकास प्राधिकरण तसेच नागरी वस्त्यांच्या विकासासाठी एमएमआरडीए आहे त्याप्रमाणेच सर्वसाधारण जिल्ह्याच्या स्तरावर रिजनल प्लॅनच्या संदर्भात तिसरी सुधारणा यामध्ये समाविष्ट केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार.....

उद्देश एवढाच आहे की, ही योजना 14 जिल्हयांमध्ये लागू करीत आहोत. ग्रामीण भागाचा विकास नियोजनबध्दरितीने झाला पाहिजे. प्रादेशिक योजनामध्ये शहरीकरणामुळे लोकसंख्येचा दबाव वाढत आहे. गुंठेवारी जमिनीचा जो अनियंत्रित पध्दतीने विकास होत आहे त्याच्यावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न होत आहे. स्थानिक स्तरावरुन त्यावर ठोस कारवाई होत नाही म्हणून ग्रामीण भागाचा विकास करीत असताना अशा विकासाच्या कामावर निश्चितपणे ठोस अशाप्रकारची कारवाई होईल. प्रादेशिक योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी एका प्राधिकरणाची आवश्यकता आहे असे मला वाटते. या विधेयकाच्या माध्यमातून चांगला परिणाम होणार आहे. महानगरपालिका व नगरपालिकांच्या हद्दीबाहेर मोठया प्रमाणात नागरीकरण होत आहे त्या भागाचे नियोजन करता येईल. तसेच त्यांच्या क्षेत्रामध्ये क्षेत्ररचना योजनांची अंमलबजावणी सुध्दा करता येईल. त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली जमीन संपादित करता येईल आणि पाणीपुरवठा व मलनिस्सारणाची कामे करता येतील. म्हणून मी सभागृहाला विनंती करतो की हे विधेयक सभागृहाने संमत करावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी हे विधेयक मांडण्यामागचा उद्देश व कारणे सांगितली त्यामध्ये स्पष्टता आढळून आली नाही. शासन एमएमआरडीए सारखी एक नवीन संस्था निर्माण करीत आहे काय, हे विधेयक मांडण्यामागचा स्कोप काय आहे ते सांगावे.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, एमएमआरडीएसारखे प्राधिकरण स्थापन केल्यामुळे शहरी भागाच्या विकासाला चालना मिळाली. कारण नागरीकरणामध्ये वाढ होत असल्यामुळे ते प्राधिकरण करावे लागले. त्याच धर्तीवर या प्राधिकरणामुळे ग्रामीण भागातील विकासाच्या कामांमध्ये सुसूत्रता येणार आहे. जी छोटी छोटी शहरे आहेत, ग्रामपंचायती आहेत ते त्यांच्या पध्दतीने कामे करतात. 25 हजार लोकसंख्या असलेली छोटी शहरे आहेत त्यांचा नियोजनबध्दरितीने विकास झाला पाहिजे. त्यांना सोयीसुविधा पुरविल्या पाहिजे. अशाप्रकारचा उद्देश या विधेयकामागचा आहे. सभागृहाने हे विधेयक विचारात घ्यावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/ MMP/ SBT/

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांना या विधेयकाचा उद्देश आमच्या मनावर नीट ठसविता आला नाही. विधेयकाचा उद्देश ते आमच्या मनावर ठसवतील याची आम्ही वाट पहात होतो. ग्रामीण भागाच्या विकासासाठी शासन हे नवीन प्राधिकरण तयार करणार आहे. सध्या शहरीकरण वाढत चालले आहे. मागे गुंठेवारीचा कायदा संमत झाला. त्याच्या पुढचे हे पाऊल आहे. ग्रामीण भागाचा सुनियोजित पध्दतीने विकास व्हावा असा या विधेयकाचा उद्देश असावा असे मी समजतो. पण छुप्या माध्यमातून त्या भूखंडावर सरकारचा ताबा असावा...

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सरकारने त्या संदर्भातील निर्णय घेण्याचे अधिकार स्वत:कडे राखून ठेवावेत, कोणावर दया दाखवावी, कोणावर दाखवू नये, कोणाला आडवा करावे, कोणते भूखंड साफ करुन टाकावेत, कोणासाठी ते सोडावेत अशा प्रकारचे विविध अधिकार प्राधिकरणाचे निर्णय घेताना येणार असून त्यासंदर्भातील हे विधेयक आहे. एखाद्या शहरामध्ये क्रीडांगणाकरिता कोणता भूखंड असावा, पुनर्वसनाकरिता कोणता भूखंडा असावा, बगिचाकरिता कोणता भूखंड असावा, रस्ते विकासाकरिता कोणते भूखंड असावेत अशा विकासात्मक बाबीसंबंधी घ्यावयाच्या निर्णयबाबतचे हे विधेयक आहे. विकासात्मक बाबींचा आराखडा 20 वर्षांनी तयार होतो. दर 20 वर्षांनी प्रत्येक शहराच्या विकासाच्या संदर्भात एक बैठक भरते, त्याबाबतीत सर्व जनतेला कळविण्यात येते आणि त्यांच्याकडून त्यांच्या गरजाबाबतच्या सूचना मागविण्यात येतात. त्यानुसार हॉस्पिटलसाठी कोणता भूखंड ठेवायचा, पेट्रोलपंपासाठी कोणता भूखंड ठेवायचा अशा प्रत्येक गोष्टीसाठी त्या त्या वस्तीतील लोकांच्या गरजेप्रमाणे भूखंड आरक्षित केले जातात. मग एकदम त्यासंबंधीच्या नोटीसा काढल्या जातात. त्या भूखंडांचे मूल्यमापन अधिका-यांकडे असते. ते आरक्षणाचा नकाशा जाहीर करतात. त्यानंतर आपला भूखंड सोडविण्यासाठी पळापळा होते. पूर्वी मुंबई महापालिकेमध्ये स्थायी समितीच्या नियंत्रणाखाली चार जणांची समिती असायची. आता त्यामध्ये काय केलेले आहे ? तर मुंबई महापालिकेतील आरक्षित भूखंडांचा ताबा घेण्याकरिता, मुंबई शहराचा ताबा घेण्याकरिता तसेच पुणे शहराचा ताबा घेण्याकरिता, राज्यातील मोठ्या नगरांचा ताबा घेण्याकरिता हे विधेयक आणलेले आहे. आता अशा महानगरातील आरक्षित भूखंडाच्या बाबतीत महापालिकेऐवजी आमच्या सरकारचाच हस्तक्षेप असला पाहिजे, जी काही माया गोळा करायची ती आम्हीच गोळा केली पाहिजे, ज्या कोणाला नडायचे ते आम्ही नडले पाहिजे,अशी तरतूद आहे. उल्हासनगरमधील अनधिकृत बांधकामाबाबत शासनाने कायदे केले. त्या कायद्याची किती अंमलबजावणी केली हे सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांना माहीत आहे. दोन-तीन वर्षापूर्वीच्या अधिवेशनामध्ये शासनाने उल्हासनगरमधील 900 बेकायदा इमारती पाडण्याच्या संदर्भात किंवा नियोजन करण्याच्या संदर्भात कायदा केला. त्यावेळी मंत्री महोदयांनी छातीवर हात ठेवून सांगितले की, सहा महिन्यामध्ये तुम्हाला उल्हासनगर साफ करुन दाखवतो. त्याबाबतीत आजही काही झालेले नाही. कायदा पास झाला. पण कायद्याची अंमलबजावणी शून्य. कायदे येथे कशाला आणले जातात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

कोण पैसे गोळा करतो ? बांधकामे का पाडली जात नाहीत ? त्याठिकाणी आरक्षित भूखंडावरच सर्व अनधिकृत बांधकाम झालेले आहे. रस्त्यावरचे दिवे इमारतीमध्ये घुसलेले आहेत. एवढे तेथे अतिक्रमण झालेले आहे. इमारती पाडण्यासाठी नियम केले. मग त्या इमारती का पाडल्या नाहीत ? ज्यांना रेग्युलराईज करावयाचे होते त्यांच्यासाठी दंडाची वगैरे आकारणी करण्यासंबंधीचे नियम केले. पण कोणी तुम्हाला भीक घालत नाही. तुमच्या डोळयासमोर निवडणूक होती. मग या ठिकाणी विधेयक कशाला मंजूर करता ? त्याच्याही पुढचे हे विधेयक आहे. या विधेयकान्वये कोणती कमिटी निर्माण होणार आहे ? तर संबंधित जिल्ह्याचा पालकमंत्री हा वसुलीचा हेड, गँगचा प्रमुख असणार आहे. तसेच त्या क्षेत्रातील कोणत्याही भागामध्ये कार्यरत असलेला जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हे त्या कमिटीमध्ये असणार आहेत. आमचे कुठे दोन-पाच असतील. बाकी ठिकाणी सगळे तुमचेच आहेत. एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. वापर आमचा, अध्यक्ष तुमचा...सोवळे म्हटले की समोरच्या मंडळीना तिटकारा येतो. पण आमच्याबाबतीत समोरची मंडळी नेहमी सोवळे नेसतात आणि म्हणतात की आम्ही जातीयवादी. तुमच्याकडे सत्तेकरिता सगळे चालतात. सगळीकडे पुणे पॅटर्न चालतो...

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

पुढे म्हटले आहे की, विकासक्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग यामध्ये कार्यरत असलेल्या महानगरपालिकांचे महापौर व नगरपरिषदांचे अध्यक्ष. म्हणजे सगळी मोठे शहरे आली. पालकमंत्री. पालकमंत्री पदासाठी भांडणे याच्याकरिता लागली आहेत. अजूनही नेमणुका होत नाहीत. हे विधेयक मंजूर झाले की, कोणता जिल्हा मिळवायचा, काय वाटप करायचे हा त्याचाच एक भाग असल्यामुळे पालकमंत्री पदासाठी भांडणे सुरु आहेत. काय काय भांडणे चालली आहेत? मंत्रिमंडळ तयार करण्यासाठी भांडणे, पालकमंत्री पदासाठी भांडणे. पुढे म्हटले आहे की, विकासक्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग यामध्ये कार्यरत असलेल्या महानगरपालिकांचे महानगर पालिका आयुक्त व नगरपरिषदांचे मुख्य अधिकारी. मला आठवते, मुंबईच्या विकास आराखडयाबाबत समिती नेमली होती. त्या समितीमध्ये विरोधी पक्षाला देखील स्थान दिले होते. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ सभागृहात उपस्थित नाहीत. ते त्यावेळी मुंबई महानगरपालिकेमध्ये लोकप्रतिनिधी होते. व्यवस्थित समितीची रचना केली गेली होती. महानगरपालिकेच्या क्षेत्रातील नगरसेवकांचे हिअरिंग घेऊन कोणता भाग आरक्षित करावा याचा निर्णय केलेला होता. या विधेयकाच्या माध्यमातून पालकमंत्र्यांना मुख्य केल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात पालकमंत्र्यांच्या माध्यमातून कोणता भूखंड आरक्षित करायचा, कोणता भूखंड विकासात्मक ठेवायचा, कोणत्या पध्दतीने ठेवायचा हे गणित पालकमंत्री अध्यक्ष असल्यामुळे त्यांच्यावर अवलंबून राहणार आहे. पुढे म्हटले आहे की, विकासक्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग यामध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दर्जापेक्षा कमी नसेल अशा दर्जाचे त्यांचे प्रतिनिधी हे पदसिध्द सदस्य असतील. हे मी का वाचून दाखवित आहे? समजून घ्या. विकासक्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग यावर अधिकारिता असलेला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा मुख्य अभियंता किंवा अधीक्षक अभियंता दर्जाहून कमी नसेल अशा दर्जाचा त्याचा प्रतिनिधी पदसिध्द सदस्य असणार आहे. विकासक्षेत्र किंवा त्याचा कोणताही भाग यावर अधिकारिता असलेला जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख किंवा उपसंचालक, भूमी अभिलेख दर्जाहून कमी नसेल अशी त्याची नामनिर्देशित व्यक्ती पदसिध्द सदस्य असणार आहे. यामध्ये लोकप्रतिनिधींना कुठे स्थान आहे? मुंबई महानगरपालिकेच्या समितीमध्ये विरोधी पक्षाचे एक-दोन, सत्तारुढ पक्षाचे एक-दोन सदस्य अशा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

प्रकारची स्थायी समितीची रचना आहे. यामध्ये लोकप्रतिनिधींना स्थान नाहीच. जिल्हा परिषदांचे अध्यक्ष किंवा महापौर आणि पालकमंत्री असतील. लोकप्रतिनिधींचे प्रतिनिधीत्व आहे का? यामध्ये तुम्ही ते ठेवलेले नाही. ही कायद्यामध्ये प्रचंड तफावत आहे. भविष्यात महाराष्ट्रामध्ये पालकमंत्री म्हणजे सरकारच्या अंमलबजावणीखाली विविध भूखंडधारकांना लुटण्याचे काम करणारे प्रभावी विधेयक आणले आहे. त्यामध्ये अनेक त्रुटी आहेत. या विधेयकावर खूप वेळ बोलता येईल इतके विषय आहेत. मुंबई महानगरपालिकेचा महापौर म्हणून व वेगवेगळ्या समित्यांवर काम केलेले आहे. भूखंड आरक्षणाबाबत, टाऊन प्लॅनिंगच्या अनेक गोष्टी मला माहिती आहेत. दुर्दैव असे की, काल जे एक गंभीर विधेयक मांडण्यात आले, त्याची प्रत मला मिळाली नाही, मी त्या बिलावर माझे विचार मांडू शकलो नाही. गोंधळात ते विधेयक मंजूर झाले. या विधेयकानुसार ज्या तरतुदी करण्यात येत आहेत त्यावर निर्बंध काय आहेत? एक भूखंड आरक्षित केला, ते आरक्षण रिक्रिएशनचे असेल, बगिच्याचे असेल, परंतु पैसे नसल्यामुळे त्या प्राधिकरणाला किंवा महानगरपालिकेला तो भूखंड ताब्यात घेता येत नाही. तो भूखंड आरक्षित केल्याचे जाहीर केले, ॲवॉर्ड जाहीर झाला. ॲवॉर्ड जाहीर झाल्यानंतर तो भूखंड ताब्यात घेतला पाहिजे. परंतु महानगरपालिकेकडे पैसे नाहीत. मग त्या भूखंडावर झोपड्या उभ्या राहतात. तो भूखंड रिक्त असतो. मालक आहे परंतु भूखंड आरक्षित केल्यामुळे त्याकडे तो लक्ष देत नाही. मला पैसे कधी मिळतील याची तो वाट पहात असतो.

(नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / परिपत्रकासाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

तो भूखंड ताब्यात घेण्यासाठी पैसे मिळत नाहीत त्यामुळे या भूखंडावर आरक्षण झाले परंतु तो डेव्हलप करता येत नाही. पर्यायाने तेथे झोपड्या वाढतात. अशा परिस्थितीत त्यावर कोणता तोडगा काढला तर एसआरए. एसआरएच्या माध्यमातून तो भूखंड महापालिकेला देतो आणि त्याचा एफएसआय ट्रान्सफर होतो. पण भूखंडावरील झोपड्या मात्र तशाच राहतात. अशा प्रकारे जेथे बगीचासाठी भूखंड राखीव होते, मैदानासाठी, कम्युनिटी हॉलसाठी भूखंड राखीव होते, सर्वसामान्य जनतेच्या सोईसाठी भूखंड राखीव होते त्यावर सर्व ठिकाणी झोपडपट्टी विकसित होते. कालांतराने एसआरए सारखा तोडगा काढलेला आहे त्याच्या माध्यमातून मोठ्या इमारती उभ्या राहतात आणि का तर झोपडपट्टीचे पुनर्वसन आणि यामुळेच शहरांमधून सामान्य नागरिकांसाठी सोई उपलब्ध करुन देता येत नाही, ही दुर्दैवी बाब आहे. मुंबईत आज अशी परिस्थिती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी नुकताच स्टे दिलेला आहे त्यामुळे सर्व ठिकाणची झाडे सुकायला लागली. अशा वेळेस या कायद्यात तरतूद असायला पाहिजे की, आरक्षण असलेले भूखंड महापालिकेकडे अथवा नगरपालिका किंवा जे प्राधिकरण असेल त्यांनी ते भूखंड ताब्यात घ्यावे आणि त्यांची आर्थिक कुवत नसेल तर शासनाने व्याजाने म्हणा की बिनव्याजी म्हणा त्यांना पैसा उपलब्ध करुन दिला पाहिजे. तो पैसा नंतर त्यांनी हप्त्याहप्त्याने फेडायचा. अशा प्रकारे प्रयत्न केले तरच अशा महापालिका, नगरपालिका किंवा प्राधिकरणे असे आरक्षित भूखंड लवकरात लवकर ताब्यात घेऊन ते विकसित करु शकतील. अन्यथा केवळ भूखंड लुटण्यासाठीच प्रत्येकाचे प्रयत्न असतील तसेच पालकमंत्र्यांनाही आणखी एक चांगले काम मिळण्याचा आनंद होईल व त्यासाठी मारामाऱ्या होतील. मग त्यात मुंबई, ठाणे, उल्हासनगर, कल्याण, संभाजीनगर, नागपूर असे जे काही प्राधिकरणे असतील ती माझ्या हातात घेतो आणि त्याच्या विकासाचा आराखडा 20 वर्षासाठी मंजूर करुन घेतो. नंतरचा जो येईल त्याला त्यात काहीच करता येणार नाही यासाठीच हे विधेयक आणले आहे अशी माझी दाट शंका आहे. या विधेयकावर खरे तर खूप बोलण्यासारखे आहे पण वेळ नसल्यामुळे मी थोडक्यात सांगतो की, महानगरपालिकेसाठी आरक्षित असलेले भूखंड कशा प्रकारे ताब्यात घ्यावयाचे याचेच हे कटकारस्थान सरकारने ठरविलेले आहे. ज्यावेळी एखाद्या प्राधिकरणाचा विकास आराखडा मंजूर होतो आणि तो अंतिम मंजुरीसाठी शासनाकडे येतो तो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

तेथेच दोन-दोन वर्षे पडून राहतो आणि पोट भरल्याशिवाय मंजूर होत नाही अशी सध्याची परिस्थिती आहे. आता तर पालकमंत्र्यांना सुध्दा यामध्ये टाकले आहे. म्हणजे एक प्रकारची लूटच यातून होणार अशी शंका येते, विकास मात्र होणार नाही. माझे म्हणणे आहे की, टीपीएस-4 टीपीएस-5 आणि टीपीएस-6 जे 25-30 वर्षापूर्वी झालेले आहेत पण एकही भूखंड महापालिका ताब्यात घेऊ शकली नाही आता टीडीआरच्या माध्यमातून हे सर्व चालले आहे तरी सुध्दा ते पूर्ण हातात येत नाही अशी परिस्थिती आहे. गिरगावमधील एकही भूखंड महापालिका ताब्यात घेऊ शकली नाही, तेथे चाळी उभ्या आहेत आणि त्या चाळीतील भेडेकरुंना कुठे न्यायचे हा प्रश्न निर्माण झाला आहे. तेथे चाळी उभ्या आहेत मग ती जागा मैदानासाठी असेल रुग्णालयासाठी असेल अथवा उद्यान म्हणून जाहीर केली असेल पण उभ्या राहिलेल्या भाडेकरुंना कुठे न्यायचे हा प्रश्न आहे आणि त्यामुळेच कित्येक वर्षांपासून विकास होत नाही. म्हणून आपण जे प्राधिकरण निर्माण करीत आहात त्यातून विकास कसा होणार याची हमी शासन देणार आहे काय याचा खुलासा होणे आवश्यक आहे तसेच यामध्ये लोकप्रतिनिधीं नसणे हा भाग निमार्ण झाला असून तो अत्यंत खेदजनक आहे असे सांगतो आणि माननीय सभापतींनी विनंती केली म्हणून माझे भाषण पूर्ण करतो.

उपसभापती : जनरली अशा विधेयकावर आपण कधी बोलत नसतो परंतु स्थानिक स्वराज्य संस्थेत आपण काम केलेले आहे त्यामुळे अत्यंत मौलिक अशा सूचना सन्माननीय सदस्यांनी केल्या आहेत. आज मुंबई महानगर प्राधिकरणत देखील स्थानिक लोकप्रतिनिधींचा समावेश शासनाने केलेला आहे. एमएमआरडीएची बॉडी आपण पाहिली तर दिसून येईल की, त्यात महापौर आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी समाविष्ट आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ....

मला वाटते स्थानिक क्षेत्र विकसाचा विषय हा स्थानिक लोकप्रतिनिधींच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. स्थानिक अडचणी त्यांना चांगल्या माहीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी जी सूचना केलेली आहे ती सूचना आपण विचारात घ्यावयास पाहिजे होती. अजूनही त्यांच्या सूचनेसंबंधी विचार करता आला तर करावा. सन्माननीय सदस्यांची सूचना रास्त आहे असे मला वाटते. एवढेच नव्हेतर सिडकोवर सुध्दा आपण स्थानिक लोकप्रतिनिधींचा समावेश केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी जी सूचना केली आहे ती अत्यंत उपयुक्त आणि बहुमुल्य सूचना आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींना त्या ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीची चांगली माहिती असते. त्यामुळे त्या ठिकाणचे इन्फ्रास्ट्रक्चर्स कसे असावे याची जाणीव स्थानिक लोकप्रतिनिधींना चांगली असते. म्हणून महापालिका असो किंवा नगरपालिका असो आपण जर जिल्हा परिषदेच्या स्तरावर आपण प्रतिनिधीत्व देतो त्यामुळे महापालिका, नगरपालिका या ज्या काही स्थानिक स्वराज्य संस्था आहेत त्यांच्या प्रतिनिधींना अशा प्रकारच्या प्राधिकरणावर निश्चितपणे स्थान मिळाले पाहिजे अशी माझी देखील स्वत:ची भावना आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, हे बील विधानसभेने 16 जून, 2009 रोजी संमत केलेले आहे. मुंबई आणि मुंबई बाहेरच्या परिसरातील विकासासाठी ज्या प्रमाणे एमएमआरडीए काम करते त्याच धर्तीवर शहराच्या भागात नागरी वस्त्यांची मोठया प्रमाणात वाढ होत आहे त्याचे नियोजन करण्यासाठी हे प्राधिकरण स्थापन करण्यामागील कल्पना आहे. गुजरात सरकारने 1991 मध्ये अशा प्रकारचे प्राधिकरण स्थापन केलेले आहे. आपण त्या तुलनेत खुप मागे आहोत. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी यासंदर्भात एक मुद्दा उपस्थित केलेला आहे. माननीय रावते साहेबांनी महापालिकेमध्ये महापौर म्हणून म्हणून काम केलेले आहे. तसेच या ठिकाणी माननीय उपसभापती महोदयांनी सुध्दा चांगली सूचना केलेली आहे. या विधेयकाच्या संदर्भात दोन-तीन मुद्यांचे निरसन होण्याची आवश्यकता आहे. सदर क्षेत्रात जी अनाधिकृत बांधकामे होतात त्यावर आपल्याला या विधेयकाच्या निमित्ताने कारवाई करता येईल. शहरा बाहेरील भागात जो अनियंत्रित विकास होत आहे तो सुध्दा या विधेयकामुळे नियंत्रित होईल अशी या विधेयकाच्या मागची कल्पना आहे. तसेच राज्यात ज्या ज्या ठिकाणी क्षेत्र विकास प्राधिकरणाची आवश्यकता असेल अशा ठिकाणी ते स्थापन करता येईल. ज्या ठिकाणी आवश्यकता असेल तेथे आपण क्षेत्र विकास प्राधिकरण स्थापन करु शकतो. नगर रचना योजनेसाठी सर्व जागा संपादित करण्याची आवश्यकता नाही तर सार्वजनिक सुविधासाठी लागणा-याच जागा सार्वजनिक सुविधांसाठी संपादित केल्या जाणार आहेत. क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून नगर रचना योजना व एनए यामुळे सर्व जागा संपादित करण्याची आवश्यकता नाही तर त्याऐवजी जेवढया जागेची गरज लागेल तेवढीच जागा सार्वजनिक वापरासाठी घेण्यात येतील व ज्या जागोची आपल्याला गरज लागणार नाही अशा जागा जमीन मालकाला परत देण्याची प्रोव्हीजन आहे. या प्राधिकरणामुळे महानगरपालिका, नगरपालिकेच्या हक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येत नाही. महानगरपालिका, नगरपालिकेच्या अधिकाराची कोणत्याही प्रकारे कपात होत नाही. त्यांचे कसलेही अवलुल्यन होत नाही. तसेच या प्राधिकरणामध्ये जिल्हापरिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती, महानगरपालिकेचे महापौर, नगरपरिषदेचे अध्यक्ष आहेत त्यामुळे स्थानिक प्राधिकरणाला प्रतिनिधीत्व आहे. या शिवाय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार.....

जिल्हयाचे पालकमंत्री या प्राधिकरणाचे अध्यक्ष राहणार आहेत. आपण या ठिकाणी जी सूचना केलेली आहे त्यानुसार आपण स्थानिक लोकांचा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. कारण स्थानिक लोकप्रतिनिधींना त्यांच्या भागाची सर्व माहिती असते. माननीय उपसभापती महोदयांनी या ठिकाणी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यासंदर्भात शासन निश्चितपणे विचार करेल एवढे सांगतो आणि सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि. क्रमांक 9 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (तिसरी सुधारणा) विधेयक संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

उपसभापती : सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 9 संमत झाले आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुन: भरेल.

(1.52 ते 2.30 मध्यंतर)

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर ..)

सभापतीस्थानी - माननीय सभापती

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, सभागृहापुढील अशासकीय कामकाजास सुरूवात होण्यापूर्वी मला आपल्याला एक विनंती करावयाची आहे. सभागृहाच्या कार्यक्रम पत्रिकेनुसार आजच्या अशासकीय ठरावांपैकी पहिला ठरावावर मला उत्तर द्यावयाचे आहे. याच वेळी खालच्या सभागृहात म्हणजे विधानसभा सभागृहामध्ये अशासकीय कामकाज सुरू असून तेथेही माझ्या विभागाशी संबंधित विषयाच्या ठरावावर चर्चा सुरू झाली असून मला तेथे उत्तर द्यावयाचे असल्याने मला तेथे उपस्थित राहणे आवश्यक आहे. तेथे चर्चा सुरू झालेली आहे. त्यामुळे माझी आपणास विनंती आहे की, आजचा पहिला ठराव आपण पुढे ढकलावा. ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पण आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील अशासकीय कामकाजातील तीन ठरावापैकी नंतरचे दोन ठराव अगोदरच विनंती केल्यानुसार पुढे ढकलण्यात आले आहेत. त्यामुळे राहिलेल्या एका ठरावावरच आज चर्चा होणार आहे.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय राज्यमंत्र्यांच्या विभागाशी संबंधित चर्चा खालच्या सदनामध्ये सुरू झालेली आहे आणि त्यावेळी त्यांना तेथे उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्याचवेळी आपल्याकडे देखील त्यांच्या विभागाशी संबंधित विषयावर अशासकीय ठराव चर्चेला आपल्याला घ्यावयाचा आहे. आता केवळ सभागृहाची 'बेल' वाजल्यामुळेच ते येथे उपस्थित झाले आहेत. विधानसभागृहामध्ये त्यांच्या विभागाशी संबंधित विषयावर चर्चा सुरू झाली असल्याने ती चर्चा पूर्ण झाली पाहिजे त्यानंतर ते येथे येऊ शकतील. पण आपल्याकडे देखील तीन पैकी दोन ठराव आपण अगोदरच विनंती केल्यानुसार पुढे ढकलले आहेत व राहिलेला एकच ठराव आज आपण चर्चेला घेणार आहोत. परंतु माननीय राज्यमंत्र्यांची अडचण लक्षात घेऊन मी सन्माननीय सदस्या डॉ.गोऱ्हे यांना विनंती करीन की, त्यांनी कोयना भूकंपाच्या विषयावरील त्यांचा आजचा ठराव आहे तो मांडून त्यावर एक वाक्य बोलावे आणि मग मी हा ठराव पुढे ढकलतो. त्यानंतर अशासकीय कामकाज ज्या दिवशी असेल तेव्हा हा ठराव प्रथम चर्चेला आपल्याला घेता येईल व त्यांना त्यावर बोलता येईल. आपल्या या ठरावाच्या विषयाच्या अनुषंगाने मी आपल्याला सांगेन आठवण करून देईन की, 1967 साली 11 डिसेंबरलाच तो प्रलयकारी भूकंप झाला होता.

डॉ. नीलम गोऱ्हे : ठीक आहे.

.... पीपी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशासकीय कामकाज - ठराव

सार्वजनिक हिताच्या विषयावर चर्चा

पृ.शी.: राज्यातील कोयना धरण परिसरात सातत्याने बसत असलेले भूकंपाचे धक्के.

मु.शी.: राज्यातील कोयना धरण परिसरात सातत्याने बसत असलेले भूकंपाचे धक्के या विषयावरील डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांचा ठराव.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडते.

" राज्यातील कोयना धरण व परिसरात सातत्याने बसत असलेले भूकंपाचे लहान-मोठे धक्के, अशा लहानर मोठ्या भूकंपाच्या धक्क्यांची संख्या सुमारे दीड लाखांवर असल्याची नोंद कोयना बांधकाम प्रकल्पाच्या वूड अँडर्सन भूकंप मापक यंत्रावर होणे., सदर भूकंपाची मालिका अजूनही सुरू असणे, या भूकंपाचा केंद्रबिंदू कोयना धरण असणे, सदर भूकंपाचा केंद्रबिंदू व त्यांची खोली याची अचूक माहिती तात्काळ उपलब्ध होण्यासाठी असणाऱ्या यंत्रणेतून तात्काळ माहिती मिळत नसल्याने या यंत्रणेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होणे, भूकंप मापकयंत्र कुचकामी असणे, त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनेला कुठल्याही प्रकारची वेळीच माहिती न मिळणे, कोयना धरणाच्या परिसरात भविष्यात कधीही मोठ्या प्रकारचा भूकंप होण्याची शक्यता विचारात घेता व त्यातून होणारे मोठ्या प्रमाणावरील नुकसान टाळण्याकरिता कोयना प्रकल्प भूकंप मापक यंत्रणा आधुनिक तंत्रज्ञानाने प्रगत करून तातडीने कार्यवाही करण्याबाबत बृहत आराखडा तयार करून भूकंपाबाबतचे सर्व प्रकारचे तंत्रज्ञान विकसित करण्यात यावे अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, आपल्याला आठवत असेलच की, 11 डिसेंबर 1967 रोजी कोयना धरण परिसरातच प्रलयकारी भूकंप झाला होता आणि त्यात 200 माणसे दगावली होती व हजारो लोकांचे जीवन उद्ध्वस्त झाले होते. या संबंधात माझ्याकडे बरीच माहिती मी आणलेली आहे व ती मी येथे विस्ताराने मांडणार आहे. परंतु आपण विनंती केल्यानुसार मी या विषयावरील माझे विचार पुन्हा जेव्हा हा ठराव चर्चेला घेण्यात येईल त्यावेळी मांडेन.

.... पीपी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : धन्यवाद. सभागृहापुढील आजचे दिवसाचे कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 14 डिसेंबर 2009 रोजी सकाळी 10.30 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 10.30 ते 12.30 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल आणि त्या बैठकीत विरोधी पक्षाकडून दिल्या गेलेल्या प्रस्तावावर चर्चा होईल. त्यानंतर दुपारी 1.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 37 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 14 डिसेंबर 2009 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.

***

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही